सुभेदार मल्हारराव होळकर

(काव्य.)

गोविंद एकनाथ गोसावी

स्कूलमास्तर, नामपूर जि० नाशिक.

१९०९

किंमत बारा आणे.

इंदूर दरबारच्या उदार आश्रयानें प्रकाशित झालेलें

सुभेदार मल्हारराव होळकर

(काव्य.)

गोविंद एकनाथ गोसावी
स्कूलमास्तर, नामपूर जि० नाशिक
यांनीं रचिलें.

भुजंगप्रयात.

सदानंद हें रूप ज्याचें प्रसिद्ध ।
जयाचें हरी नाम जो पूर्ण सिद्ध ॥
तया एकनाथास वंदूनि भावें ।
मुदें अर्पितों अल्पसें काव्य भावें ॥१॥

हें पुण्यांत
त्र्यंबक हरी आवटे
यांच्या इंदिरा छापखान्यांत छापिलें.

मार्च १९०९.

किंमत बारा आणे.

हें पुस्तक गोविंद एकनाथ गोसावी यांनीं पुणें पेठ
सदाशिव येथें त्रिंबक हरी आवटे यांच्या
इंदिरा छापखान्यांत छापवून जिल्हा नाशिक
मुक्काम नामपूर येथें प्रसिद्ध केलें.

अभिप्राय.

—:०:—

रा. गोविंद एकनाथ गोसावी यांनीं रचिलेलें इंदूर संस्थानचे मूळ पुरुषाचें कविताबद्ध चरित्र वाचून पाहिलें. चरित्र ऐतिहासिक दृष्ट्या पूर्ण असून बरीच साग्र माहिती देण्याचा यत्न केलेला आहे. कवितारूपामुळें कदाचित् हें अधिक मनोरंजक होण्याचा संभव आहे. पुस्तक आश्रयास पात्र आहे असें मला वाटतें.

हरि महादेव भडकमकर.

प्रोफेसर (संस्कृत)

१६।१२।०८. उइल्सनकालेज मुंबई.

या लेखकानें लिहिलेले लेख.

१. **अहल्याबाई होळकर काव्यः**--ह्यास **डेक्कन व्हर्नाक्यूलर ट्रा. सोसायटीनें** पसंत करून बक्षिस दिलें आहे. शिवाय इतर तज्ज्ञ गृहस्थ व शाळाधिकारी यांनीं बराच आश्रय दिला आहे. किं. ८१२.

२. **परशुरामभाऊ पटवर्धन काव्यः**--ह्यास **डे० व्ह० ट्रा० सोसायतीनें** पसंत करून बक्षिस दिलें आहे. शिवाय श्री. **भाऊसाहेब पटवर्धन** सं० जमखंडी यांनीं ७५ रु. संभावना केली आहे. किं. १८२.

३. **श्रीज्ञानेश्वरकाव्यः**--पृष्ठें १८९ (बडोद्याच्या ग्रंथप्रसारक मंडळीनें हक्कासह घेतलें आहे). क.११३५

४. **वृत्तगणितादर्शः**--पृष्ठें २५ यांत प्रत्येक वृत्ताचें (गद्यांत) लक्षण, वृत्तदर्शक (८२) श्लोकांत महत्त्वमापनांतील सर्व कृत्यांच्या व श्रेढीच्या सर्व कृत्यांच्या व लीलावतींतील इतर महत्त्वांच्या कृत्यांच्या रीति सार्थ दिल्या आहेत. किं. ८२८६.

५. **व्याकरणाचा तक्ताः**--चालू असलेल्या व्याकरणाचा सर्व महत्त्वाचा भाग यांत आणिला आहे. (प्रति थोडयाच शिल्लक आहेत.) किं. ८८९.

६. **उजळणीचा तक्ताः**--यानें उजळणी पाठ ठेवण्यास उपयोग होतो. किं. ८८६.

७. **वृत्तादर्शः**--यतींसह वृत्तांचीं लक्षणें थोडक्यांत दिलीं आहेत. किं. ८८९.

८. **मल्हारराव होळकर काव्यः**--कविता ७९१. (वाचकाच्या हातींच आहे).

९. **सुलभ व्याकरणादर्शः**--यांत प्रश्नोत्तर रूपानें सर्व व्याकरणाचा भाग आणिला आहे, आणि व्याख्या

वगैरे सर्व महत्त्वाच्या विषयांवर (१२०) कविता दिल्या आहेत. (लवकरच प्रकाशित होईल).

१०. **माधववंश भाग १ ला**:–कविता १००४. (राजकवि व गुणज्ञ उदार गृहस्थ श्री० गणपतराव माधवराव ऊर्फ आबासाहेब विंचूरकर यांच्याकडे परीक्षणार्थ व आश्रयार्थ पाठविला आहे).

११. **जमनाबाई गायकवाड काव्य**:–कविता ९५९. (डेक्कन व्ह. ट्रॅ. सोसायटीकडे परीक्षणार्थ पाठविलें आहे).

१२. **श्रीनिवासपंतप्रतिनिधि काव्य**:–श्रीमंतांचे विद्वान् चिरंजीव श्री० बाळासाहेब पंत बी. ए. यांनीं आश्रयपूर्वक छापविण्याचें अभिवचन दिलें आहे). कविता ३००.

१३. **जावजी दादाजी काव्य**:–कविता ५००. "दोन वेळ त्यांच्या उदार व गुणज्ञ चिरंजीवांकडे जाऊन " एक चरित्र झालें आहे, दुसरें नको " अशा पत्रोत्तरानें परत आलें. सल्लागारास विनंति अशी आहे कीं,–"रामाचें एक चरित्र–(रामायण –असल्यावर आणखी १०८ कशास हवींत. " (मोठ्यांचीं चरित्रें जितकीं निघतील तितकीं हवींच आहेत).

१४. **सुभाषितरत्नाकराचें भाषांतर**:—पहिल्या २०० पानांचें तयार आहे. पैकीं पहिल्या १०० पानांचें डे. व्ह. ट्रॅ. सो. कडे परीक्षणार्थ गेलें आहे.

१५. **स्फुट कविता**:–९००

१६. **कवितावद्ध लीलावती**:–गणित विषयक सर्व कृत्यांच्या सर्व रीति श्लोकांत दिल्या आहेत. पद्यें १३०.

१७. **व्यवहारी अपूर्णांक १०० प्रश्नोत्तरें**:-तयार आहेत.

१८. **रेघांच्या अपूर्णांकावरील टिप्पण**:–तयार आहे.

प्रस्तावना.

प्रपंचांत सुखदु:खांचे आणि अडचणींचे प्रसंग वारंवार येतात, आणि त्यांतून पार कसें पडावें याबद्दल अनुभवी व विचारी माणसांसही कोडें पडतें. आपल्या अल्पशा आयुष्यांतील अनुभव कितीसा उपयोगीं पडणार? पण उपलब्ध असणारे ऐतिहासिक लेख आणि पौराणिक लेख इत्यादिकांमधील स्त्रीपुरुषांचीं चरित्रें हीं अंधकारमय प्रपंचांतून चालण्यास मशालीप्रमाणें उपयोगी पडतात. यांत बिलकूल संशय नाहीं. निरनिराळ्या प्रसंगीं सदर पुण्यपुरुष, कसे वागले, त्यांनीं संकटांतून रस्ते कसे काढले, आपलीं संकटें व त्यांचीं संकटें यांची तुलना इत्यादिकांनीं मनावर योग्य संस्कार होऊन समाधान वाढत जाऊन मनुष्य समाधानी, विचारी आणि कार्यक्षम होतो, हा ऐतिहासिक लेखाचा मुख्य फायदा आहे.

निर्वाहाकरितां उद्योग केल्याशिवाय गत्यंतर नाहींच, तो करून राहिलेल्या वेळांत नित्य वाचन करण्याचा थोडासा नियम केल्यापासून मनास करमणूक बरीच होऊं लागली. पुढें ऐतिहासिक लेख वाचल्यावर त्याचें साररूप भाषांतर कवितेंत करण्याचें ठरविलें, आणि भीत भीत १८९६ सालीं '**अहल्याबाई होळकर काव्य**' छापून काढलें. तें विद्वज्जनांस अर्पण केलें. परमाणूएवढ्याही परगुणास पर्वता-

सारखें मानणें व दुसऱ्यास उत्तेजन देणें ह्या विद्वज्जनाच्या गुणामुळें जास्त हुरूप येत चालली. डे. व्ह. ट्रा. सो. नेंही २ लेख पसंत करून बक्षिसें दिलीं, व इतर गुणग्राहकांनींही चांगली मदत केल्यामुळें हें थोडें बहुत अल्पसें काम मज-कडून होत आहे.

इंदूर दरबारनें २०० प्रति घेण्याचें आश्वासन दिल्या-मुळें हा बारा वर्षें लिहून पडलेला ग्रंथ (ग्रंथारंभ २।१।६ १८९१ व ग्रंथसमाप्ति २।१०।१८९६) आज प्रकाशित होत आहे. (" माधववंश भाग पहिला " व " जम-नाबाई काव्य " यांना श्रीमंत शिंदे सरकार व श्री. बडोदें सरकार आश्रय देतील तर तेंही प्रकाशित करितां येतील.) सबब इंदूर दरबारचा मी अत्यंत आभारी आहें.

वरील आश्रयाशिवाय श्रीयुत **माधवराव नारायण पा-टणकर** यांनीं २५ रु. श्रीयुत **नरहर गोपाळ शेट** नामपूर यांनीं १५ रु. व वे. शा. सं. **दादाबोवा तळवाडकर** यांनीं १० रु. आणि श्रीमंत **बळवंत माधवराव देशपांडे** नामपूर यांनीं ५ रु. दिले याबद्दल त्यांचाही आभारी आहें.

ज्योतिर्विद्याभ्यासंगी रा. **गणेश प्रभाकर दिक्षित** फ. अ. नामपूर-स्कूल यांनीं (२३ कविता ७ व्या प्रकरणांतील हरवल्या होत्या त्या नवीन रचून दिल्या. त्यांची कवितेंत गति बरी आहे.) व रा. **त्र्यंबक हरी आवटे** यांनीं पुष्कळ कामें असतां, व प्लेगचे दिवस असतांही काम चांगलें व मुदतींत करून दिलें याबद्दल या उभयतांचा आभारी आहें.

(शार्दूलविक्रीडित.)

या काव्यीं गुणदोष ते बुधजना दृष्टीस आले जरी ।
जिव्हाग्रीं उदरीं क्रमें करुनिया ठेवोत हो सत्वर ॥
मातें उत्सुकता नवीन कवना देतील मोदें अती ।
ही आशा धरितों प्रणाम करितों विद्वत्पदां संप्रती ॥ १ ॥

(स्वकृत.)

[गीति.]

'कविता असो कशीतरि, तात्पर्यावरिच सज्जनीं दृष्टी ।
द्यावी तेणें हावो, बालोक्तें तेविं तन्मनस्तुष्टी ' ॥ २ ॥

परशुरामपंत गोडबोले.

आश्रयदाते कृपा करतील तर आणखी कांहीं लेख प्रकाशित होतील.

सूचना—अशुद्धें वरींच राहिलीं आहेत, तीं पुढील आवृत्तीशिवाय दुरुस्त होणें शक्य नाहीं. याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

नामपूर जिल्हा नासिक
२।३।०९.

गोविंद एकनाथ गोसावी.
इनामदार पळसगांवकर.

अनुक्रमणिका.

(पूर्वार्ध)

उत्तरार्ध.

॥ श्रीशंवंदे जगद्गुरुं ॥

श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर.

काव्य.

(शैशव)

शार्दूलविक्रीडित.

श्रीमच्छंकर भूतनाथ सकलां भक्तां जनां व्हावया ।
आयासाविण दर्शनें निजगिरी कैलास सोडूनिया ॥
आला दक्षिणदेशिं तो मग क्षणीं जेजूरिमाजीं वसे ।
खंडोबा कुलदेव वत्सल असा मी त्यास वंदीतसें ॥१॥

गीति.

हरि रामकृष्ण बोकिल । सद्गुरु शिष्यावरी करूनि दया ।
ब्रह्मरसा पाजिति जे । करुणाकर वंदितों गुरूस तया ॥२॥
सातारा जिल्ह्यामधिं । खेडेसें पळसगांव आहे जी ।
त्या मद्ग्रामीं राहत । होते हो एकनाथ चिमणाजी ॥३॥
ते जनक आणि जननी । हरिबाई साधुची असे दुहिता ।
फलटणकर बाप्पाजिंचि । ह्या मम पितरांस वंदितों आतां ॥४॥ ||
अल्पज्ञ मी असुनी । काव्य कराया समर्थ खास नसें ।
तरि बोबडे वच मुदें । विद्वद्रत्नापुढेंच बोलतसें ॥५॥
परगुण—परमाणूंचा । पर्वत करितात सर्व संत जन ।
त्या विद्वत्सुजनांला । सद्भावें मी करीतसें नमन ॥६॥

शार्दूलविक्रीडित.

आहे होळ म्हणून गांव सुरमा नामें नदीच्या तटीं ।
राहे खंडु तिथेंच वीरकर ज्या प्रेमें बघे धूर्जटी ॥
त्या गांवीं सकलांस मान्यच असे उत्साहि मोठाच तो ।
त्याला पुत्र दिला भला प्रभुवरें तद्वृत्त मी सांगतों ॥७॥

खंडू वीरकरास शूरवर हा होळांत मल्हारबा ।
झाला पुत्र तयास पाहुनि बहू संतुष्ट झालाचि बा ॥
बापाला परि सौख्य हें न बघण्या त्या ईश्वरें ठेविलें ।
मातोश्रीसह बालकास उघडें केलेंच दुःखा दिलें ॥८॥
भाऊचंद तिच्या हरूनि वतना संत्रासही द्यावया- ।
झाले सिद्ध, तदा निघे झडकरी भावाकडे जावया ॥
आली बंधुगृहीं पडूनि रडली त्या भोजजीच्या गळां ।
तेव्हां सांत्वन तो करूनि वदला सांभाळ तूं हा मळा ॥९॥

स्रग्धरा.

शेता-भातांत माता प्रतिदिवशिं खपे मातुलोऽजा मुलानें ।
राखाव्या या क्रमाला बहुत दिन अहो चालविलें प्रभूनें ॥
एके वेळीं सुताला भुजग–वरे–फणे–खालतीं पाहि माता ।
धापा टाकीत आली मग रडत कथी बंधुला दुष्ट वार्ता ॥१०॥

शार्दूलविक्रीडित.

ऐकोनी भगिनी–वचा झडकरी नागावरी भोजजी ।
हातीं थोर कुऱ्हाड घेउन निघे आला त्वरेनेंच जी ॥
आतां घाव फणीवरी उचलुनी हाणावयाचा परी ।
वल्मीकांत शिरे फणी न डसतां आले मुदें तें घरीं ॥११॥
माता उष्णजलें मुलाप्रति घरीं स्नानास घालूनिया ।
घाली भोजन विप्र आणुनि पुसे " हें काय आहे " तया ॥
तेव्हां विप्र वदे तिला " नशिब हें हा पुत्र पृथ्वीपती ।
होवोनी तुज सौख्य देइल बये " ऐकोनि हर्षे अती ॥१२॥
भावाला कथिलें तिनें द्विज तिला जें बोलला चांगलें ।
त्या रात्रीं पडलें तयास तसलें सुस्वप्न ऐका भलें ॥
" खंडेराव बघावयास चढलों वाटे तया पर्वतीं ।
झाडी किर्र रजें भरी दशदिशा वारा सुटेही अती " ॥१३॥
" तेव्हां दीपक-तेजही चहुंकडे भासावया लागलें ।
वीणा-टाळ–मृदंग–नाद सुखद श्रोत्रीं मुदें ऐकिलें ॥

---

१ बाप. २ मामाच्या मेंढ्या. ३ मोठ्या नागाच्या फडे-खालीं.
४ बहिणीच्या बोलण्यास. ५ वारुळांत.

श्री–मार्तंड–गुणानुवाद मुरळ्या मोठ्या मुदें कोमला ।
वर्णाया सजल्या मला श्रवुनि तें आनंद झाला भला" ॥१४॥
" एकीनें मजला करीं धरूनिया अन्यस्थळातें चला ।
नेलें बोलुनि तो भयंकर असा आवाज मीं ऐकिला ॥
तों तो पर्वत भंगला मज दिसे मार्तंड सिंहासनीं ।
झालेला उपविष्ट तो दिसति ह्यो ते देवही तद्वनीं " ॥१५॥
" त्याच्या संनिध वृद्ध भक्त दिसला बोले मला तो भला ।
भाचा भूपति खास होइल तुझा, लौकीकही चांगला– ॥
त्याचा होइल, नाग आज डुलला त्याच्या शिरीं भव्य रे ।
हे त्याचे श्रवणांत शब्द पडतां झालोंच जागा बरें ॥१६॥
" हे देवा परमेश्वरा जंव तुझी आहे कृपा पामरीं ।
तेव्हां तो यम हा किती ? करिशि तूं रावास रंकापरी ॥
रंकाचा नृप तो प्रभो बनविण्या नाहींच वेळा तुला " ।
ऐसा सत्स्तव[1] मातुलें करुनिया शंभू तदा वंदिला ॥१७॥
भाचाला कथि भोजजी मग मुला रानीं वनीं थोरवी ।
मेंढ्या पाळुनि लाभते नच कधीं अश्वावरी पैरवी ।
ठेवी तूं घरच्या, तदा शिशु शिके अश्वास फेंकावया ।
पट्ट्याचा मग खेळ कुंतें[2]हि तसा फेंकूनि मारावया ॥१८॥

मंदाक्रांता.

कंठा[3]जीच्या जवळ दिधलें मातुलें त्या मुलाला ।
युद्धामध्यें प्रविण करण्या प्रार्थिलेंही तयाला ॥
मल्हारीही उपकृति पुढें वैभवीं पूर्ण त्याची ।
बांडा झेंडा स्वचमुमधिं तो लावुनी फेडि साची ॥१९॥
तेथें बांडा ध्वज फडकतो इंदुरीं तो अजूनी ।
खासा गाशा मिळत बसण्या वंशजा, चाल जूनी ॥
चालू आहे स्मरण कदमाचें असों वंशजाला ।
मल्हारी तो विभवसमयीं फार हो नम्र झाला ॥२०॥

शार्दूलविक्रीडित.

ज्यानें बाहुबलें दणाणुनि दिलें या भारताला, खलां ।
मारूनी सगळ्या, अविंधनृपती हातामधीं आणिला ॥

---

१ चांगली स्तुती. २ भाला. ३ कंठाजी कदम बांडे.

तेव्हां जो यवनास शुद्ध यमुनाभ्राता[1] असा भासला ।
तो हा शैशविं बारगीर कदमापाशींच होता भला ॥२१॥
पुत्राचें यश शुभ्र तज्जननिला स्वर्गांत ऐकावया ।
धाडी ईश्वर मातुलें मग मुला सांभाळिलें हो तया ॥
शाहूनें सचिवाधिकार इकडे बाळजिपंता दिला ।
तैं तो सैन्य जमा करून सगळें म्लेंच्छांवरी चालला ॥२२॥
होते त्यांत पवार ते धनगरा हो सोबती घेउनी ।
मामानें मग पाहुनी शिशुचिही इच्छा मनापासुनी ॥
आज्ञा देउनि पांढऱ्या-जवळ त्या मल्हारिला ठेविलें ।
ओनाम्यास तदा लढाइ मधल्या त्यानेंहि आरंभिलें ॥२३॥

स्रग्धरा.

ही स्वारी खानदेशा–मधुनि निघुनिया नर्मदेच्या तटाकीं ।
आस्ते आस्तेच आली, परि गज[3]पुरीला अश्व वेगेंच फेंकीं ॥
सारी ती फौज आली चमुंपतिसह हो दिल्लीच्या आसपास ।
विश्रांती पेशव्यानें मग बहु दिधली आपुल्या तैं चमूस ॥२४॥
एका संस्थानिकाशीं तहहि ठरविला, त्यांत होता ठराव– ।
"कांपूं आह्मी पिकाला–नच" परि तह हा मोडि मल्हारराव ॥
तो कापी त्या पिकाला हयवर अपुला पुष्ट व्हावा ह्मणून ।
घाली खाया हयाला, पण गडबड तैं सर्व गेली उडून ॥२५॥
गोंगाटा पेशव्यांच्या श्रवणिं पडुनिया बाजि तत्पुत्र आला ।
पाहायाला, बघुनी–नविन पिकच तें मारि तत्सेवकाला ॥
मल्हारी पाहुनी हें चरिप्रति वळतां लाल होवोनि कोपें ॥
बोले "कां मारितां हो; तव अनुग नसे." फेंकि लोष्टास तापें॥२६॥

शार्दूलविक्रिडीत. (कालापक[4])

खाऊनी गर्म बाजिराव अपुल्या बापास सांगे कथा ।
हें बेबंद असेच सैन्य यश ना लाभेल हो सर्वथा ॥
तेव्हां गोट लुटूं असें ठरविलें बाळाजिनें त्या उद्यां ।
मल्हारीस कळे जमा करुन तो लोकांस बोलेच या-॥२७॥

---

१ यम. २ पांढरे आडनांवाचे कोणी एक गृहस्थ. ३ दिल्लीला ४ चारश्लोकांनीं पुराअर्थ होत असल्यास त्या चार श्लोकांस 'कालापक' म्हणतात.

युद्धाला अथवा पळून आपुल्या गांवास जा हो त्वरें ।
गेले कांहिं परंतु वीस टिकले जाळूनिया खोगिरें ॥
धैर्या सोडुं नको तुला मदत मी आहें असे त्याजला ।
बाराशें चमुनायकें[1] कथियलें. बाळाजिला बोलला ॥२८॥
"ज्यानें ढेंकुळ मारिलें, अरिस तो युद्धांत जिंकावया ।
साह्या देइल तो बहूत; करितां मारूं नका हो तया ॥
आहे सिद्ध, मरावयास निधडा तो वीर मल्हारजी ।
युद्धा देउनि तो मरेल इतुकें धारिष्ट त्याच्यांत जी "॥२९॥
"त्याला साह्य करावयास दुसरे जातींतले लोक ते ।
होतां सिद्ध, नडेल खास करितां बोला कसें काय तें "॥
बाळाजीप्रति मान्य होउन पुढें मल्हारबाला धन ।
सामाना-करितां बहूत दिधलें तैं शुद्ध झालें मन ॥३०॥
मल्हारी धन घेउनी निजचमूमध्यें शिपाई भरी ।
तेव्हां शंभर स्वार नोकरीसही ठेवूनिया तो करीं-॥
घेऊनी तरवार युद्धसमयीं सर्वांपुढें होउनी ।
भारी युद्ध करी धन्यास सुखवी म्लेंच्छांप्रती जिंकुनी ॥३१॥
जेव्हां युद्ध पुरें करूनि सगळें तें सैन्य मागें फिरे ।
बाजीराव नदीतटीं उतरला एका दुपारी त्वरें ॥
जेथें आम्रतती मनोहर असे छाया तसी गर्दही ।
वाहे स्वच्छ जलौघ पाहुनि बहू आनंदला ही मही ॥३२॥
मल्हारीहि चुकूनि स्वार अपुले आला तिथें घेउनी ।
बाजीतें बघुनी मनांत जळुनी बोले तया लागुनी ।
"हा भाला तुज मारितों बघुं अतां संरक्षणा कोण रे ।
येतें त्या दिनिं ढेंकळास तुजला मी मारिलें बा त्वरें "॥३३॥
बाजीराव तदा हसूनि वदला " तेव्हां तुला हेतिनें[2] ।
मीही ठार करावया न चुकतों आतां पुरें बोलणें ॥
तूं बाका दिसतोस वीर मजला चित्तांतही निर्मल ॥
मी आहें तुज सुप्रसन्न करितां जेवावया ये चल " ॥३४॥

शार्दूलविक्रीडीत.

तेव्हां राग सुशांत होउन जरा मल्हारबा बोलला ।
"आहे चित्त तुझें हिरे विमल तूं दे भाक बाजी मला "॥

---

१ एक हाटकर धनगरानें. २ तरवारीनें.

" तूं तें मी सरदार थोर करुनी वागेन मित्रापरी ।
येतां ती मज पेशवाइ " वदला[१] बाजीहि मैत्री करी ॥३५॥
तेव्हां स्नान करून भोजन करी मल्हारि त्याच्यासवें ।
बंधूच्यापरि वागले उभयतां, श्रीमंत ते पेशवे ॥
याची जाणुनि योग्यता चढविती भाग्यास भारी तया ।
बाजीचे सुत नित्य यास वदती काकाच मानूनियां ॥३६॥
संगे स्वार शिपाइ घेउन पुढें आला तळोद्यास तो ।
मामाच्या जवळीं धनास दिधलें वंदूनि त्या बोलतो ॥
" मामा ह्या तुमच्या कृपेस्तव मला युद्धांत मोठा जय ।
लाभूनी धनही मिळे यश मिळे घ्या सर्व हा आशय "॥३७॥
होती एक सुता हुशार बरवी कामामधें दक्ष जी ।
नामें गौतमि ती तयाप्रति मुदें अर्पी तदा भोजजी ॥
केलें लग्न महोत्सवास बरवें कन्याहि आनंदली ।
वीराची जननी तसीच वनिता हें नाम जी लाधली ॥३८॥
मामीचें नव्हतें मुळींच मत या तेव्हां मनीं ती जळे ।
आंतूनी करुनी सदा कुरकुरी बोले कधीं आगळे ॥
चित्तीं घेउनि तत्कृतीस, पुसुनी मामास राहे सुधी[३] ।
येऊनी बडवाणिला सबल[४] तो तद्भूपतीसन्निधीं[५] ॥३९॥
आली फौज लढाइला बढवणी-ला पेशव्याची चलाँ[६] ।
मोर्चेबंदि करूनि तन्नगरिला[७] वेढा तिनें जैं दिला ।
तेव्हां दीड हजार फक्त चमुला मल्हारि घेऊनिया ।
मोर्चे मोडुनि सैन्य जर्जर करी फेटाळुनीही तया ॥४०॥
झालें त्रस्त समस्त सैन्य बघुनी पत्रें चमू-नायकें[८] ।
बाळाजीप्रति लीहुनी कळविलें " मल्हारबा नायके[९] ।
राजाची कितिशी बिशाद परि हा मल्हारबा साह्य तें ।
देतो त्याप्रति हो ह्मणून यश ना आतां मला लाभतें"॥४१॥
बाळाजी बघतांच पत्र समजे हा शूर कां तैं सचे ।
मल्हारीस लिही " तुह्मी प्रमुख ते आहां तिथें आमुचे ॥

---

१ बोलला. २ आदर करून. ३ चांगल्या बुद्धीचा. ४ सैन्यासह. ५ त्या बढवाणीच्या राजाजवळ. ६ चपळ. ७ त्या बढवाणीला. ८ सेनापतीनें. ९ ऐकत नाहीं.

खंडाचा करूनी ठराव अमुची सेना करा पोंचती " ।
स्वारी खर्च तसाच खंड मग तो धाडूनि घे पावती ॥४२॥
ऐसा शूर असो सुवीर बरवा मल्हारबा संग्रहीं ।
बाळाजीस असें मनीं गमुनिया संतोषुनी त्या लिही ।
तुह्माला पदरीं सदैव आमुच्या ठेवावया इच्छितों ।
धाडा यास्तव आपुला मनुजही बोलावयालागिं तो ॥४३॥

मंदाक्रान्ता.

मल्हारीनें उलटुन तया धाडिलें पत्र एक ।
" मामाचा मीं अनुग[2] ह्मणुनी मागणें त्यास ठीक " ॥
बाळोजी हा चतुर परभु भोजजीच्या कडेस ।
मागायाला द्विजचमुप तो धाडि बाळाजि खास ॥४४॥

स्रग्धरा.

द्यावे या भागिनेया[3] तर मुल मजला दूर होतें, न द्यावें ।
श्रीमंतांची अवज्ञा तरि मज घडुनी, तद्धिताला[4] मुकावें।—।
मातें लागेल ऐशा करुनि निजमनीं पौक्तशा तें विवेका ।
बोले घेऊनि जावें मग लिहिहि तसें जावया त्याहि तोका ॥४५॥
मल्हारी मातुलाची श्रवुनि अनुमती तोषुनि चित्तिं भारी ।
यायालागीं पुण्याला झडकरिंच करी आपुली तो तयारी ।
येऊनी भेटतां तो द्विजवर करुनी पूर्ण सत्कार त्याला ॥
ठेवूनी घेतला तो मग पदरिं हिरा जो प्रकाशी धन्याला ॥४६॥
सत्राशें-वीसमध्यें प्रथिततर[5] असा पेशवा फार लोकीं ।
बाळाजीपंत जो, तो त्यजि सकल निघे जावया स्वर्गलोकीं ।
बाजीरावास तेव्हां जनक-पद मिळे, शस्त्र वस्त्रें तुरेही ॥
शाहू देऊनि त्याला प्रमुदयुत[6] करी बाजि येई स्वगेहीं ॥४७॥

शार्दूलविक्रीडित.

त्याच्यानंतर माळव्यांत करुनी स्वाऱ्या बऱ्या तीनदां ।
आणी पुष्कळ लूट बाजिसह तो मल्हारि होता तदां ॥
हेतू माळव सर्व काबिज पुरा केल्यास दिल्लीवरी ।
जातांना सुलभत्व येइल परी इच्छा न झाली पुरी ॥४८॥

---

१ वाटून. २ चाकर. ३ भाचा जो मल्हारराव त्याला. ४ त्याच्या हिताला. ५ प्रख्यात. ६ आनंदित.

स्रग्धरा.

बांड्यांचा बाजिराया-सह कलह जुपे सुज्ञ एका प्रसंगीं ।
थोड्याशा कारणानें करिं असि धरिते जाहले त्याच जागीं ।
तेव्हां मल्हारबानें मधिं शिरुनि तयां शांत केलें स्वभावें ॥
बोलें तें क्षुब्ध वीरां-प्रति उचित असें, वाचकीं ध्यान द्यावें ४९

स्रग्धरा.

" एकीनें आज आम्ही सकल अरि[1] मथायास झालों समर्थ ।
टेकीला आणिला तो गजपुर-नृपती[2], काय भांडूनि अर्थ ॥
एकीचा नाश होतां यदुकुळ सगळें नष्ट झालें तसेंच ।
गेले गांधार[3] नाका[4] छलक बहुत तो कंसही दुष्ट साच ॥५०॥

शार्दूलविक्रीडित.

" तुह्मी घोर अनर्थ काय करितां चित्तीं विचारा करा ।
शेंडी देउनि मुंडनास करुनी ती म्लेच्छता पत्करा ॥
ते सारे मग नीच, भव्य तुमचीं देवालयें फोडुनी ।
तेथें त्या मशिदी उभारतिल हो देवांप्रती फेंकुनी " ॥५१॥
" एकीला जर आज फेंकुन तुम्ही बेकी कराया-प्रती ।
हट्टा पेटुन लागलां तर उद्यां म्लेंच्छादिकांना अती-॥
सोपें जाउन ते तुम्हांस अपुल्या दासापरी मानुनी ।
कन्या स्त्री सुन यांस बाटवुनिया नेतील घ्या हें मनीं " ॥५२॥
" वीरांनो सुख, राज्य आणि तिसरें स्वातंत्र्य जें भोगितां ।
व्हाया प्राप्त तुम्हांस पूर्वज किती गेले लया पाहतां ॥
ज्यांनीं थोर लढाइला करुनिया शत्रूप्रती जिंकिलें ।
त्यांचे वंशज खास आपण तरी मूर्खत्व कां जोडिलें " ॥५३॥
" झालें हें सगळेंच साध्य अपणा स्वातंत्र्य त्याला झटा ।
राखायास तसेंच दुष्ट यवनीं झुंजा तयांना पिटा[5] ॥
ताटाखालिल मांजरें बनुनिया पाजी जनां ना नमा ।
गाजी होउन राजि राखुन प्रजा आणा घरीं फार मा " ॥५४॥
" आतां जी करितां सशस्त्र बनुनी आजी असें नाशक ।
पाहां मित्र पढें तयांस वधुनी घेतां कसें पातक ॥

---

१ शत्रु. २ दिल्लीचा बादशाहा. ३ कौरव. ४ स्वर्गास. ५ ठोका.

हा आवेश तसेंच शौर्य तुमचें शत्रू-पुढें दाखवा ।
मित्रा मारुनिया कलंक पदरीं घेतां कसा हा नवा " ॥५५॥

स्रग्धरा.

" धर्माची चाड तुम्हां तसि धवल यशा-ची तरी हो करावा ।
हल्ला शत्रूवरी तो करुनि पिटवुनी त्यास हट्टेंच लावा ॥
शाहूचा भव्य झेंडा फडकवुनि इथें मान्य व्हा पूर्वजांना ।
व्हा तुह्मी दूर आतां सकल विषमता सोडुनी भांडणांना " ५६
या त्याच्या भाषणानें कलह मिटुनिया शांत झाले सुवीर ।
बाजी सानंद झाला श्रवण करुनि हे वानि मल्हारि फार ॥
केला हल्ला तयांनीं समर तुमुल तैं खानदेशांत झालें ।
दाऊदाशीं लढूनी विजय मिळवुनी स्वा गृहालागिं आले॥५७॥
मोडी मल्हारि तंटा सकल चमूंमधें वाढवा थोर एकी ।
युद्धामध्यें प्रमोदें हयवर अपुला अग्रभागींच फेंकी ॥
खड्गानें मस्तकांना उडवुनि अरिच्या कंदुकांच्या-परी तो ।
फेंकी आकाशमार्गीं समरधुरधरी पेशवा मान दे तो ॥५८॥

शार्दूलविक्रीडित.

व्हावी साच तयास भाक दिधली बाजी म्हणूनी मुदें ।
मल्हारीस नृपाकडून सनदा चौथाईच्या त्यास दे ।
तैसी देशमुखी तयास दिधली मोकास-बाबींतला ।
अर्धा भाग चमूस त्यास दिधला शाहूनृपें निर्मला ॥५९॥

शैशव नामक प्रथम सर्ग समाप्त.

द्वितीय सर्ग.

(वीरप्रतिज्ञा-सिद्धि.)

—:०:—

स्रग्धरा.

मल्हारी घेउनीया द्विज चमुपति तो एक गोदावरीच्या ।
कांठीं हल्ला निजामावर करिच बहु युद्ध झालें, तयाच्या-॥
सेनेचें अन्न पाणी अडवुनि धरिलें गाय झाला नबाब ।
बोले सल्ला 'करोजी' मग तहहि करी पेशवा बाजिराव ॥१॥

---

१ शुभ्र. २ आपल्या घरीं (पुण्यास). ३ सैन्यांत. ४ श्रेष्ठ घोडा. ५ अघाडीस. ६ चेंडूप्रमाणें. ७ युद्धांत पुढारी. ८ तो ब्राह्मण (पेशवा).

शार्दूलविक्रीडित.

झालें युद्ध सुरू तदा चमुमधें दुष्काळ मोठा पडे ।
अन्नावाचुनि सैन्य तें तडफडे पाण्याविना ही रडे ॥
त्यामध्यें सण यावनीहि[1] पडला तेव्हां निजामें तया ।
केली कीं विनती " चमूस अमुच्या अन्नास धाडून द्या "॥२॥
बाजीराव पुरा दयाघन तसा धार्मीक योद्धा असे ।
रुग्णांच्या[2], क्षुधितां[3], तसेंच शयितां[4], शत्रू सवें हो कसें ! ॥
झुंजावें म्हणुनी तयास पुरवी दाणा तसी वैरण ।
शत्रू स्तुत्य बघूनि कृत्य असले सल्ला करी आपण ॥३॥

स्रग्धरा.

एकोपा पूर्ण होतां मग यवन तया बोलवी भेटण्याला ।
प्रासादीं[5] आपुल्या तो द्विजपतिहि निघे राजवाड्यांत आला ॥
संगें मल्हारि खासा परिजन[6] म्हणुनी घेतला बाजिरावें ।
बैसे जाऊनि त्याच्या जवळ करि सलामास शोभे प्रभावें[7] ॥४॥
होता तेथें झनाना[8] बहु ललित[9] असा, पाहुनी सुंदराला ।
बाजीरावास झाला प्रमुदित[10] विनयें बेगमेनें तयाला ।
उंची पोषाख तैसा स्वकरकृत[11] असा एक तांबूल भारी ।
देऊनी तुष्ट केला, मग निजशिबिरा पातली हीहि स्वारी ॥५॥

शार्दूलविक्रीडित.

सातार्‍यास पुढें स्वसैन्यसह तो बाजी नृपा[12] भेटुनी ।
झालेली सगळी हकीकत वदे शाहूप्रती वंदुनी ॥
मल्हारी श्रम फार घेउन लढे शौर्यास भारी करी ।
शाहूनें म्हणुनी तया परगणे बारा दिले सत्वरीं ॥६॥
जावें माळवि[13] स्वाधिकार बघण्या मल्हारि आज्ञापिला ।
बंदोबस्त पवार पाहत असे त्याचा[14] उदाजी भला ॥
दाभाड्यापरि तो पवारहि करी ह्या पेशव्याशीं अती ।
वैरत्वाप्रति आणि त्या हुकमती ऐकेच ना दुर्मती ॥७॥

---

१ मुसलमानांचा. २ अजारी. ३ भुकेला. ४ निजला. ५ राजवाड्यांत. ६ सेवक. ७ तेजानें. ८ अंतःपुर (स्त्रीजन). ९ सुंदर. १० आनंदित. ११ आपल्या हातांनीं केलेला. १२ शाहूला. १३ माळव्यांत. १४ माळव्याचा.

हें जाणूनि लिहीच बाजि चतुरा मल्हारबाला असें ।
तुह्मी फौज बरीच वाढवुनियां पाहा व्यवस्था कसें ॥
खर्चासाठिं पुनः तुह्मा परगणे सत्रा दिले सत्वरें ।
ही आज्ञा मिळतां चमूंत भरती केली नवी त्या नरें[1] ॥८॥
तेव्हां दाय बहादूरा यवनपें[2] तेथें सुभेदार त्या ।
होतें नेमुन ठेविलें, स्थिति अशी प्रांतांत होती तया ॥
दाभाडे करि वैर फार मग तो झाला निजामासही ।
पाजी दुष्ट फितूर एक डभई एथें करी आजि[3] ही ॥९॥
तामध्यें मृत होइ त्रिंबक पुढें तद्बंधु तें चालवी ।
सेनानीत्व[4] बरें तदा मग निघे तो पेशवा माळवीं ॥
ह्ल्ला दाय बहादुरावरि करायाला तदा ठेववी ।
मल्हारीकडुनी चमू द्विजपें[5] तो ताज्या दमाची नवी ॥१०॥
बाजीराव निघे चमूसह पुढें गोदावरीच्या तटीं ।
मल्हारीहि मिळे तयास पृतना घेऊनिया रानटी[6] ॥
झाली भेट तिथें पुढें उभयतां जाती उदाजीप्रती ।
भेटायास पवार तो शिरपुरीं आला तदा दुष्कृती[7] ॥११॥

स्रग्धरा.

बाजीरावास वाटे चमुसह पदगीं हा उदाजी रहावा ।
शाहूला सेवुनीया परि नच रुचलें हें तयालागिं तेव्हां ॥
बाजी पागोटि ठेवी पदरहि पसगी मान्य व्हावा ह्मणून ।
मल्हारीहि तयाला बहुपरि विनवी व्यर्थ झालाचि शीण ॥१२॥
मल्हारी लाल झाला कर धरुन वदे बाजिरावा नमून ।
" येथोनीया उठावें, जर कुणबट हें नाहीं आलें ह्मणून ॥
होईना कां लढाई प्रभुवर यश तें खास देईल साच " ।
बोलोनी ते निघाले मग निज शिबिरा पातलेही तसेंच ॥१३॥
झाली ही चूक मोठी ह्मणून मग कथी रार्म[8] तो त्या पवारा ।
मल्हारी शूर भारी मिळविल जयही साह्य व्हावेंच शूरा ।

---

१ पुरुषानें (मल्हारबानें). २ दिल्लीच्या बादशाहानें. ३ युद्ध. ४ सेनापतित्व. ५ तो ब्राह्मण प्रभू बाजीराव. ६ रानटी फौज. ७ वाईट करणीचा. ८ रामराव केशव कवठेकर (उदाजीचा कारभारी).

ही त्याची पोक्त वाणी श्रवण करुन तो नर्मदेच्या तटाकीं ।
भेटे जाऊनि त्यांना द्विजहि करि दया द्वेषही सर्व टाकीं ॥१४॥

शार्दूलविक्रीडित.

राजस्तानपती तसेंच दुसरे कंटाळले यावनीं[1] ।
डोईपट्टिस ते कटा करिति कीं म्लेच्छाप्रती जिंकुनी ॥
हिंदूचें करूं राज्य आपण अशा किंवा मराठ्याप्रती ।
जाऊनी मिळुं या ह्मणूनि पृतनाऽधीशासही नेमिती ॥१५॥
केला मुख्य धुरीण त्या नृपतिनीं राजा सवाई खरा ।
होता शूर धरा प्रकंपित करी वीर्यें असा तो हिरा ॥
तो जैसिंग चमूस घेउन सवें देवाचिया दर्शना ।
आला तो मिष दाखवूनि वरतीं वत्साचिया[2]-पत्तना ॥१६॥
त्यानें तेथुन धाडिलें लिहुनिया मल्हारबाला असें ।
तुह्मी दाय बहादुराप्रति स्वयें जिंकाल तैं मी असे ॥
तुह्मां साह्य; करा त्वरा अरि धरा मारा तयाला प्रभू ।
झाली त्रस्त बहूत शूरवरही या म्लेच्छभारेंच भू ॥१७॥
आहे साठ हजार स्वार पदरीं पादातिही चाळिसे[3] ।
तोफा तीनशतें प्रवीर असला आणा तया जेरिस ॥
त्यांनीं योग्य करूनिया मसलती बाजी पुण्या धाडिला ।
तैसा खजिन धाडुनी मग तिथें मल्हारबा राहिला ॥१८॥
तैं रेवा[4] भरली तुडुंब तिजला जावें कसें आपण ।
ओलांडूनि असा विचार पडला मल्हारबाला पण ॥
भेटे त्या मग नंदलाल कळवी उद्देशही आपला ।
मल्हारी वदला प्रभू करिल तें न्या पैल तीरा मला ॥१९॥
तेव्हां तो उतरी नदी मग करी मल्लारि हल्ला भला ।
बंदोबस्त करूनि कार्य मग तो धारे-मधीं राहिला ॥
सैन्याच्या सह हा पवार मग ये त्याच्या चमूसंनिध ।
मल्लारीचमु सावधान अरिची होतीच बेसावध ॥२०॥

स्रग्धरा.

केला हल्ला त्वरेनें हरहर म्हणुनी शूर मल्हारबानें ।
निद्रिस्ताला न देई उठुंच अगदिंही बैसलेल्यास त्यानें ॥

---

१ मुसलमानी. २ धारेस. ३ चाळीस हजार. ४ नर्मदा.

राहूं नाहीं दिलेंही जमिनिवर उभें, जे उभे त्यास हालूं ।
मल्हारीनें मुळींही नच मग दिधलें लागला शूर शोभूं ॥२१॥
शत्रूंचा तोफखाना करगत करुनी ठार केले शिपाई ।
तो आला दाय–युद्धा प्रहर-भर लढे चालली थोर घाई॥
दायाला शूर वीरें करिवारच तदा ठार केलें पळालें ।
बाकीचें सैन्य तेव्हां समरविजयि ते शूर धारेस आले ॥२२॥
श्रीमंतांचीच द्वाही फिरविलिहि तिथें लौकिका गाजवूनी ।
नेमी तेथें विठोजी अवनें[1] जनपदाचेंच व्हावें म्हणूनी ।
येवोनी उज्जनीला अमल सुरु करी पेशव्यांचा तिथेंही ।
एका छाप्यांत लाभे सहज जय असा सद्दिचा जोर पाही॥२३॥

शार्दूलविक्रीडित.

मल्हारें मग इंदुरास मजला द्यावें असें प्रार्थिलें ।
श्रीमंतास उदार त्या नरवरें तेंही तयाला दिलें ॥
शाहा[2] माळव देशिं पाठवि तदा त्या बंगषा सत्वरीं ।
हल्ला येउनि तो करी झडकरीं बुंदेल-खंडावरी ॥२४॥

स्रग्धरा.

तेव्हां त्या छत्रसालें[3] सदय नृपवरा शाहुलागीं विनंती ।
केली कीं बाजिराया विनय नत मला साह्य द्या या+ गती ती ।
झाली आहेच आधी[4] करि-नृपति-प्रती जेंवि नक्राकडून ।
यासाठीं रक्षणाला करुन यश मला द्याल तुम्ही कुलीन ॥२५॥

शार्दूलविक्रीडित.

ऐकोनी विनती करी नृपति तो आज्ञा तया पेशव्या ।
युद्धा थोर करा चिराच यवना रक्षा नृपाला नव्या ॥
भारी सद्यश घ्या निघे मग अती वेगें तयाच्या वरी ।
किल्ला वेढुनि काढिला जल तसें अन्नास बंदी करी ॥२६॥
होता वीर खरा धुरंधर परी जैतापुरीं कोंडला ।
भारी तो लढला उपाय हरला अन्नामुळें खंगला ॥
झाला सिद्ध तहास तो धरुनिही दांतीं तृणाला परी ।
त्या बाजी वदला करूनी अचलों–वेषास ये सत्वरी ॥२७॥

---

१ रक्षण २ दिल्लीचा बादशाहा ३ बुंदेलखंडच्या राजाचें नांव ४ आली आहे ५ गजेंद्रास ६ स्त्रीवेषास + या बाजिरायास.

तेंही त्या यवनें करूनि सुटका केली स्वतःची बरें ।
बाजीराव निघे नृपास तिथल्या भेटावया सत्वरें ॥
तो राजा सरदार घेउन सर्वे सन्मूख[1] आला तया ।
सत्कारा करुनी वदे द्विजवरें केली बहू ही दया ॥२८॥
राजानें दरबार तैं भरविला मोठा म्हणाला मला ।
हे जैसे प्रिय दोन पुत्र तिसरा बाजीहि हा चांगला ।
लक्षांचें द्रव्य[2] त्या सपाद दिधलें बक्षीस प्रांताप्रती ।
राज्याचा तिसराहि भाग पुढतीं द्याया लिही सत्कृती ॥२९॥

स्रग्धरा.

जातांना छत्रसालाप्रति मदत तया-संगतीं ब्राम्हणाचा ।
गोविंदा खेर नामें तरुण बहुमुदें चालला, धाडसाचा-॥
साठा मोठाच वाटे फुरसत न मिळे खावया त्यास अन्न ।
एके वेळीं शवाच्या[3] अनलिं शिजवि तो अन्न घाई म्हणून ३०
हें त्याचें कृत्य सारें बघुनि नवल त्या वाटलें पेशव्याला ।
हा मोठा कार्यकारी निपजुनि अपणा साह्य होईल त्याला-॥
बोलावूनी तयानें हकिकत पुसली नांवगांवादिकांची ।
प्रांताची[4] शौर्य पाही अधिकृतिहि[5] दिली पेशव्यानें नव्याची ॥३१
त्या वृद्धा छत्रसालाप्रति पुसुनि निघे पेशवा दक्षिणेला ।
मार्गामध्यें तयाचा जयपुर-नगरी-लाहि मुक्काम झाला ॥
भेटे त्याला सवाई नृपवर तिथला बाजि मागे तयाला ।
सैन्याचा खर्च तेव्हां नृपतिवर म्हणे साह्य होतों तुम्हांला-*॥३२॥

शार्दूलविक्रीडित.

पूर्वीं दायबहादुरावरि यदा मल्हारबा तो भला ।
मोठें युद्ध करूनि कीर्ति मिळवी त्याचा तुम्ही चांगला- ॥
माझा हा उपकार फेडुन मला खर्चासही मागतां ।
बाजीराव पुन्हां करा पुरवठा बोलेच तें ऐकतां ॥ ३३ ॥
आम्ही जें धन आपणाप्रति मुदें देऊंच तें आपण ।
माना हें तुलसीदलापरि मनीं आहां तुम्ही ब्राम्हण ॥

---

१ समोर २ सव्वा दोन लक्षांचा मुलूख ३ जळत्या चितेवर ४ छत्रसालाकडून मिळालेल्या नव्या प्रांताचा ५ अधिकार * संबंध पुढील श्लोकांत.

बाजीनें लिहिलें तया पुनरपी धाडा धनाला बरें ।
देऊं तीर्थ तुम्हांस पापहर जें घेऊनि द्रव्या त्वरें ॥ ३४ ॥

स्रग्धरा.

पुण्यग्रामास गेले मग विनवि मला[१] पेशव्याला तयालां ।
द्यावा पाग्या तसाची भरजरि पटका तंबु तो राहण्याला ॥
खासा, शिक्के मला द्या द्विजवर बरवा कारभारीहि व्हावा ।
राणोजीलाहि पाग्या मजप्रति विभुनें देउनी तोषवावा ॥३५॥
बाजीनें मान्य केलें प्रतिनिधिहि दिले दोन खासे तयांला ।
शिंद्यांचा कारभारी करि अरवलिच्या रामजी बाबजीला ॥
मल्हारीचा तसाची बहु चतुर[३] असा पेशवा कारभारी ।
शिक्के देईच डेरा मग नरवर तो खास त्याला कटारी ॥३६॥
पंचेचाळिस भाग त्या द्विजवरा बाजीप्रती वाटलें ।
साडेबाविस भाग होळकर तो घेई स्वतां आपले ॥
साडेबाविस भाग त्या सुचतुरें शिंद्यास देऊनि या-।
दाहा भाग उदाजीला मग दिलें वाटी असें माळव्या ॥ ३७ ॥

स्रग्धरा.

आम्ही नाचार[४] आहों म्हणुनि कम दिला भाग वाटे मनाला ।
बोले तेव्हां उदाजी प्रतिनिधिप्रति तो, रामरावें तयाला ॥
सांगोनी चार गोष्टी समजुत करुनी तेवढे घेववीही ।
मल्हारी फौज ठेवी बहुत तशिच तो राणुशिंदा नवी ही ॥३८॥

शार्दूलविक्रीडित.

शाहूच्या हुकुमावरून करितों स्वारीच शिद्धीवरी ।
पैशाची नड फार ती मज असे स्वाऱ्या करूनी दुरी- ।
तुम्ही ती करणें जरूर म्हणुनी त्या पेशव्यानें दिलें ।
त्यांना धाडुनि तो हुकूम निघती हेंही लुटूं चालले ॥ ३९ ॥
त्यांनीं चाल करूनि फार लुटला तो प्रांत वेगें अती ।
गांवें जाळुनि तो मुलूख लुटुनी आले हि अग्रयाप्रती ॥

---

१ मला (होळकराला) २ त्या (राणू शिंद्याला) ३ शहाणा (गंगाधर रामचंद्र चंद्रचूड खेडतालुक्यांतील नीमचा राहणारा) ४ गरीब ५ याचा कर्ता मी (बाजीराव) ६ शिंदे होळकरांना ७ शिंदे होळकर (राणोजी व मल्हारराव).

हें पाहोनि वजीर खान डवरा सल्ला करां बोलला[१] ।
आज्ञेवाचुन हें प्रशस्त करणें नाहीं वदे हा भला ॥ ४० ॥
तेव्हां खान लढाइला मुजफरा धाडी तयांच्यावरी ।
तो ढब्बू दिसण्यांत मात्र नव्हती सैन्यव्यवस्था बरी ॥
शिंदे-होळकरादि शूर लढती त्याच्या चमूशीं तया-[२] ।
फेंटाळनि दिलेंच कीं करिपुरीं सांगे बढाया भल्या ॥ ४१ ॥
मीं[३] केली खुप शर्त कीं उडविलें भारी हबेलंडिला ।
त्यांना मार बराच मी प्रभुरूपें देऊनिया चांगला ॥
होती वास्तव तत्स्थिती उलट कीं मारामुळें शत्रूच्या ।
आली धांवत स्वारि ही स्वनगरा प्राणांस रक्षावया ॥ ४२ ॥
ते भारी लुटिती जनांस करिती उद्ध्वस्त गांवें अती ।
राजांना कर मागती पळविती किल्लेकऱ्यांना किती ॥
किल्ले स्वाधिन ते करूनि अपुल्या जाती, पुढें सन्मती ।
खंडाचा लुटिचा अगण्य जमला पैसा पुण्या धाडिती ॥४३॥
राणोजीसह तेथुनी परतला आला लुटाया धना ।
मल्हारी गुजराथच्या नृपजनां तैसें दुजाही जनां ॥
केली लूट अपार धाडुनि दिलें तें द्रव्य त्यांच्याकडे[४] ।
झाले ते खुष पेशवे जित तदा देशा दिलें यांकडे ॥ ४४ ॥
बाजीला धन फार धाडुन दिलें प्रांता लुटूनी तरी ।
खर्चाला पुरलें न त्यास म्हणुनी बाजी स्वतां सत्वरीं ॥
संगें सैन्य अपार घेउन तदा रेवानदीच्या[५] तटीं ।
येवोनी बहु धामधूमहि करी, शिंदा जनांला लुटी ॥ ४५ ॥
सल्ला एक वकील ये करविण्या म्लेंच्छाकडूनी परी ।
मागे तैं धन पेशवा अति तया, सल्ला न हो सत्वरीं ॥
बाजीराव हळू हळूच शिरले प्रांतामधीं यावनी[६] ।
म्लेंच्छांना लुटिलें धना जमविलें तंबू दिले तद्वनीं ॥ ४६ ॥

उपेंद्रवज्रा.

विठोजी बुळ्याला दुजें जाधवाला ।
सवें घेउनी फार वेगें निघाला ॥

---

१ मल्हारराव २ मुजफरखानास ३ मीं (मुजफर-खानानें) ४ शिंदे-होळकरांकडे ५ नर्मदा ६ मुसलमानांच्या.

नदीपार मल्लारि येऊनि हल्ला ।
करी प्रांत संत्रस्त घेई धनांला ॥ ४७ ॥

इंद्रवज्रा.

हें लागतां वृत्त अविंधपानें ।
तो धाडिला सादतखान मानें ॥
आला त्वरेनें परि लाभ नाहीं ।
खाई अती मार विरुद्ध लीही ॥ ४८ ॥

स्रग्धरा.

" आम्ही मोठाच हल्ला करुन चमुपती आणि मल्हारबाला ।
केलें घायाळ भारी व्रण बहु करुनी मारिलेंही बुल्याला ॥
शत्रूची कांहिं सेना यमभगिनिमधीं मग्न झाली तशीच ।
आम्हींही ठार केली बहुत " लिहि असें बादशाहास नीच ॥४९॥

शार्दूलविक्रीडित.

" आम्हीं घालवुनी नदीपलिकडे बाजी द्विजाला दिलें " ।
ऐकूनी नृप तुष्टला यवन तो चित्तांत भारी खुले ॥
बाजीच्या वकिलाप्रती यवनपें आज्ञा दिली जावया ।
तो येई कथि बाजिला खवळला बाजी वचें त्याचिया ॥ ५० ॥
"म्लेंच्छप्रांत अजून फस्त करिती गांवें लुटूं लागती " ।
हें राजास कळावयास्तव तदा दिल्लीकडे धांवती ॥
होतो गोवध कालिकेजवळ हें जाणूनि मल्हारजी ।
घ्याया सूड अविंधलोकततिचा आला कराया अजी ॥ ५१ ॥
शिंदे आणि पवार अन्य सगळे एकत्र केले रथी ।
मल्हारी वदला तयां मग " लढा उत्साहयुक्तें अती ॥
थाटानें जमती अविंध सगळे निःशंक हो मारिती ।
गाईना, करितां वधाच यवनां सोडा दया संप्रती " ॥ ५२ ॥
" होतो गोवध बंद आणि दुसरी कीर्तीहि पावाल वा ।
मोठी शूर मराठि मंडळि असी, हा मान लाभा नवा ॥
द्रव्यप्राप्ति तुम्हास होइल अती तो गर्वही दिल्लिचा– ।
शाहा टाकिल हो म्हणून झटका या त्याजला हेतिचा ॥५३॥
" हे नाकावर पाय देउन पुरे युद्धार्थ अद्यापिही ।
उत्कंठायुत शूर चालविती हो हेतीं अती युद्धिंही ॥

---

१ बादशहानें २ आह्मी (सादतखानानें) ३ विठोजी बुळ्याला ४ यमुनेंत ५ लढाई ६ तरवारीचा ७ तरवारीला.

मी आतां पण सत्य एक करितों भूदार[1] मारूनियां ।
देतों टांगुनि त्या प्रसिद्ध मशिदी–मध्यें चला शूर या ॥५४॥

स्रग्धरा.

आला आवेश मोठा श्रवण करुनि हें वाक्य मल्हारबाचें ।
तैं सारे अस्तन्या त्या सर सर वरतीं सारती शूर बच्चे ॥
सर्वांनीं घोष केला हर हर ह्मणुनी सम्मती दर्शवूनी ।
श्रीमंतांनींहि[2] त्यांना अनुमति[3] दिधली तैं निघालेहि मानी[4] ॥५५
आज्ञा मागे तुकोजी[5] किरि[6] पकडुनि तो आणण्या पारधीला[7] ।
मल्हारी देइ आज्ञा प्रबल चमु[8] निघे ओंजिला[9] कालिकेला[10] ॥
यात्रा होती म्हणूनी यवनहि[11] निघती स्त्री-सुतांच्या समेत ।
मौजा मारावयाला रमत गमत ते पातले कालिकेंत ॥५६॥
काची भाचीस सांगे सकल फल विकी रास घाली धनाची ।
वाणी राणीस सांगे तिळ गुळ विकुनी आण संपत्ति साची ॥
माळी साळीहि तैसें बहुत विकुनिया माल संपन्न झाले ।
पेढे बर्फी फुटाणे जिलिबि विकुनिया हालवाईहि डोले ॥५७॥

शार्दूलविक्रीडित.

भारी सुंदर दर्शनीय दिसती तेथें दुकानें किती ।
दोहों बाजुंस रूपवान-तरुणी-संचार[12] होई अती ॥
कोणी वर्णन वस्तुचे करिती तैं मौल्यास कोणी पुसे ।
मार्गीं चालत बोलती चल मुला पाहा कसें हें दिसे ॥५८॥
कोणी हार तुरे तशा प्रिय चिजा घेऊनि पत्नीप्रती[13] ।
देती बालगणास खाउहि किती त्यांना किती चुंबिती ।
बर्फीचीं तबकें करीं धरुनिया मोदें जना वाटिती ।
औत्सुक्यें[14] रमती प्रमोद[15] उसळे चोहोंकडे तैं अती ॥५९॥
कोणी पानसुपारि माजुम विड्या मेवांहि[16] ते सेविती ।
चैनीनें सुरमा भरून नयनीं मोदें किती हिंडती ॥
कोणी नारिंकडे[17] मिशा पिळुनियां झाकीतहा पाहती ।
सालंकार[18] बनूनिया भुलविती नारी नरांना[19] किती ॥६०॥

---

१ रानडुकर २ पेशव्यानीं ३ कबुली ४स्वाभिमानी ५ तुकोजी होळकर ६ रानडुकर ७ शिकारीला ८ फौज ९ लढाईला १० कालिकेच्या जत्रेंत ११ मुसलमान १२ फिरणें १३ बायकोस १४ उत्कंठेनें १५ आनंद १६ मिठाई १७ स्त्रियांकडे १८ नटून १९ पुरुषांना.

स्रग्धरा.

काळा पोषाख भोपी करुनि निजगळां घालिती शुभ्र माळा ।
हातीं पोतास घेती मळवट भरिती दाटसा दिव्य भाळा ॥
हुक्का तोंडीं धरूनीं यवन[1] करिति तैं फार आनंद कल्ला ।
ऐशा आनंद--कालीं चमुसह करितो शूर मल्हारि हल्ला ॥६१॥
वेढा घालूनि त्यांना चमुस नरमणी[2] सिंहनादें ह्मणाला ।
" बाळांना बायकांना स्थविरें[3] त्यजुनियां शस्त्रहीना जनांला ।
घाला घाला सुवीरा--वरि चर चर ते कापुनी काढुनीया ।
टाका " ऐसी तदाज्ञा श्रवण करुनिया चालले ते लढाया॥६२॥

शिखरिणी.

मराठ्यांनीं मोठा हर हर असा घोष करुनी
झपाट्यानें हल्ला करुन यवनांनाहि चिरुनी ॥
ढिगारे प्रेतांचे अवनिंवरि[4] पाडूनि विपुल ।
दिलें धाडूनी त्या शमनगृहिं[5] म्लेंच्छांस बहुल ॥६३॥

स्रग्धरा.

मेळ्याच्या रक्षणाला यवन-नरपती धाडि जी फौज वेगें ।
शस्त्रास्त्रें सावरी ती चकमक करण्या धावली शत्रु-मार्गे ॥
काढी पाऊल मार्गे पळताचि सुटली खाउनी मार यांचा ।
मेले कित्येक योद्धे दडति कितिक तैं जाहला मोड साचा ६४
संपत्ती फार मोठी लुटुन मशिदिच्या आंत मल्हारबानें ।
मोठ्या वेगें घुसूनी कबरिवर किरी टांगिला तो त्वरेनें ॥
तेथेंही म्लेंच्छलोकां चर चर चिरुनी घेतला सूड खासा ।
अल्ला अल्ला मुखीं तैं यवन वदति कीं मत्युचा हाचि फांसा६५

शार्दूलविक्रीडित.

आले मुख्य तळास ते जलदिनें फौजेनिशीं आपुल्या ।
ह्यांच्या नंतर त्या चमू सकलही दिल्लीवरी चालिल्या ॥
दिल्लीपाल नृपास पत्र लिहिलें " येतां लढाईप्रती ।
सल्ला वा करुनी बरा यवनहो घेतां सुखांची तती " ॥ ६६ ॥

---

१ मुसलमानांस २ पुरुषश्रेष्ठ [मल्हारराव] ३ म्हातारे ४ पृथ्वीवर
५ यमाचे घरीं ६ मल्हारराव.

स्रग्धरा.

" आम्ही सल्ला कराया कबुल " यवनपें[1] धाडिलें उत्तराला ।
बाजी " धाडा वकीलाप्रति तह ठरवूं " लिहि प्रत्युत्तराला ॥
म्लेंच्छें "जिम्मा तयाचा मजप्रति मिळतां धाडितो मी वकीला"
लीहूनी धाडुनीया चमुतलेंहि[2] जरा लांब तो नेववीला ॥६७॥

शिखरिणी.

मराठ्यांनीं आह्मां भिउनि तळ हा शीघ्र गतिनें ।
दुरी नेला म्लेच्छा गमुनि लढण्याला जलदिनें ॥
तयारी केलीही मुजफर दुजा मीरहुसन ।
शिवासिंगा धाडी जय परि नये बेत फसुन ॥६८॥

स्रग्धरा.

वार्ता बाजीस ताजी सकल झडकरीं लागतां तैं सयाजी[3] ।
धाडी तो जाधवाला चमुस बघुनिया तोहि फेंकी स्ववाजी[4] ।
एका बाजूस शिंदा समर–चतुर[5] तो माळव्याचा अधीश[6] ।
धांवे मल्हारबाही फिरवुनि करि तैं खड्ग मारी अरीस ॥६९॥
त्यानें एका धडाक्या–सरसि यवन ते सातशें लोळवीले ।
कोंकाला[7] लाल केलें समरिं निजविलें त्या शिवाला[8] नृपालें ॥
तेव्हां तो खान वेगें मुजफर नगरा लागिं काढूनि पाय ।
मार्गे गेला पळूनी हयकरि[9] तति तैं लाभलें फार द्रव्य ॥७०॥

शार्दूलविक्रीडित.

तेव्हां त्या यवनाधिपें[10] " तह करा " ऐसें तया प्रार्थिलें ।
रेवारी–वरतीं परी निजचमू घेऊन हे चालिले ॥
" झालें कोंकणिं एक बंड म्हणुनी यावें तुम्ही सत्वरें " ॥
शाहाज्ञा[11] बघतां तहा करुन तो बाजी निघाला त्वरें ॥ ७१ ॥

गीति.

रोकड तेरा लाखा, घेउन पदरांत मोजुनी बाजी ।
मालव–पतित्व तैसें, संपादुनि ये नृपाकडे गाजी ॥ ७२ ॥

वीरप्रतिज्ञासिद्धिनामक द्वितीय सर्ग समाप्त.

---

१ बादशाहानें २ फौजचा तळ ३ सयाजीराव जाधव ४ आपला घोडा ५ युद्धनिपुण ६ धनी ७ मीरहुसन कोक ८ शिवासिंग ९ घोडे व हत्ती यांचा समूह १० दिल्लीचा बादशहानें ११ शाहूचा हुकूम.

तृतीय सर्ग प्रारंभ.

यवननृपप्रसाद.

—:०:—

शार्दूलविक्रीडित.

झालें तेज समूल नष्ट अपुलें जाईल पृथ्वीतला ।
वाटे राज्य अविंधपास मग तो योजी नव्या युक्तिला ॥
बोलावूनि निजाम दिल्लिस ह्मणीं द्यावी लढाई भली ।
बाजीशीं म्हणुनी तयारि बरवी होऊं तिथें लागली ॥ १ ॥
श्रीमंतास कळेहि बेत सगळा तेव्हां चमू लागली ।
स्वारी घेउनि सन्मुहूर्त दसरा पाहूनिया चालली ॥
होता तो नृप मालवाधिप सर्वे दिल्लीकडे जैं वळे ।
भोपाळास निजाम देउन तळा बैसे असें तैं कळे ॥ २ ॥

स्रग्धरा.

केल्या टोळ्या निराळ्या चटकन चमुच्या घातला त्यास[1] वेढा ।
नाकेबंदीहि केली, सकल अरिचमू घाबरे वीर[2] गाढा ॥
तेव्हां भारी निजामा समय कठिणसा वाटला कोंड झाली ।
अन्नावांचून सेना बहुत पटपटा मृत्युपंथास गेली ॥ ३ ॥

शार्दूलविक्रीडित.

कोट्याचा नृप आणि तो अबदुला तेव्हां पळों लागला ।
मल्हारी चमु घेउनी उभयतां जिंकी यशा लाभला ॥
म्लेंच्छांना समरांगणांत निजवी आला तळाला मुर्दे ।
बाजीला बहु मोद आणि धनही सैन्यास उत्साह दे ॥ ४ ॥

स्रग्धरा.

तोफांचा गोल भोंतीं करुन अरि निघे जावयाला ठिकाणा ।
अन्या, मोठी तयारी म्हणुन अरिवरि बाजि जाया धजेना ॥
वेढा ठेवूनि तैसा हळु हळु निघती त्या अरिच्याच संगें ।
आला तेव्हां तयांना शरण ' तह करा ' बोलला शत्रुभागे ५

---

१ निजामाला २ मोठा योद्धा निजाम.

शार्दूलविक्रीडित.

"देतों मालव सर्व मेकलसुता[1]–चर्मण्वतीच्या–मधें ।
आहे प्रांत तुम्हांस तो यवनपा–पासून घ्यावा बुधें ॥
देतों बक्षिस दक्षिणाहि अपणा पन्नास लक्षांप्रती ।
ती घेऊनि मला विमुक्त[2]चि करा" ही प्रार्थना सन्मती ॥ ६ ॥

स्रग्धरा.

वेढा काढून बाजी हलु हलु परते खंडणी घेत घेत ।
काठानें चंबळेच्या स्वनगरिं[3] मग तों जाहला शूर *आप्त ॥
तेव्हां भावा[4]कडूनी वसइवर करी एक हल्ला तयाचा ।
ऐका वृत्तान्त आतां सकल बुधमनीं तोष होईल साचा ॥ ७ ॥

शार्दूलविक्रीडित

पोर्तूगीज–जनाकडे वसइ हा तैं प्रांत होता भला ।
त्यांचा संघ करावयास इकडे व्यापार हो पातला ॥
आले ते मलबारला प्रथमतां तेथें तयांना अरी ।
झाले मूर म्हणून व्यापिति दुजा भागास हे सत्वरीं ॥ ८ ॥
मूरांनाहि हळू हळू भुजबळें जिंकूनि प्रांताप्रती ।
घेऊनी स्वकरीं समुद्रतटही ताब्यांत घेती अती ॥
गोवें मुख्य करून पत्तन[5] तिथें सामुद्र सैन्या[6] दिलें ।
ठेवोनी मग बंदरीं सकलही किल्ले नवे बांधिले ॥ ९ ॥
पोर्तूगीज–नृपें प्रमुख्य शँहरीं[7] अल्फान्स जो नेमिला ।
तो येऊन इथें प्रदेश अपुला पाहावया लागला ॥
ऐशी उन्नति त्या जनाप्रति तदा संप्राप्त झाली अती ।
तेव्हां धांवति अन्य गौरजनही मोठ्या जवें भारतीं ॥ १० ॥
पोर्तूगीज पुढें हळू हळु जरा निस्तेज व्हायातही ।
लागोनी मग आंग्ल लाभति तदा कीर्तीस आणी मही ॥
धर्माचें परि बंड फार पसरे लोकांस या भारतीं ।
हट्टे बाटवितीच जेसुट किती अन्याय–योगें अती ॥ ११ ॥

---

१ नर्मदा आणि चंबळा यांच्या मधील २ वेढ्यांतून मोकळा ३ पुण्यांत ४ चिमाजी आप्पाकडून ५ राजधानीचें शहर ६ आरमाराला ७ राजधानीच्या शहरांत (गोंव्यांत) * आला. (आप्त जाहला.)

कैदी ही करिती जलान्न अथवा लोकां न ते अर्पिती ।
किंवा चापहि लावती करिति वा तप्तोपलीं तत्तती ॥
पोर्तुगीज उभे तसेच पलिते अंगाप्रती लाविती ।
लोकां जाळिति जे तदा न अपुला हा धर्म स्वीकारिती ॥१२॥

स्रग्धरा.

ऐसा त्यांनीं सपाटा वसइमधिं तदा चालवीलाच भारी ।
आणूनी बाटवीती धरुन धरुन ते लेंकरें लोक सारीं ॥
कोणीहि सांपडेना गणपतिमुख[१] तैं फेंकिती देवतांना ।
भारी अन्या तऱ्हांनीं सतवुनि[२] सकलां त्रास देतीच नाना १३

शार्दूलविक्रीडित.

आले त्रास कथावयासहि किती शाहु नृपालाप्रती ।
'द्यावा आश्रय बोलनी' किति उडया अब्धीमधीं[३] टाकिती ॥
निंबाजी करि यत्न फार परि तो नेला यमानें सुधी ।
गंगाजी–मुख तत्सुतीं न त्यजिलें तन्नाश–यत्ना[४] कधीं ॥१४॥
जावो यत्न न शेवटास ह्मणुनी निंबाजिच्या त्या सुतां ।
पोर्तुगीज कितीक वेळ करिती कैदी तदां तत्वतां ॥
कांहीं लाभ न हो परंतु परकी झाले मऊ चांगले ।
जेव्हां ते चिमणाजिनें सकलही युद्धामधें जिंकिले ॥१५॥
अप्पा प्रांत बराच घेउन पुढें आले पुण्याला मुदें ।
बाजीरावहि कीर्ति आणि धन तैं लाभूनि संतोष दे ॥
बंधूनीं करुनी विचार बरवा हल्ला फिरंग्यावरी ।
आतां तो करणें म्हणून निघती अप्पा तयांच्या-वरी ॥१६॥
तेव्हां होळकराप्रती द्विजपती देईच जाण्याप्रती ।
आज्ञा हो निघण्यास, तोहि निघुनी वृद्धी तया सन्मति ।
पेद्रो येउनि तैं तिथें मग करी वेगें शतघ्नी सुरू ॥
हीं तन्नाश करावयास बरवा लागेहि यत्ना करूं ॥१७॥
केला ठारच पेद्रु मारुन तया गोळ्यास मल्हारिनें ।
पोर्तुगीज समस्त मस्त पळती किल्ल्याकडे घाइनें ॥

---

१ गणपती वगैरे देव २ त्रासवून, छळून ३ समुद्रांत ४ त्या पोर्तुगीज लोकांच्या नाशाची खटपट. ५ चिमणाजी आप्पा ६ तोफ ७ मल्हारराव.

आले सर्व पळूनि तैं वसइला मल्हारि लाभे जय ।
अप्पा मोहिम राणुजी करि तदा अन्य स्थळें निर्भय ॥१८॥
अप्पा तैं वसईकडेस सगळी बोले चमू चालवा ।
मोर्चे लाविच तैं फिरंगि वदला सल्ला करावा नवा ॥
" आह्मी प्रांत बराच देउन तुह्मां किल्ल्यांत राहूं स्वयें ।
शिद्दीचा तुमचा तसाच अमुचा सल्ला करा हा नयें×" ॥१९॥
किल्ला राहु दिल्यावरी मग अरी जिंकील प्रांता पुन्हां ।
हें आणून मनांत शूर न करी अप्पा चिमाजी तहा ॥
बांधीही बरवा सलाबत* कुचा,* गोळा सुरू जाहला ।
अप्पा भोंक तटास यत्न करुनी पाडावया लागला ॥२०॥
झाली त्रस्त समस्त फौज जरि ही भारी प्रयत्ना करी ।
झाले मास सबंध तीन, गड तो लाभे न अप्पाकरीं ।
अप्पा तैं वदले तुह्मी मजप्रती बांधा शतघ्नीमुखीं[1] ।
जावो देह गडांत ' ऐकुनि दुजे निस्तेज झाले मुखीं ॥२१॥
अप्पाला सरदार बोलति तदां " तुह्मी निराशा अशी ।
चित्तीं कां धरितां समस्त मिळुनी ही चालवूंया असी[1] ॥
किल्ला स्वाधिन जाहल्या-विण विभो मार्गे पदां घेउं न ।
तैसें नाहिं पुण्यास दाखवित हो बाजीस कृष्णानन[2] " ॥२२॥

शालिनी.

पाहूं किल्ला आंत जाऊनिया हा, तेव्हां हल्ला योग्य होईल पाहा ।
खंडूजीनें[3] घेउनी गोप वेषा, दुल्लाजीही[4] पाहि तेथील गोषा ॥२३॥

गीति.

अंजुरकर[5] सर पाटिल, होउन तेव्हां सुतार वसईंत ।
गेले तिघे बघाया, पाहुनि वृत्तान्त सांगती चमुंत ॥२४॥
तेव्हां सेनेमधुनी, बुरुजाखालीं सुरुंग नेऊन ।
दिधली बत्ती त्याला, बसला स्वस्थालिं बुरूज तो उडुन२५
दुसरा तयार केला, परि अरिनें नष्ट आंतुनी केला ।
तेव्हां पांच सुरंगा, उडवुनि सिद्धीस बेत हा नेला ॥२६॥

---

१ तरवार २ काळें तोंड ३ खंडोजीमाणकर (हा गुराखी झाला) ४ डुल्लाजी मोरे (हा कासार झाला) ५ परशुराम नाईक अंजुरकर.
* जमीन खणून आंतून नागमोडीच्या आकाराचा रस्ता × न्यायानें.

झालें खिंडार तदा, शिरले हे शूर आंत वेगानें ।
झालें युद्ध फिरंगी. गेले सोडून दुर्ग दुःखानें ॥२७॥

शार्दूलविक्रीडित.

अप्पांनीं दरसाल छत्तिस सदा द्यावें रुपायांप्रती ।
द्यावें कारकुनास भात मणही पंधा तसें संप्रती ॥
आह्मां सांगु नये बिगार अपुली ऐसा फिरंगी तह ।
सांगूनी निघती बसूनि सगळे नौकेंत मुख्या-सह ॥ २८ ॥
एथें एक घडे मनोहर कथा अप्पा जियेच्या मुळें ।
वाटे भर्ग जना मरुत्तनय वा ख्रिस्ती तहाला वळे ॥
नौकेमाजिं वधू फिरंगि बसवी धाडीच गोव्याप्रती ।
तीतें मार्गि धरून लोक जलदीं अप्पापुढें आणिती ॥ २९ ॥
होती सुंदर ती रतीप्रति अतीं जी लाज लावी परी ।
मानूनी भगिनी चिमाजि तिस दे वस्त्रें नवीं सत्वरीं ॥
तीतें पोंचवि तत्पतीजवळ तैं सांगे पतीलागिं ती ।
'युद्धाची मति टाकुनी तह करां अप्पासवें संप्रती ॥ ३० ॥

इंद्रवज्रा.

किल्ल्यावरी तैं भगव्या ध्वजातें ।
पाहूनि झाला बहु मोद त्यातें ॥
तेव्हां दिले प्रांत मुदें जनांला ।
जे अर्पिती देह लढूनि त्यांला ॥ ३१ ॥

स्रग्धरा.

तेव्हां हल्ला इराणा-धिप नृपति करी एक नादीरशाहा ।
भव्या दिल्लीवरी त्या जन बहुत करी ठार हा बादशाहा ॥
कैदी दिल्लीपतीला करुन नृप इथें मीच ऐसा प्रसिद्ध ।
केला जाहीरनामा स्व-जनपदिं पुढें होय जाण्यास सिद्ध ॥ ३२ ॥
ही वार्ता बाजिरावें श्रवण करुनिया जावयाची तयारी ।
केली दिल्लीकडे हो अनुजनिस[1] लिही धाडि मल्हारि-स्वारी ॥
वेगें आम्हांकडे तूं निघुनि झडकरी तोहि मल्हारि आला ।
भेटे सांगे यशाची हकिकत सगळी बाजि सानंदे[2] झाला ॥ ३३ ॥

---

१ धाकटा भाऊ चिमाजी आप्पा यास. २ आनंदी.

शार्दूलविक्रीडित.

मल्हारीस इनाम देउन पुन्हाः शाबासकीही दिली ।
गेला नादिर आत्मदेशिं[1] बघुनी स्वारी पुढें थांबली ॥
बाजी दिल्लिकडे न जाइ तळ दे तैं नर्मदेच्या तटीं ।
तेथें बाजि पडे अजारि जनता[2] घाली बहू संकटीं ॥ ३४ ॥
केलेही उपचार फार परि ते गेलेच वाया करीं ।
कैलासीं गमनास बाजि जलदीं सारूनि माया दुरी ॥
सत्राशांवरतींच चाळिस सनीं एप्रील अठ्ठाविसी ।
रावेराजवळील त्या कलमडीं ये मृत्यु त्या बाजिसी ॥ ३५ ॥
नाना तत्सुत तो चिमाजिजवळी होता तदा कोंकणी ।
ती वार्ता श्रवुनीच ते उभयतां धांवूनि आले क्षणीं ॥
भारी शोक करून औत्तरकृती[3] संपादुनी तत्सुत ।
आला आत्मपुरास शाहुनृपनी झाला अती दुःखित ॥ ३६ ॥

पृथ्वी.

पुढें नृपतिच्याकडे सदय तो चिमाजी स्वयें ।
स्वबंधु-तनया[4]प्रती चरणिं घालण्यालाच ये ॥
नृपास मग भेटुनी विनतिही करी शाहुला ।
' प्रभू करुनिया कृपा सचिवता[5] अतां या मुला ॥ ३७ ॥
जशा प्रतिनिधी करी खटपटी तया बाजिला ।
नये सचिवता मिळू तशि अतां करी भोंसला ॥
सुताप्रति न बाजिच्या सचिवता मिळावी कधीं ।
परंतु नृपती तया सचिवता रुपें दे सुधी ॥ ३८ ॥
दिलीं सुवसनें[6] नृपें मग कट्यार शिके तसे- ।
मुलाप्रतिच बाजिच्या, स्वनगरास तो येतसे ॥
रघूजी नृप भोसला निपट वैर यासी करी ।
परंतु प्रभु राखि या करि कृपा तसी यावरी ॥ ३९ ॥

शार्दूलविक्रीडित.

दिल्लीच्या नृपतीसवें तह असा तो पेशवा तैं करी ।
' हल्ला मॉलव[7] सोडुनी नच करूं हो अन्य देशांवरी ' ॥

---

१ आपल्या इराण देशीं २ लोकसमूह ३ उत्तर क्रिया ४ आपला भाऊ बाजीराव त्याच्या मुलास ५ पेशवाई ६ चांगलीं वस्त्रें ७ माळवा.

२ ' घेवोनी हुजुरीं अम्हास पदवी द्या वाढवा इभ्रत । '
३ ' राहो एक हुषार वीर पदरीं दिल्लीस सेवारत ' ॥ ४० ॥

शिखरिणी.

४ ' हमी आम्ही घेतों स्वशिरिं अपुले प्रांत लुटणें ।
मराठा योद्धा तो न करिल पुढें व्यर्थचि रणें ' ॥
५ ' इनामाला आम्हां यवननृपतीनें स्वखुषिनें ।
दिलेलें घेऊनी कर मग न मागूं स्वमतिनें ॥ ४१ ॥

शार्दूलविक्रीडित.

६ ' गाजी सैन्य निघेल जैं जनपदीं औजीप्रती यावया ।
संगें चार हजार सैन्य मदतीसाठींच देऊं तया ॥
त्यापेक्षां जर जास्त सैन्य प्रभुला लागेल तेव्हां धनी ।
देवो खर्च तयास तो म जप्रती घ्यावी विनंती मनीं ' ॥ ४२ ॥
७ ' जे संस्थानिक चंबलेपलिकडे खंडास देती जसा ।
ते देवोत पुढें न जास्त कर मी मागेन त्यांना कसा ! ' ॥
८ ' आज्ञा शासनिं त्यांस होइल तरी धाडीन सेनेप्रती ।
तैं माझी चमु तें तडीस विभुचें नेईल हो कार्य ती ' ॥ ४३ ॥
९ ' दुर्गाच्या अधिपास ज्या प्रभुवरें बक्षीस जाहागिरी ।
स्वामींनीं दिधल्या तशीं इतर ज्या कोणा इनामें बरीं ॥
त्या सर्वांस तसेंच राखुं विभुजी विघ्ना न आणूं कधीं । '
ऐसा तो नव पेशवा नव अटी बांधून घेई सुधी ॥ ४४ ॥
नानाला मग माळव्या यवनपें देऊनिया टाकिले ।
जे जामीन तदा तयाकडुन हो म्लेच्छाधिपें घेतलें ॥
त्यांमध्यें प्रमुखांत मुख्य अमुचा मल्हारि होताचि हा ।
ईशें योग्यपणा तया किति दिला उद्योग–योगें पहा ॥ ४५ ॥
राणोजीस यमें निजाश्रमिं पुढें नेलें तयाला सुत ।
होते पांच तुकोजि आणि दुसरा माहादजी संमत ॥
त्याचे औरस हे नसोनि दुसरे दत्तू जयाप्पा असे ।
होता औरस जोतिबाहि तुकया मोदें पुण्याला वसे ॥ ४६ ॥
राजस्तानेंपती वृथा झगडती तैं आपसाच्यामधीं ।
बुंदीचा नृप सान यास्तव बघे राज्यास माता सुधी ॥

---

१ चाकरींत गुंतलेला २ लढाईस ३ किल्लेदारास ४ नवीन ५ नऊ संख्याक ६ रजपुतान्यांतील राजे ७ लहान.

तद्भ्राता तिजशीं लढे भगिनिला अत्यंत त्रासास दे ।
राज्यासाठिं पुण्यास ती सुत सर्वे घेऊनि गेली मुदें ॥ ४७ ॥
'मी आहें तुमची बहीण' वदली मल्हारबाला तदा ।
'द्या भाचाप्रति राज्य' चातक जसा प्रार्थी मुदें तोयदा ॥
श्रीमंतास पुसूनि तोहि तिजला देई असी भाक कीं:-।
'त्वत्पुत्राप्रति मी नृपासनिं बये गें स्थापितों खास कीं' ॥४८॥

स्रग्धरा.

मल्हारी आणि नानां[1] मिळुन उभयतां बुंदि-राजास त्याच्या ।
राज्यीं स्थापावयाला म्हणुनि निघुनिते मालवीं येति साच्या ॥
गेले तेथोनिया ते दरकुच करुनी प्रांत धूडाड येथें ।
आला तैं पावसाळा म्हणुन तळ दिला युद्ध सोडून तेथें ॥४९॥
नानाला खंडुराया[2]-प्रति परत तदा धाडुनी देउनी तो ।
मल्हारी एकटाची बसुन करि तिथें यत्न सिध्यर्थ जों तों ॥
मृत्यू आला नृपाला जयपुरनगरीं राज्य पाही सुपुत्र ।
नाना गेले बघूनी चमुसहित करी एक हल्लाहि अत्र ॥ ५० ॥

शार्दूलविक्रीडीत.

वृत्तान्ता श्रवुनीच होळकरही युद्धास याया सजे ।
घाला घालिहि एक त्याजवर हा होते अरी यास जे ॥
तेव्हां ते जयपूर-वीर सगळे भांबावले हो अती ।
मल्हारी बुणगे लुटून चमुला वेढी त्वरें संप्रती ॥ ५१ ॥
त्यांना अन्न न पाणिही मिळूं दिलें मारा बहू चालवी ।
येऊनी नृप जेर धाडि सचिवा मोडावया यादवी ॥
येऊनी नमुनी वदे सचिव तो मल्हारबाला भला ।
राजाच्या अवना करून विभुजी द्या शिष्टि[3] जाया मला ॥५२॥
मल्हारी वदला 'समस्त सनदा बुंदी-नृपाच्या तया ।
द्या, तैसें धन पाव कोटि मजला सेनेस खर्चावया ॥
तेव्हां सोडुं तुम्हां' प्रसंग बघुनी तोही करी मान्य तें ।
धाडी वसिहि लक्ष रोख रुपये मल्हारि घेईहि ते ॥ ५३ ॥

---

१ नानासाहेब पेशवा २ खंडेराव [मल्हाररावाचा मुलगा व अहिल्याबाईचा नवरा] ३ आज्ञा.

चामर.

उमेद्‌सिंग बैसवूनि बुंदिच्या नृपासनीं ।
प्रजा बघावयास ये नृपाल इंदुरीं झणीं ॥
प्रमोद फार पेशव्यास जाह्लाचि हो तदा ।
पुण्यास सैन्य घेऊनीच पावलाचि हा यदा ॥ ५४ ॥

स्रग्धरा.

माजी राजा सवाई मृतिसमयीं मुला गादि दे ईश्वराला ।
मोठा होता म्हणुनी, परि ऋत तनया हक्क त्या माधवाला ॥
राज्यासाठीं तयांचा कलह मग सुरू होउनी माधवाचा ।
घ्यावा हो प्राण योजी निजमनिं दुसरा बेत बंधू तयाचा॥५५॥
माता घे माधवाला मग जनक[1]-गृहीं पातली ती भयानें ।
मामा त्या बालकाचें अवन करि दिला रामपूरेंहि[2] त्यानें ॥
भ्राता त्या माधवाचा जयपुर-नृपति जाइ हल्ला कराया ।
पंजाबाच्या दुराणीवरि, जय मिळवी पावण्या ये स्वराज्या ५६

भुजंगप्रयात.

जगत्सिंग वाटे मधेंगांठि त्याशीं ।
परि लाभ नाहीं जयाचा तयाशीं ॥
पुढें बाप लीही नृपा माळवाच्या ।
पित्याच्या पदीं स्थापि आतां स्वभाच्या ॥५७॥
मनीं घेउनी बोल त्याचा निघाला ।
तसा पातला तो त्वरें चाटसूला ॥
तदा ईश्वरानें चमू सिद्ध केली ।
परी तत्प्रधानें फितूरीच केली ॥ ५८ ॥
नृपाज्ञा न मानून मंत्री अरीला ।
मिळाला तदा तो विषालागिं प्याला ॥
मिळे राज्य त्याचें पुढें माधवाला ।
असे कार्य गेलेंच ते शेंवटाला ॥ ५९ ॥
नृपालास नेलें यमें, तत्प्रधानें ।
यदा जाणवीलें अती मानदानें ॥
पुरद्वारिं मल्हारि आला तळाला ।
दिलें तच्छवा अग्निसंस्कार केला ॥ ६० ॥

---

१ बापाच्या घरीं २ एका गांवचें नांव.

इंद्रवज्रा.

बेवारसी राज्य सुपीक भारी ।
आलें तरी ती फिरली न स्वारी ॥
मल्हारि वाणी वदला न कांहीं ।
स्थापीच राज्यीं मग माधवाही ॥ ६१ ॥

स्रग्धरा.

तेव्हां त्या माधवानें नृपति-वर अशा माळव्याच्या नृपाला ।
टोकाचा रामपुरा विपुल धन दिलें कोटि पाऊण त्याला ॥
त्यापेक्षां लक्ष जास्ती दृढतम गड जो हिंगळाजा दिलाही ।
छोटाही रामपूरा स्थिरहि जयपुरीं जाहलें तैंच देई ॥ ६२ ॥

शार्दूलविक्रीडित.

शिंदा साह्य असे मृता नृपतीला त्याला व्यवस्था नसे- ।
झाली ही मत, चित्तिं अन्य नृपती राज्यीं बसावा असे ॥
शिंदा यत्न करी स्थिति फिरविण्या छद्मी[1] जनांनीं जधीं ।
कापट्यापणिं मारिली चमु बहू तैं मान्य झाला सुधी[3] ॥६३॥

स्रग्धरा.

शिंद्याचें सैन्य भारी मृत बघुनि वदे शूर मल्हारि रागें ।
तत्रस्था[4] कारभाऱ्याप्रति उपकृति ही फेडिली काय वेगें ॥
तेव्हां तो बोलला कीं "प्रभु शरण असे मोडण्यालागिं तंटा ।
केलें भारी प्रयत्ना परि यश नच ये वाढुनी फार तंटा ॥६४॥

शार्दूलविक्रीडित.

झाला शांत न कोप मालव-पती 'मार्ची–' प्रती पाडिती ।
ऐसा नाश समस्त मी करिन हो मल्हारबा बोलती ॥
तेव्हां घाबरुनी प्रधान पुढती येऊनि पायांवरी ।
ठेवी मस्तक लाख पंचविस दे द्रव्यास धाडी दुरी ॥ ६५ ॥

स्रग्धरा.

अठ्ठाव्या शेंत सांधीं मनसुर करि हो एक हल्ला पठाणीं ।
त्यांना जिंकूनि राज्या मिळवुन बघण्या विप्र[6] नेमी इमानी ॥
त्या कायस्था द्विजाला अरि झडकरि ते मारुनी टाकुनीया ।
राज्याला भोगिती हें श्रवण करि निघे आहि युद्धास याया ६६

---

१ कपटी लोकांनीं २ कपटाच्या बाजारांत ३ बुद्धिमंत (जयाजी शिंदे) ४ तिथल्या ५ सत्राशें पन्नासांत ६ नेवलराई नामक कायस्थ प्रभु.

छापा घालूनि त्यांनीं लुटुन पळविला खान, तेव्हां तयानें ।
शिंद्या मल्हारबाला मदत अणविलें फार द्रव्यादिकानें ॥
' मुक्कामीं अर्धलक्षाप्रति कुच करिते वेळिं लक्षा धनाला ।
देऊं ' घेऊनिभाकेप्रति मदतिस ते पातले तैं तयाला ॥६७॥

शार्दूलविक्रीडित.

फर्काबाद-पठाण सादल दुजा धाडी तसा बादल ।
संगें चाळिस तें हजार दिधलें त्यांच्या पठाणी दल ॥
शिंदे होळकरास हें समजतां गंगाधराला[1] दिला ।
साबाजी[2] समवेत त्यांवरि तदां धाडून योद्धा भला ॥ ६८ ॥

गीति.

झाल्या दोन लढाया, तिसरींमध्यें पुरा पराजय हो ।
करिती मराठि योद्धे, द्रव्याचा, लाभला तदा लाहो ॥ ६९ ।
सादल बादल यांची, माथीं कापूनि आणिलीं त्यांनीं ।
वार्ता ऐकुन तेव्हां, शिंद्यादिक चालले तया स्थानीं ॥ ७० ॥
फरकाबादेस तदा, जातां तेथिल जना पडे धाक ।
सोडुन पळती नगरा तेव्हां भारीहि शूर-वर लोक ॥ ७१ ॥
गनिमी कावा करुनी, अन्नादिक सर्व बंदही केलें ।
जर्जर शत्रू भारी, केला त्या इंदुर-प्रजापालें ॥ ७२ ॥

अनुष्टुप्.

बांधुनी पलिते शिंगा, पशूंना धाववी तया ।
वृक्षांना पलिते बांधी, अंधारें गांठि वैरिया ॥ ७३ ॥
शत्रुसेनेमधें आर्हों, भासलें रोहिल्यास त्या ।
धांवु लागाति जैं वेगें, मल्हारी गांठि तैं तया ॥ ७४ ॥

शार्दूलविक्रीडित.

आला मुख्य नबाब तो शरणही ' या जीवदाना मला ' ।
बोले तैं तह योग्य ते करुनिया आले त्वरें दिल्लिला ॥
तेव्हां म्लेंच्छ-जनाधिपें खुष मनीं होवोनि मल्हारिला , ।
व्हावें काय तुम्हांस बक्षिस असा सत्प्रश्न केला भला ॥ ७५ ॥

इंद्रवज्रा.

खावंद मी नोकर पेशव्यांचा ।
सल्ला असावा मजला तयांचा ॥

---

१ होळकराचा दिवाण २ शिंद्याचा सरदार.

परंतु ते दूर ह्मणोनि साची ।
जाणून इच्छा वदतों तसाची ॥ ७६ ॥
'देवो मला चांदवडांत राजा ।
ती देशमूखी 'नृप बोलला' जा ॥
हें सर्व तुह्मां दिधलें बरें हो'।
मल्हारि लाभूनि निघेहि लाह्रो ॥ ७७ ॥

यवननृपप्रसादनामक तृतीय सर्ग समाप्त.

चतुर्थ सर्ग.

पुत्र-निधन.

—:०:—

शार्दूलविक्रीडित.

ताराबाइ असे बहू खटपटी उद्देश होता तिचा ।
'ठेवावा न च कोंकणस्थ विषयीं[1] त्या भार्गवी भूमिचा[2]' ॥
'नानाचा अधिकार काढुनि अतां द्यावा निजामाचिया ।
मंत्रीच्या पुतण्यास' आणुनि मनीं यत्नास लागे तया १
'दाभाडेप्रभृतीस एक करुनि बाई निजामास ती ।
घेई साह्य' असा प्रयत्नहि तिचा चालूं असे संप्रती ॥
नानाचा इकडे प्रयत्न दुसरा चालूं असे तो असा ।
'अल्ली[3] काढुनि गाजिउद्दिन तिथें नेमूनि घ्यावा कसा' ॥२॥
नाना सिद्ध करून सैन्य निघती गोदेकडे जावया ।
अल्लीचाहि सचीव घेउन चमू ये युद्ध तें द्यावया ॥
लोणीला तळ रामदास[4] सचिवें देऊनि छापा यदा ।
नानाच्यापृतनेवरी झडकरी तो घातलाही तदा ॥ ३ ॥
नानांनीं करुनी बचाव अपुला संग्राम केला भला ।
शत्रूही जितला तदा यवन तो सल्ला करी चांगला ॥

---

१ राज्यांत २ परशुरामानें दान दिलेल्या भूमीवरचा ३ निजामअल्ली ४ रामदासपंत.

मल्हारीस दिला किताब बरवा तेव्हां सुभेदार हा ।
आज्ञाही करि गाजि म्लेंच्छ अणण्या दिल्लीहुनी शत्रुहा[1] ॥४॥
मल्हारी यवनाधिपाकडुन तों देई सुभेदारि ती ।
गाजीला; मग ते तिघेहि निघती देशासि येण्याप्रती ॥
त्यांचा जैं तळ भव्य येत असतां औरंगबादीं पडे ।
तेव्हां गाजिस आप्त-लोक-ततिला[2] बा भेटण्या सांपडे ॥ ५ ॥

स्रग्धरा.

औरंगाबादिं घाली विष मिसळुनिया अन्न सापत्न माता ।
त्या गाजीउद्दिनाला यमसदनिं निघे तोहि टाकी अहंता ॥
नानाला गोट त्याचा लुटुन झडकरीं घ्यावयालागीं सल्ला ।
कोणीं दुष्टें दिली तैं नच सफल परी जाहली कीं तयाला ॥६॥

गीति.

मल्हारींनें नाहीं, अनुमति दिधलीच दुष्ट कृत्यास ।
दिल्लीला पोंचविलें, तद्वन शव आणि सर्व जिनगीस ॥७॥

शार्दूलविक्रीडित.

शिंद्या होळकरास घेउन सवें खंडास घेण्यास्तव ।
राघोबा फिरतां नदी उतरुनी ये जाट-देशीं[3] जंव ॥
तेव्हां धाडि वकील जाट आपुला सल्ला करायास तो ।
हे[4] कोटी धन मागती परि वदे चाळीस लक्षांस तो[5] ॥ ८ ॥
आला जैं परतूनिया वकिल तैं स्वारासवें भूपती ।
गोळे देउनि पांच दारुहि जरा दादाकडे धाडि ती ॥
घ्यावे चाळिस लाख वा रण करा ऐशा निरोपासही ।
राघोबा श्रवुनी चमूस वदला वेढून टाका मही ॥ ९ ॥
किल्ला तो मजबूत फार असुनी भिंतीस त्याच्या मुळीं ।
लागेनाच सुरुंग पोंहति तदा दादा सुचिंता-जळीं ॥
मानी जाट द्विजाहुनी अधिक तो सल्ल्याप्रतीही पुन्हां ।
कोणी धाडुन देइना रघुवरी बेते कसा वेळ हा ॥ १० ॥

---

१ शत्रूला मारणारा (हें नानासाहेबाचें वि०) २ इष्ट मित्रांस ३ भरतपूरप्रांतांत ४ पेशवे ५ जाटराजा.

इंद्रवज्रा.

एके दिनीं भोजन सारुनीया ।
मल्हारिचा पुत्र[1] निघे लढाया ॥
आला निशाणाजवळी तयाला ।
लागूनि गोळा पडलाच भूला ॥ ११ ॥

शार्दूलविक्रिडीत.

पुत्राचें शव पाहतांच पडले मल्हारबा भू-तळीं ।
होता एकचि पुत्र त्यावरि यमें कैसी उडी घातली ।
मल्हारी मग फार शोक करितां बेशुद्ध झाला यदा ।
राघोबा करि सांत्वनास वदुनी वेदान्त मोठा तदा !! १२ ॥
" आहे पुत्र तुझा अरे कवण तो कांता तुझी कोण बा ।
हा संसार विचित्र जाण सगळा आहेच मल्हारबा ॥
वीराला मृति संगरीं वरि कथी श्रीकृष्ण त्या अर्जुना ।
यासाठीं त्यज शोक सर्व अपुला कोणी न दुःखाविना " १३

वसंततिलका (युग्म).

ही बातमी समजतां करि शोक माता[2] ।
कांता[3] हि घे बडवुनी स्वकरें स्वमाथा ॥
जाण्या सती पतिसवें वनिता तयाची ।
हो सिद्ध आज्ञा स्वशुरास याची ॥ १४ ॥
" तो सासरा वदतसे मज टाकुनी गे ।
जाऊं नको समजुनी सुत राहु मागें ॥
हट्टेंच जाशिल तरी अम्हिही तसेंच ।
येऊं पहा करुनि पूर्ण विचार साच " ॥ १५ ॥

शार्दूलविक्रीडित.

होवोनी निरुपाय ती मग करी राहावया निश्चय ।
पुण्याचा भजुनीच विश्वपतिला भावें करूं संचय ॥
ऐसा ती करुनी विचार बरवा बोले स्वशूराप्रती ।
'आज्ञा मान्य मला' तदा मृत विधी झालाचि दुःखें अती १६

(युग्म).

"ज्याला खेळविलेंच मांडिवरि हो घेऊनि मोदें अती ।
ज्याच्या कोमल-गल्ल-चुंबानें सदा सानंद झाली मती ॥

---

१ खंडेराव २ गौतमीबाई ३ बायको [अहल्याबाई होळकरीण].

ज्याचे लाड तसेच हट्ट कुतुकें देऊनि इष्टाप्रती ।
मोदें म्यां पुरवूनि पाडिली जरा दुःखाचि ही विस्मृती ॥१७॥
होवो वीर भला तसेंच यशही होवो जयाचें अती ।
यासाठीं उपयुक्त म्यां शिकविल्या विद्याहि पुत्राप्रती ॥
ज्याला सुंदर आणि योग्य वधुही संपादुनी मी दिली ।
जो मातें सुखयष्टि वाटत असे वृद्धापकाळीं भली " ॥ १८ ॥
" त्या पुत्रास यमापरी जलदिनें जो जाट नेई तया ।
पुत्राचा सुड घ्यावयास असिनें मी सिद्ध मारावया ॥
जाटातें वधुनी त्वरें नदिमध्यें[1] किल्लाहि फेकीन हा " ।
ऐशा घोरपणास तो मग करी मल्हारबा शत्रुहा[2] ॥ १९ ॥
जाटाला कळतांच वृत्त सगळें तो घाबरे मानसीं ।
युद्धाची विपरीत जाहलि कसी बुद्धी मला ही असी ॥
मल्हारी मज खास ठार करितो, खेदास मानी अती ।
चिंताग्रस्तच होउनी तळमळे रात्रंदिनीं दुर्मती ॥ २० ॥
पत्नी[3] आणि सचीव या उभयतां बोलावुनी संमती ।
त्यांची काय असे बघे पुसुनि तैं पत्नी वदे त्यास ती ॥
" शिंद्याला हरयुक्तिनेंच पगडीभाई करा चांगला ।
तो सांभाळिल आपणांस दुसरा रस्ता दिसेना मला " ॥२१॥
जाटाला पडले पसंत मग तो मंत्री जयाप्पा कडे- ।
धाडी येउनि मंत्रिही झडकरीं पायां तयांच्या पडे ॥
ठेवी पत्र पुढें ह्मणे " प्रभु तुम्ही आहांच भ्रात्यापरी ।
बंधूच्या अवना करा विनविलें जाटें तुम्हां सत्वरीं ॥ २२ ॥
शिंद्याच्या पगडीस तो जवळ घे जाटाचि त्याच्या शिरीं ।
घाली मंत्रि मुदें विचारिं पडला शिंदा तदा सत्वरीं ॥
त्याला वाटतसे नृपास जर मी देईन कां मान्यता ।
मित्राचा प्रभुचाहि हा घडतसे कीं द्रोह मोठा अतां ॥२३॥

उपजाति.

जरी नये होउंच मान्य याला ।
तरी दिलें त्या प्रणता मृतीला ॥

---

१ यमुनेंत २ शत्रुला ठार करणारा ३ पत्नी [जाटाची बायको तिचें नांव हणसया] [अनुसूया].

याचें मला पातक फार वाटे ।
लागेल या साठिंच चित्त फाटे ॥ २४ ॥

गीति.

तेव्हां मुत्सद्यांनीं, रक्षण करणेंच योग्य जाटाचें ।
सल्ला दिधली त्याला, वकिल निघे घेउनी अभय साचें ॥२५॥

इंद्रवज्रा.

मल्हारचाला कळलेंच साच ।
कर्णोपकर्णीं मग तो तसाच ॥
दादाकडे येउन त्यास सांगे ।
' अग्नी पहावा स्वगृहींच भार्गे ' ॥ २६ ॥

शार्दूलविक्रीडित.

' तेव्हां लाभ कसा मिळेल अपणा सांगा यशाचा पुरा ।
शिंदा साह्य अ१सि पूर्ण पगडी-भाई असे हा खरा ॥
आह्मां थोर करा विचार बरवा ' दादास तेव्हां जरा ।
घोटाळाच पडे प्रकार कळवी बापूस दादा खरा ॥ २७ ॥
तेव्हां तो वदला कदा घडुंनये शिंद्या कडूनी असें ।
झाली गोष्ट असेल ही जरि तरी निष्ठा तयाची असे ॥
स्वामीच्या पदिं फार, तो करिल हो दादा हिताला अती ।
वागावें धरुनीच त्यास रघुही वागे तसा संप्रती ॥ २८ ॥

स्रग्धरा.

शिंदा, मल्हारिराया, रघुपति तिसरा यांमधें जाहला हा ।
घोंटाळा फार मोठा तरि चमु सगळें चालवी काम पाहा ॥
शिंद्याला जाट लीही ' मम अजुन किती अन्त आतां पहातां ।
टाका मारून किंवा तह तरि करवा धीर नाहींच तोता ॥२९॥

इंद्रवज्रा.

शिंदा वदे जाउनि पेशव्याला ।
' जाटासवें हो करणें तहाला ॥
याचा करा योग्य तुम्ही विचार ' ।
तेव्हां पडे संकटिं विप्र-वीर ॥ ३० ॥

---

१ भाग्यवान जे आपण त्यांनीं २ महाराज ३ रघुनाथरावदादा.

शार्दूलविक्रीडित.

सल्ला तैं करणें पसंत नव्हतें मल्हारबाला मुळीं ।
त्याचा पुत्र मरे बुडे म्हणुनि तो शोकार्णवाच्या तळीं ॥
शिंद्याला तह हा पसंतच असे आतां करावें कसें ।
एका बाजुस आड आणि दुसऱ्या बाजूस वापी[1] असे ॥३१॥
दादाला पडलेंच संकट तदा ' कोणास मी तोषवूं ।
हे दोघे मम हस्तसे गमति कीं तो जाट झाला मऊ ॥
नागोराधिप[2] रामसिंग मदतीसाठींच शिंद्याकडे ।
धाडी एक वकीलही म्हणुनि तो शिंदा निघे त्याकडे ॥३२॥

अनुष्टुप्.

झाली चूक जयाप्पाची । जाटाच्या रक्षणास्तव ॥
दादाला विनवी तैसें । रावाला[3] विनवी न तो ॥ ३३ ॥
शिंद्याच्या उलटे गेले । मल्हारी नसते तदा ॥
मित्राचा द्रोह शिंद्यानें । केला लाभ नसोनि हा ॥३४॥

शार्दूलविक्रीडित.

शिंदा कूच करावयास्तव चमू-माजी यदा नौबदा ।
लागे वाजवुं तैं रघू नृपतिला[4] ऐसें विचारी, वदा ॥
शिंदे हे निघतीच, जाट-मदतीसाठींच म्लेंच्छाधिप ।
आला ऐकतसों तरी करुं कसें ? सल्ला करावा नृप ॥३५॥
तेव्हां राव करी विचार बरवा ह्यांच्या मतावाचुनी ।
शिंदा जाइल हें नसेच घडणें यावें हटा[5] सोडुनी ॥
व्हावें मान्य तहास हेंच बरवें बोलेहि सल्ला करा ।
स्वामी आपण तेहि[6] मुख्य असती कां पूसतां किंकरा ॥३६॥

अनुष्टुप्.

मल्हारराव तैं गेले । रोखानें मथुरेचिया ॥
खाट जाट करी सल्ला । साठ लाख दिले धना ॥३७॥

शार्दूलविक्रीडित.

व्हावा कोप जरा तरी कमति या मल्हारबाचा अतां ।
ऐसें वाटुनि जाट एक बरवी छत्रीहि बांधी सुता ॥

---

१ विहीर २ नागोरचा राजा ३ मल्हाररावाला ४ मल्हाररावाला
५ हट्टास ६ जयाप्पा शिंदे.

देई पांच इनाम गांव तिजला आणी द्विजाच्या करीं ।
पूजार्चा करवी अशा खटपटी तो जाट तेव्हां करी ॥३८॥

स्रग्धरा.

जेव्हां मल्हारि-राया निज-चमु-सह तो पातला कंसपूरा[1]।
तेव्हां वृत्तान्त लागे ' यवन-नरपती देइ जाटास थारा ॥
सेना घेऊनि त्याला मदत निकट ये ' ऐकुनी हें तयानें ।
केला कीं बेत छापा यवन-चमु-वरी घालुं आतां त्वरेनें ॥३९॥

शार्दूलविक्रीडित.

अर्धा लाख सडी चमू झडकरीं घेऊनि मल्हारबा ।
जाई चाळिस कोस तीस घटकेमध्यें तदा शूर बा ॥
होता वेळ प्रभातिचा यवनही निद्रिस्त होते अती ।
पेंढाऱ्यांसह स्वार या नृपतिचे घोडे तिथें फेंकिती ॥४०॥

स्रग्धरा.

मोठा हल्लाच केला हर हर वदुनी कापिली फौज त्यांनीं ।
त्राहि त्राही करूनी अरिस पळविलें लांब दाहीं दिशांनीं ॥
या अल्ला या खुदा रे वदत अरि पळे फार हो फार वेगें ।
म्लेच्छांचा मुख्य राजा त्यजि निज-वनिता पाहिना कांहिं मागें

मंदाक्रान्ता.

पेंढाऱ्यांनीं बहुत लुटिलें त्यांत म्लेच्छाधिपाची ।
पत्नी होती झडकरिं तिला नग्न केलीहि साची ॥
मल्हारीला हकिकत कळे येउनी बाइपाशीं ।
शेला अंगावरिल तिजला देइ नेसावयाशी ॥४२॥

शार्दूलविक्रीडित.

मल्हारीस वदे तदा सुवदना[2] होतां इथें आपण ।
व्हावा काय असा भयंकर मला संत्रास राहो पण- ॥
बोलोनी फल काय हे नृप-वरा आह्मांवरी सांकडें ।
ईशानें जर आणिलें तर नसे हा बोल तुह्मां-कडे ॥४३॥
झाली लूट अपार रोकड दुजा वस्तू मिळाल्या उतें[3] ।
झाली प्राप्त फणी सुरत्न-जडिता लाभेहि मुक्तायुत ॥

---

१ मथुरेला २ सुमुखी ३ आणखी.

मोठा सद्रथ तें धनार्ध नृपती देई तयां[1] धाडुनी ।
शिंदा आणि रघूपती-प्रति मुर्दे हा लाभ हो तत्क्षणीं ॥४४॥

इंद्रवज्रा.

दिल्लीस गेला मग तो नृपाल ।
सत्कार त्याचा करि म्लेच्छपाल ॥
ऐशी (८०) दिले लाख धनास त्यांनीं ।
तैं रोख आणि धरणी मिळूनी ॥ ४५ ॥

मंदाक्रांता.

मल्हारीचा उदय बरवा जाहला दिल्लिमाजीं ।
जो तो[2] गाजी ह्मणुनिच तया राखि मोर्देच राजी ॥
पुण्यग्रामीं[3] समर उपजे एक तेव्हांच नाना[4] ।
मल्हारीला लिहि जलद तूं जिंकण्या ये अरींना ॥ ४६ ॥

मालती.

शिकवित एक असे कवायिती ।
मुजफरखान तदा चमूप्रती ॥
त्यजि मग सावनुरास चालला ।
यवन तयाप्रति मागतो भला* ॥ ४७ ॥

शार्दूलविक्रीडित.

तो द्यावा परतून यास्तव तदा नाना नबाबाप्रति ।
धाडी एक निरोप तो परि वृथा गेला असे संप्रति ॥
नाना कोपुन सैन्य घेउन तदा चाले नबाबावरी ।
जातां बागल-कोटही सर करी तो पेशवा सत्वरीं ॥४८॥

स्रग्धरा.

बुस्सीला साह्य धाडी यवन-नरपती हैदराबादचा तो ।
नानाला वाटलें कीं जर मदतिस या घेउं तैं फायदा तो- ॥
थोडासा त्या निजामा-प्रति मग दिधला पाहिजे आणि साह्य- ।
घेणें हीनत्व आहे ह्मणुनि करिपुरा विठ्ठला धाडि योग्य ॥४९॥
लीही मल्हारबाला झडकरिं निघुनी यावया सावनूरा ।
नानाज्ञा पाहुनी ते निघति जलदिनें फार ज्यांचा दरारा ॥

---

१ शिंदे व पेशवे यांना २ दिल्लीपतीनें ३ पुण्यांत ४ नानासाहेब पेशवा ५ दिल्लीला. *याचें विशेष्य नानासाहेब.

फुंकूनी शिंग योद्धे हर हर ह्मणुनी चालले सावनूरीं ।
एऊनी एक हल्ला करुन हळु हळू पोंचले मुख्यद्वारीं ॥५०॥
हत्तीच्या टक्करांनीं त्वरिताचि सगळें दार फोडूनि वेगें ।
किल्ल्याच्या आंत तेव्हां शिरुन सुरू तदा जाहली दिव्य खड्गें॥
' मारा ठोका अरींना चर चर चिरुनी मस्तकें हीं तयांचीं ।
वाहावीं भूमिलिंगा ' चमुपति वदती गौरवीती तसेंची ॥५१॥

शार्दूलविक्रीडित.

खड्गांचा सर सप्प सप्प असला चालूं ध्वनी जाहला ।
त्यांमध्यें रव भेरिचा मिसळला, योद्धा लढूं लागला ॥
सेनानी मग चेव त्यास अणण्या लागीं असें बोलती ।
" यौंरयौं असि और एक लगवा " ऐसेंच उत्तेजिती ॥५२॥

स्रग्धरा.

मल्हारी फार तेव्हां रणमद चढुनी विठ्ठलाच्यासमेत ।
शत्रूंच्या मस्तकांना चिरुन किति करी वीर तो फार फस्त ॥
झाले ते दूर योद्धे अरिकडिल बहू लागले ही पळाया ।
भीमानें कौरवांची उडाविलि चमुची वीर-वर्यें तशी या ॥५३॥

शार्दूलविक्रीडित.

कृष्णेच्या थडिच्या प्रचंड मग त्या बंधुद्वयानें* तदा ।
वेगानें घुसुनी निशाण अरिचें पाडून तेथें तदा ॥
पागोटें करुनी निशाण अपुलें जेव्हां मुदें लाविलें ।
तेव्हां शत्रुचमू बहु कचरली योद्धे पळूं लागले ॥५४॥

गीति.

मानेस वार लागे, विठ्ठलवीरास घोर युद्धिं तया ।
शिबिरीं घाय शिवोनी, केले उपचारही बहू सदया ॥५५॥
नानाहि मालवाधिप, संगें घेऊनि भेटिला गेला ।
विठ्ठलरावाची बहु, तारिफ करुनी धना दिलें त्याला ॥५६॥
सरजे-खानास तसें, मत्तेखानास तोषवी नाना ।
पागेचे अधिकारी, केले देऊनि दिव्य वसनांना ॥५७॥

* सर्जेखान व मत्तेखान यांनीं १ विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांना.

शार्दूलविक्रीडित.

झाला नम्र नबाब सावनुरचा दातीं तृणाला धरी ।
नानांनीं दिधला सुदुर्गहि तया तेव्हां मुदें सत्वरीं ॥
म्लेच्छानेंहि दिली सुपीक अवनी द्रव्याप्रतीही यदा ।
खांनाला[1] बरतर्फही करि अणी द्वेषास मोडी तदा ॥५८॥
या आटी अमलांत आणुन निघे मल्हारबाच्या सवें ।
नाना ये पुरिला तदा समरही संप्राप्त झालें नवें ॥
यासाठीं चमु दिल्लिला झडकरीं धाडावया लागती ।
तद्वृत्तांत करा पुढें श्रवण हो मोठ्या मुदें संप्रती ॥५९॥

पुत्रनिधननामक चतुर्थ सर्ग समाप्त.

पंचम सर्ग.

—:०:—

(स्वामि-प्रकोप-निरसन.)

शिखरिणी.

मराठ्यांचें झालें यवनिं बहु प्राबल्य सगळें ।
तदा त्यांना म्लेच्छाकडुन मिळती प्रांतहि भले ॥
असें पाहूनिया यवन-नृप-पत्नी अति तदा ।
विषादाला पावे करि सतत यत्ना विफलदा ॥१॥

शिखरिणी.

अयोध्येच्या राजा-मनुसुरसुताच्या-कडुन ती ।
लिही कंदाहारीं नरपतिस तेव्हां हकिकती ॥
" कृपेनें आम्हांला तुम्हि मदत यावेंच विभुजी ।
त्वरेनें सोडाया खटपट करावी बहु अजी " ॥ २ ॥
" तुम्ही या म्लेच्छांची जर अवन केली सकल ही–।
प्रभू लज्जा देतें तर मम सुता आणिक मही ॥
तसें त्वत्पुत्राला बसविनहि राज्यीं नरपते ।
करा यत्ना आतां अरिमथन व्हाया सकल तें " ॥ ३ ॥

---

१ मुजफरखानाला.

सुजाला तैसें त्या नजिबप्रति देऊंच क्रमतः ।
प्रधानत्वा मोर्दे चमुपतिपणातें प्रथमतः ॥
असें त्या दोघांना वचन दिधलेंही मधुर तें ।
म्हणूनी त्या कामा खटपट करूनी झटति ते ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित.

आला तो अबदालि घेउन चमू दिल्लीवरी सत्वरीं ।
होता खान नजीब साह्य म्हणुनी संत्रास तो ना वरी ॥
दिल्लीला करिं घेउनी झडकरीं नादीरशाहा–परी ।
द्रव्याची लुट फार तो करुनिया राजास कैदी करी ॥ ५ ॥
गाजीउद्दिनही प्रधान करुनी राजापरी कैद तो ।
धांवे गोकुळ घ्यावयास मथुरा हर्षें बहू अब्लि तो ॥
प्रांतांना लुटुनी विनाश करि ही आलाच वृंदावना ।
गाजी टाकि उडी नदींत अपुल्या व्हायास जीवावना ॥ ६ ॥

स्रग्धरा.

अग्र्याला पोंचला तो सचिव हळु हळू पोहुनी सात कोस ।
केली तद्रक्षकानें समयिं मदतही आंत घेऊन त्यास ॥
गेला अब्दालि तेथें परि जय न मिळे मार खाऊनि साचा ।
झाला खिन्नान्त भारी स्वविषयिं* निघण्या बेत झाला तयाचा ७
येतीं योद्धे मराठे श्रवण करुनिया बैसवी तो तिमूरा ।
दिल्लीच्या राज्यि आणी बलसहित सुता ठेवि पंजाबिं वीरा ॥
गेला अब्दालि वेगें स्वविषयिं निघुनी, खंडणी घेउनीयां ।
जाटापासून आले भट-वर अपुचे त्याच अग्र्यास भव्या ॥८
गाजीउद्दीन भेटे करिपुरिस तदा संगतीं घेउनी त्या ।
दिल्लीला सर्व गेले नजिब बहु लढे आंतुनी खाइ गोत्या ॥
वेढा देऊनि त्यांनीं करिपुरनगरीं त्रस्त केलें जनाला ।
मी आहें आपणाला शरण लिहि तदा खान मल्हारबाला ॥९॥
तेव्हां मल्हारबानें हकिकत कथिली पेशव्यांना अशी ही ।
आला जो आपणाला शरण मृति तया चिंतणें योग्य नाहीं ॥'
ऐसा शास्त्रार्थ त्यांना कथुन मग वदे त्या नजीबास आतां ॥
' माफी द्यावी प्रभूजी ' रघुपति नजिबा जाहला माफि देतां १०
तेव्हा मल्हारबा तो झडकरिं नजिबा पोंचवी शुकताला ।
दिल्लीच्या राज्यि त्यांनीं नृपति प्रथमचा गादिला बैसवीला ॥

* आपल्या देशीं (अफगाणिस्तानांत.)

त्याचें प्राधान्य* मोदें साचिव वर अशा गाजिला देउनीया।
केले सानंद सारे मग रघुपतिला म्लेच्छ येती नमाया॥११॥
अंताजी माणकोबा गजनगरिमधें+कोतवाली कराया।
राघोबा ठेवि आणी यवनपतिसवें चालला युद्ध याया॥
मल्हारी आणि योद्धे रघुपतिमुख ते पातले भारताच्या।
वायव्येच्या सिमेला वसविति अपुल्या राहुट्या दिव्य साच्या १२

शार्दूलविक्रीडित.

शाहूचा भगवा नवा ध्वज तिथें तेव्हां दिसूं लागला।
कीर्तीच्या शिखरास पूर्ण अमुचा हा देश तैं पोंचला॥
यांचे अश्व तिथें खुशाल फिरती शत्रू अती कापती।
मोठा दुंदुभिचा ध्वनी पसरुनि सद्वीर हे शोभती॥ १३॥

स्रग्धरा.

तेव्हां मुक्काम तेथें करुनि बहु मुदें मासपर्यंत नाना।
मौजा मारूनि भारी सकलहि हकिले दक्षिणेला हयांना॥
भेटे मार्गांत शिंदा हकिकत सगळी ऐकवीली तयांनीं।
एकामेकांस तेव्हां प्रमुद बहुत हो यांचिया या कथांनीं॥१४॥

शार्दूलविक्रीडित.

हे शिंदे जनकोजिराव सुमति त्या पेशव्या बोलले।
'दादा आपण सर्व भारत विभो ताब्यामधें आणिलें॥
दावा प्रांत जितावयास मजला आतां प्रभूजी नवा।"
ही त्याची विनती श्रवूनि वदला तेव्हां तया पेशवा॥ १५॥

स्रग्धरा.

"मल्हारीच्या भिडेनें यवन नजिबखां सोडिलां मी तयाला।
दुष्टाला ठार तुम्ही लवकर करणें सांगणें हें तुम्हांला"॥
मानी आज्ञेस शिंदा करि हय-तति ती आणि रत्नें विभागीं।
देवोनी एकमेकां मग निघति मुदें आपुल्या प्रांत-भागीं॥१६॥

शार्दूलविक्रीडित.

मल्हारी-चमु आणि राघवचमू यांच्यामधें हो असे।
बारा कोस पुरेंच अंतर तया भेटोनि शिंदा पुसे॥
जिंकाया मज दाखवा विषय तैं मल्हारजी बोलती।
बांधा देवनदीस पूल बरवा जिंका अयोध्येप्रती॥ १७॥

*प्रधानकी (कारभारी पणा.) + दिल्लींत.

" त्यायोगें धन, धान्य आणि तिसरी लाभेल कीर्ती बरी ।"
शिंदा त्यास वदे नदीवरि पुला बांधूं कसें सत्वरीं ? ॥
तेव्हां मालवराज त्यास वदला " घ्यावें नजीबाप्रती ।
तुम्ही साह्य तदा बनेल पुल हो जिंका अरी संप्रती ॥" १८ ॥
शिंदा तैं वदला " रघूपति कथीं जिंका नजीबाप्रती " ।
" स्वामिद्रोह करून तो मदतिला घेऊं कसा दुर्मती " ॥
" आज्ञा ही तुमची गमे बिकट जी कैसें करावें अतां । "
" संपादूं धन धान्य वा प्रभुरुपा सांगा मला तत्वतां "॥ १९

स्रग्धरा.

तेव्हां मल्हारबांनीं पुनरपि कथिलें " खान आहे रगेल ।
राखोनी ठेविला मी तुह्मि जर करितां नष्ट केला समूळ ॥
कोणी तुम्हां पुसेना कर सकल तदा पेशवे आणतील ।
जासूदांच्या करांनीं मसलत अमुची पूर्ण ध्यानांत घ्याल " ॥२०
शिंद्यानें मानिलें तैं मग सहजसुता ठेवुनी त्याजपाशीं ।
मल्हारी तो निघाला स्वविषयिंच मुद्दें पातला उज्जनीशीं ॥
भेटे दत्ताजि-शिंदा हकिकत सगळी सांगती एकमेका ।
त्यालाही तो कथीं कीं दशरथ-नगरी-पाल-राजास ठोका ॥२१

शार्दूलविक्रीडित.

दादा पोंचुनि पुण्यपत्तनिं तिथें भाऊस दावावया ।
जेव्हां लागति तो हिशेब बरवा तेव्हां दिसे कीं तया ॥
स्वारी खर्च जमेहुनी अधिक तो होवोनिया कर्ज तें ।
ऐशी (८०) लाख बघूनि भाउ वदले त्या बोल जे लागते २२

गीति.

" स्वारी करून मोठी, द्रव्याचा लाभ वा दुजे कर्ज ।
संपादुनीच येणें, योग्य असे कोणते कथाच मज ॥ २३ ॥

स्रग्धरा.

दादा तेव्हां म्हणाले " अनुभव मनुजा सर्व गोष्टींत गाजी ।
यायाला पाहिजे रे समर कर पुढें घेउनी सैन्य वाजी ॥
यावेळीं फौज भारी अरि-वर-हनना ठेवणें भाग झाली ।
झालें हें कर्ज भाऊ मिळकत तितकी खास नाहीं जहाली "२४
मल्हारीला कळे कीं मजवर करडी दृष्टि आहे धन्याची ।
तेव्हां घेऊनि संगें अयुत बल निघे जेजुरीला तसाची ॥

राज्याची योग्य केली स्वविषयीं* सकला सुव्यवस्थाहि नामी ।
देवाच्या दर्शनानें सुखवुनि हृदया पावला पुण्य-भूमी ॥२५॥
आले कुंभारवेशी-जवळ नरपती चौगुल्याला समोर ।
भेटी झाल्या तयांच्या नगरिंत दिधला तंबु बांधोनि दोर ॥
मल्हारी एकदा तो निज-वर-शिबिके-माजि बैसूनि पावे ।
ब्राह्मी मूहूर्तीं गेहीं नर-पति-मणिच्या सेवकीं नीज पावं ॥२६॥
भाऊ आणीक नाना दिनमुखिं अपुल्या सारुनी तालमेला ।
आले बाहेर तेव्हां परि जन कथिती राव एथें निजेला ॥
ऐकूनी तेथ आले शयनिं पहुडले पाहुनी सेवकाला ।
पृच्छा केली असी कीं, निज बहुत असे काय मल्हारबाला २७
ऐकोनी शब्द त्यांचे झडकरि उठले राव आणी तयांनीं ।
जोडीले हात दोनी चटकनच उभे राहिले त्या ठिकाणीं ॥
नानांनीं हात त्यांचा धरुन बसविलें गादिला आणि त्यांना ।
मोठ्या मोदें म्हणाले ' जनकसम तुम्ही ठेविलें प्रेम नाना ॥२८

शार्दूलविक्रीडित.

' केला आजच रामराम लवुनी कां राहिला हो उभे । '
कर्णीं हें पडतांचि राव वदला पाहूनि भाऊ उभे ॥
' बैसा खालिं जरा पुढें मज करा कैदी तुम्ही एकदा ।
किंवा प्राण हरा बसा परि अतां ' त्या बैसवी तो तदा ॥ २९
नानाला मग बोलला नरपति त्या माळव्याचा तदा ।
' नाना आजवरी करूनि अपुली सेवा बहू सौख्यदा ॥
बाजीच्या अमदानिच्या मधिं विभो बेकैदि आम्हि भले ।
होतों तैं नृप जिंकिले नविनही राज्यीं बहू स्थापिले ' ॥ ३० ॥

(युग्म)

पूर्वीं मी बहु राजकारण विभो केलें तयाच्यापरी ।
आतां होइल वाटलें परि तसें झालें नसे सत्वरीं ॥
केली आपण वक्र दृष्टि गरिबिं आतां अशी स्वामिनीं ।
हा मी स्वाधिन जाहलों तर मला किल्ल्यांत या टाकुनी ॥३१॥
किंवा प्राण हरून धाडुन मला बाजी-नृपाच्याकडे ।
द्यावें हें मम मागणें प्रभुपुढें आहे बहू रोकडें ॥ '

---

१ पुणें शहरांत. *आपल्या प्रांतांत (माळव्यांत)

नाना होउनि कष्टि तैं वदतसे ' ऐसा कसा आपुला ।
आला बोल मनास खिन्न करि जो ' आणुनि नेत्रीं जला ॥३२
' सौख्याचे दिन संपले मज गमे माता मुलाच्या वरी ।
कोपे वा नृपती प्रजेवर बहू ती वक्रदृष्टि करी ॥
तैसें आज करून काय म्हणुनी काका अह्मां बालकां ।
सोडाया बघतां पित्यापरि तुम्ही आम्हांस सोडूं नका ॥ ३३ ॥
भाऊ तैं वदला तुह्मी उभयतां बोलोनि संपादणी ।
जी भारी करितां असे वरी बरी मातें असे कांचणी ॥
राज्याला बहु कर्ज यास्तव विभो कांहीं सुचेनाच या ।
काढूं देति न सावकार वदना आतां करावी दया ॥३४॥
राज्याला जर कर्ज डोइजड हें होईल त्यांतून तें ।
होणें मुक्त कठीण जाइल किंहो दासास या वाटतें ॥
दोघेही वडिलासमान मजला आहां पहा शिल्लक ।
खर्चालाहि बघा तसें जमवुनी हा प्रार्थितो सेवक ॥३५॥
(युग्म.)
मल्हारी वदला ' सदाशिव तुला आहे किती कर्ज रे ।
घेवोनी शपथेस सांग मज तूं ' तो बोलला तैं त्वरें ॥
' मी आतां कथितों खरोखर मला पाऊण कोटी असे '
मल्हारी वदला तया पुनरपी ' मांडून ध्या हें कसें ' ॥३६॥
' मी देतों धन तीस (३०) लक्ष तितुकें देईल शिंदा तुला ।
बाकीचे सरदार अन्य सगळे देतील पैसा मुला ॥
तेव्हां भाउ वदे बरें, परि कधीं त्या साठ लक्षाप्रती ।
देतां धाडुनि तें अतां मजप्रती सांगा तुह्मी सन्मती ॥३७॥

वसंततिलका.

हे साठ लक्ष पटतील कधीं असें जैं ।
भाऊ वदे पुनरपी नृपतीप्रती तैं ॥
गद्यास बोलवुनि ' षट् प्रयुतें धनाला ।
यावें मला ' वदतसे नृपती तयाला ॥३८॥

शार्दूलविक्रीडित.

विष्णूपंत असे बहू धनपती, श्रीमंत तो पेशवा ।
वर्षाच्या पहिल्या दिनीं प्रकृतिला राजा म्हणाला नवा ॥

झेंडा वा गुडि लावणें स्वभवनीं लक्षाप्रती एक ती ।
गद्र्याच्या घरिं ठेंचुनी चहुंकडे तेव्हां गुड्या लाविती ॥३९॥
केली मागणि एकदां नृपतिनें त्याला धनाची अती ।
शिक्का पाठवुं कोणता धनपती हा बोलला त्याप्रती ॥
शिक्का नाहिं असा बघूनि नृपति मागें तुह्मी पाठवा ।
गद्रे ठेंचुनि गंत्रि तैं भरुनिया धाडी तयांचा थवा ॥४०॥
वाड्यापासुनि आपुल्या नरपति-प्रासादपर्यंत तो ।
गंत्रींचा क्रम लावुनि मग वदे ओतूनि घ्या आणितों ॥
नाना आणखि पाहिजे तर तुह्मां देतों धनाला पहा ।
नाना ऐकुनि या मनीं समजलें भारीच श्रीमंत हा ॥४१॥
मल्हारी वदला मला धन तुह्मी आतांच द्यावें चला ।
लक्षांचीं प्रयुतें सहा धनपती मल्हारिला बोलला ॥
द्यावें धाडुनि उंट हो नरपती द्रव्यार्थ भाऊ तदा ।
उष्ट्रा धाडुनि आणवी धन बहू पावोनि भारी मुदा ॥४२॥
मल्हारी वदला ' सदाशिव तुझें निश्चिंत झालें मन ।
किंवा नाहीं कधीं वदे द्विजपती झालें तसें हो मन ॥
झाला त्रास तुम्हांस यास्तव करा काका मला सत्क्षमा ।
पुत्राची समजूत पूर्ण करिते बापापरी फार मा+॥४३॥

स्रग्धरा.

गादी सांभाळणारे पुरुष जरि असे आपुल्यासारखे हो ।
काका आहेत तेव्हां ऋण कुठुन बरें, लाभला आज लाहो ॥
झालों सानंद आह्मी दिनहि बहु अला भोजना सारुनीया ।
जावें तंबूमधें ती जननि वदतसे पेशव्यांची तदा या ॥४४॥
मल्हारी बोलला कीं शिजवुन जर हो अन्न तुह्मी स्वतःच ।
आह्मांला फार मोदें प्रियकर वहिनी आज वाढाल साच ॥
तेव्हां जाऊं प्रमोदें मग सतिहि करी पाक मोठ्या त्वरेनें ।
मल्हारी, भाउ, नाना निजकरकृत ती जेववी ओदनानें ॥४५॥

शार्दूलविक्रीडित.

गद्रे जाउनि लष्करामधिं वदे मंत्र्यास गंगाधरा ।
' माझा काल फजीतिचा समय हो आलाच होता खरा ॥

+ आई.

मोठी रक्कम आणि एकदम ती द्यायास आतां नृपें ।
केली तीहि प्रभुपुढें परि अर्जे+ केलीं पुरी सत्कृपें ॥४६॥
ते गंगाधरपंत मानुनि तदा आभार सन्मानिती ।
मोठी खैर करून थोराचि तुह्मी सांभाळिली वेळ ती ॥
त्यांना फार तदा वराति दिधल्या राज्यांत द्रव्यार्थ ही ।
तांबूलादिक मानपान मिळुनी गद्रे घरीं ये तई ॥४७॥

गीति.

मल्हारीनें दुसऱ्या, दिवशीं फौजेस वाटखर्चाला ।
देऊन नालबंदी, धाडुनि दिधलीही इंदुरीं तिजला ॥४८॥
श्रीमंत पेशव्यांच्या, प्रासादीं दोन मास-पर्यंत ।
राही शुद्धान्तानें, मग तो आला असे स्वनगरांत ॥४९॥

स्वामिप्रकोपनिरसन नामक पांचवा सर्ग समाप्त.

+ परमेश्वरानें.



उत्तरार्ध.

सहावा सर्ग.

(पानिपतगमन)

शार्दूलविक्रीडित.

झालीं पानिपतीं प्रसिद्ध समरें जीं आजपर्यंत तीं ।
सारीं आप्तजनास लोकमृतिनें दुःखार्णवीं लोटिती ॥
त्यांपैकीं गिलचे मराठि-पृतना यांच्यांत झालें अती ।
मोठें जें रण घोर तें कथितसें या तुम्हि लक्षाप्रती ॥ १ ॥

शिखरिणी.

मराठ्यांना आला अपजय जरी याच समरीं ।
अतूला शौर्याचा लय किमपि झाला नच तरी ॥
असीनें शत्रूंना जरजर अती तैं करुनिया ।
मराठा म्लेच्छांना धरणिवरि पाडी छळुनिया ॥ २ ॥

भुजंगप्रयात.

कसे शूर होते मराठे पहा हे ।
जरी अन्न संपून खाया न राहे ॥
तरी म्लेंच्छपाला निरोपास सारे ।
असें धाडिती कीं ' लढा या पुढें रे ' ॥ ३ ॥

शार्दूलविक्रीडित.

हें ऐकून तदा वदे यवन तो ' कट्टे मराठे बडे ।
खाया अन्न नसे तरीहि समरा बोलाविती रोकडे ॥
योद्धे शूर खरे खुदा जरि खडा राहाल यांच्यापुढें ।
युद्धाला तरि तोहि या जनतती-लागीं पुरा ना पडे , ॥ ४ ॥
या युद्धांत बऱ्याच त्या चकमकी झाल्या परी एकदां ।
केलें म्लेच्छपराभवा जलदिनें हारूनियां तन्मदा ॥

बोले म्लेच्छप तैं ' बड्या गहजबा केलें द्विजानें अतां ।
सल्ला याजसवें प्रशस्त करणें वाटे मला तत्वतां ' ॥ ५ ॥

शिखरिणी.

अयोध्या घेण्याची मसलत रुचे देवनदिला ।
विचारी दत्ताजी पुलहि करण्याचें नजिबला ॥
महालुच्चा (पाजी) तो तैं नजिबवचना देउन पहा ।
अयोध्येच्या राजा-प्रति कळवि कीं ' सावध रहा ' ॥ ६ ॥

शार्दूलविक्रीडित.

' कोटी पांच धनास तीन शत मी तोफा तसें सैन्यही ।
हो पन्नास हजार पाठवुनिया बक्षीस देतों मही ' ॥
ऐसा उद्धौवला निरोप नजिबा धाडी हरामाप्रती ।
शिंद्याला वदला ' चला ' नजिब तो ' बांधू पुला संप्रती ' ७

गीति.

तो दुष्ट अशा कपटें, शिंद्याला संकटांत ओढाया ।
भारी यत्न करी परि, गेले यासमायिं सर्वही वाया ॥ ८ ॥

शार्दूलविक्रीडित.

बांधाया पुल मी पुढें मिरपुरा आधींच जातों तुम्ही ।
यावें मागुनि पत्र देखुनि झणीं, वेगें निघे म्लेच्छही ॥
मासानंतर पत्र एक कपटी धाडी तयाला मुधा ।
' प्रावृट्काल असे म्हणूनि पुल हा सध्यां घडेना बुधा ' ॥९
त्याचा बोल तदा खराच गमला त्या सत्यभाषी नरा ।
शिंदा त्यास निरोप धाडिहि पुनः ' तो पूल राहो बरा ' ॥
' यावें घेउन सैन्य तें परतुनी ' तेव्हां नजीबें ' चला ' ।
' नाहीं येत सुचेल तेंच करणें ' ऐसें लिही याजला ॥ १० ॥
कावा तो कळला जरा मग तदा खिन्नान्त झाला अती ।
तेव्हां भ्रात्रिय शूर-वीर वदला " मारूं मुसंड्याप्रती ॥
त्याची हो कितिशीं बिशाद " म्हणुनी डंका कुचाचा दिला ।
आली सर्वहि शुक्रतालिं पृतना तंबू तिथें ठोकिला ॥ ११ ॥
लुच्चा त्या कपटी हराम नजिबें नामी पुला बांधिलें ।
आणोनी धन सैन्य फार यवना-पासूनि तेव्हां भलें ॥

---

१ खोटें. २ फौज.

बंदोबस्त पुरा करून बसला, हल्ला मराठ्यां-प्रती ।
वेगानें करण्यास धाडस मुळीं होईचना संप्रती ॥ १२ ॥

शिखरिणी.

सुजाउद्दौल्याची सबल पृतना साह्य नजिबा ।
जशी आली तैसी नविन चमुही आणविली बा ॥
लिहूनी त्या म्लेच्छाधिप अबदलीला गिजनिच्या ।
' मराठ्या योद्धांनीं गहजबचि केला मदत या ' ॥१३॥

शार्दूलविक्रीडित.

अब्दल्ली चमु सर्व सिद्ध करुनी साह्या निघे सत्वरें ।
' दत्ताजी जनकोजिला सुवचनें भेटीस आणूं त्वरें ॥
त्यांचा नाश करूं ' अशा नजिबखां भारी प्रयत्नां करी ।
नाहीं सयश लाभलें दिलगिरी पावे तदा अंतरीं ॥ १४ ॥
येतो साह्य नजीबखांस कपटी अब्दाल्लि तो सत्वरीं ।
शिंद्याला कळतांच हें, पलिकडे जाण्यास यत्ना करी ।
ऐसे यत्न सुरूच सर्व असतां तो म्लेच्छ तेव्हां धनें ।
कोटी घेउनि माफि आज मजला बोले करा सन्मनें ' ॥१५॥
झालेला अपराध माफ करुनी घ्या द्रव्य कोटी तुम्ही ।
बोले यापरि तो वरी परि करी भारी लपंडावही ॥
हेतू आमिष दावुनी नरपती अब्दाल्लि साह्याप्रती ।
येई तों थबकून फक्त धरणें दत्ताजिला संप्रती ॥ १६ ॥
" द्या कोटी धन आपणांस म्हणजे जातों निघूनी त्वरें " ।
शिंदा त्यास निरोप धाडि परि तो ' मी आज देतों बरें ॥
देतों खास उद्यां ' अशा बहुतशा थापाच देई अरी ।
दिल्लीच्याहि नृपाप्रती फितविलें खानें तदा सत्वरीं ॥ १७ ॥
तीं पत्रें वजिरास लाभलीं तदा रागाउनीया अती ।
गाजीउद्दिन जाइ दिल्लिपतिच्या किल्ल्यामधें संप्रती ॥
म्लेंच्छांचा पति ठारही करुनिया घेऊनि सेनेप्रती ।
दत्तोजीस मिळे कथी हकीकती तेव्हां तया सन्मती ॥ १८ ॥
गाजी त्यास वदे पुन्हां ' धन तुम्हां आमीष कोटी वरी ।
दावोनी बघतोच वाट मदती-साठीं बहू हा अरी ॥
येतां साह्य तयास नाश तुमचा होईल भारी त्वरा ।
येथूनी निघण्यास फार करणें रस्ता बरा हा वरा ॥ १९ ॥

स्रग्धरा.

तेव्हां शिंद्यास त्याचें कपट कळुनिया धाडि तो पत्र एक ।
मल्हारीला " त्वरेनें जयपुर त्यजुनी साह्य येवोनि टाक ॥
थोडासा जाहला कीं जर उशिर तरी भेट ही शेंवटील । "
मल्हारीही निघाला मदत झडकरीं फार वेगें नृपाल ॥ २० ॥

शार्दूलविक्रीडित.

दत्तोजी मग तो निरोप नजिबा धाडी पुन्हां " सत्वरीं ।
धाडा कोटि धनाप्रती जर तुम्हां देणें असें हो तरी " ॥
केलें कूच अणी नदी उतरली पत्नीस पुत्रादिकां ।
दिल्लीला मग धाडुनी झडकरीं युद्धार्थ ठाके निका ॥ २१ ॥
देवोनी तळ खंदकास खणुनी केली व्यवस्था बरी ।
शिंद्यानें अपुली तशीच करुनी अब्दल्लि बैसे अरी ॥
संगें स्वार अपार सारि धरणी कंपीत झाली तदा ।
दोघेही ह्मणती मनांत " मज दे देवा यशा एकदा " ॥ २२॥
गोळ्याही नलिकांतुनी सणसणा तेव्हां सुटूं लागती ।
योद्धे थोर सुतेज दाविति तयां म्लेंच्छांप्रती संप्रती ॥
गोळ्या सोडिति फेंकिती हय जवें शस्त्रें किती तोडिती ।
म्लेंच्छांचीं समरीं शिरें जलदिनें भूमीवरी पाडिती ॥ २३ ॥
घेई धाक अरी परी पुनरपी हल्ल्यास शिंद्यावरी ।
वेगानें करितां मिळे यश तया योद्धा पळे संगरीं ॥
त्यांचें दैव फिरें असेंच गमलें तेव्हां समस्तां जना ।
आहे सत्य असेंच खास मजला वाटेहि ही कल्पना ॥ २४ ॥
प्राण्याला अनुकूल दैव असतां हानी कराया यम ।
नाहीं होत समर्थ तेंच फिरतां हो दुर्बलाच्या सम ॥
ऐसा नेम दिसे तयास धरुनी संप्राप्त झाली स्थिती ।
शिंदा शूर खरा परी यश तया ना लाभलें संप्रती ॥ २५ ॥
आले दोन हजार शत्रु यमुना ओलांडुनी सत्वरीं ।
दत्ताजी लढुनी प्रभाव असिचा दावी तयां संगरीं ॥
गोळी येउनि लागतां बरगडीमध्येंच वेगें अती ।
शस्त्रास्त्रांसह खालतींच पडला वीराग्रणी भूपती ॥ २६ ॥
तेव्हां दुष्ट नजीबखान-गुरुनें येऊनिया मूर्च्छिता ।

कंठस्नानच घातलें त्रिदिवी तो झाला तदां चालतां ॥
त्यायुद्धीं जनकोजिलाहि गुलिका डाव्या करा लागली ।
तो घायाळ पडे महीवरि तदा, इच्छा प्रभूची भली ॥ २७ ॥
मल्हारी नृप माधवा जयपुरीं गादीवरी बैसवी ।
ही ध्यानांत असेल खास तुमच्या सत्कीर्ति जी मोदवी ॥
तेव्हांपासुन लक्ष सार्ध तिन त्या मल्हारिला द्यावया ।
झाला सिद्ध नृपाल देतहि असे तो खंड मोर्दे तया ॥ २८ ॥
सत्रार्शे नवयुक्त अर्ध शतकीं अक्टोंबराच्या–मधीं ।
राजापासुनि खंड तो वसुलिला मल्हार आला सुधी ॥
तेव्हां त्या जयपूर–पालक नृपा दुष्ट नजीबें अशी ।
सल्ला तैं दिधली 'नकोस कर तो देऊंच मल्हारीशीं ' ॥२९॥
त्याला थांबवुनी तिथेंच धरुनी राजा रहावें बरें ।
दत्तोजीप्रति खास चीत करितो आम्ही इथें सत्वरें ॥
दत्तोजीविषयीं असे नृपतिच्या चित्तांत काळें तदा ।
या–साठींच कृतघ्न माधव बने मल्हारिशीं राज्यदा ॥ ३० ॥
मागे खंड तयास मालवपती तेव्हां वदे तो तया ।
देतों आज उद्यां असें प्रतिदिनीं काळास लोटावया ॥
मल्हारीस कळे तदा नृपतिचा कावा खरा पत्तना ।
मोर्चेबंदि करून मालवपती मल्हारि कापी जना ॥ ३१ ॥
शिंदा तत्समयींच पत्र मदती–साठींच या या लिही ।
मल्हारी बघुनी निघे झडकरीं सैन्यास घेऊनहि ॥
चितीं काळजि वाटली बहु तया मित्रावरी संप्रती ।
कैसा वेळ असेल काय न कळे वाटे असें त्यांप्रती ॥ ३२ ॥

पंचचामर.

सहाजणेंच वाजवीत सैन्य येत तें यदा ।
सहाय तोंच कोटपूतळीहि लागली तदा ॥
दिलें तळास तों कळे अरीकडून मित्र तो[२] ।
मरे लढाइच्या मधें श्रवुनि होइ खिन्न तो[३] ॥ ३३ ॥

शार्दूलविक्रीडित.

दत्तोजी वधुनी पराभव पुरा केला अविंधाधिपें ।
आला तो जनकोजि विप्लुत[४] चमू घेऊनिया सत्रूपें ॥

१ स्वर्गात २ दत्तोजी शिंदा. ३ मल्हारराव ४ दाणादाण झालेली.

मल्हारी जनकोजिचे श्रम हरी साह्यास भारी करी ।
दत्तोजी मृति ऐकुनीच पडला हौद्यामधें सत्वरीं ॥ ३४ ॥

स्रग्धरा.

मंत्री गंगाधराला हकिकत कळली धावुनी तेथ आले ।
त्यांनीं मल्हारबाला जलद उतरुनी मुख्य तंबूत नेलें ॥
तेथें मल्हारबा तैं अपरिमित करी शोक अश्रू पहातां ।
भार्या बोले तयाला 'असुनि अनुभवी दुःखि कां व्यर्थ होता' ३५

शार्दूलविक्रीडित.

आतां शोक पुरा करूनि अपुला शिंद्याकडे हो चला ।
सांत्वा त्यास वचें कुटुंबसह जो दुःखें अति व्यापिला ॥
मल्हारी मग स्वार होउनि हयीं शिंद्याकडे चालला ।
सांत्वाया जनकोजिला झडकरीं वेगें तिथें पोंचला ॥३६॥
शिंद्याच्या ताळें येउनीच बघतां मल्हारजी चौगुला ।
बाई भागिरथी तशीच सुनही बैसे तरूच्या मुळा ॥
मोठ्यानें रडती नसेंच बसण्या त्यांना तदा राहुटी ।
दैवानें पडतो मनुष्य बहुधा दुःखीं तसा संकटीं ॥ ३७ ॥
मल्हारी जनकोजिला बघुनिया भारी रडूं लागला ।
जैसा शूर तसाच कोमलमना ऐसा जना भासला ॥
घाली कांठें मिठी पुनः नरपती कंठा करी मोकळा ।
भारी दुःख करी पडे अवनिला मल्हारचा चौगुला ॥ ३८ ॥

गीति.

दत्तोजीची पत्नी, भागिरथि बाइ तैं बहू रडुन ।
भूमीवरीच पडली, रडलीही तैं तिची बहूत सुन ॥ ३९ ॥
जें दुःख तीन दिन हो, सायासें गिळुनि सोशिलें त्यांनीं ।
गौतामिबाई बघतां, आलें फोडूनि हृदय तें नयनीं ॥ ४० ॥
डेरे तंबू तेव्हां मल्हारीनें दिले स्वतांकडले ।
तच्छिबिरीं राहति ते, दुःखाब्धीच्या मधींच जे बुडले ॥४१॥

शार्दूलविक्रीडित.

' झाली सिद्ध चमू तुह्मावरि विभो येण्याप्रती यावनी ।
आहां स्वस्थ कसें ? तुह्मी अजुनही निर्धास्त हो या वनीं ' ॥
मल्हारीस सुराजमल्ल जलदीं ऐशा निरोपाप्रती ।
धाडी ऐकुनि हा विचार करि ही जाण्यास दुःखें अती ॥४२॥

मल्हारी जनकोजिला मग वदे ' आहां तुह्मी हो व्रणी ।
जावें यास्तव चंबला उतरुनी पत्न्यादिकां घेउनी ॥
आम्ही म्लेंच्छनृपाप्रती बघुनिया घेऊं नको काळजी ।
रामाजी चमुच्यासमेत समरासाठींच ठेवा अजी ' ॥४३॥
' आहां वृद्ध तुह्मी, तुह्मी निघून जा ' शिंदा वदे शूर तो ।
काकांचें पडलें शरीर समरीं आम्ही तिथें झुंजतों ॥
' शत्रू जिंकिन वा मरून समरीं कैलासिं भेटावया ' ।
' काकांना, निघुनीच जाइन विभो तुम्ही चला माळव्या ॥४४
ऐकेना जनकोजिराव अपुलें मल्हारिला वाटलें ।
रागानें उठुनी निघूनि मग ते तंबूंत गेले भले ॥
पत्नीला कथिली तदा सकलही वार्ता तदा ती वदे ।
' आहे मूल परंतु हिंमत बहू शिंद्याप्रती ईश दे ' ॥ ४५ ॥

शार्दूलविक्रीडित.

" तुह्मी शूर तसें अहां अनुभवी धैर्यास कां सोडितां ?
तुह्मीं सयश जोडिलें बहु तया कां काळिमा लावितां ॥
शिंदा जें वदला तया अनुमती यावीच वाटे बरें "
तेव्हां तो जनकोजिला कथितसे ' नाहींहि मी जात रे ' ॥४६

मंदाक्रान्ता.

दत्तोजीचा दशम दिन तो सारुनीया नदीला ।
तेरावाही करुनच तिथें शूर योद्धा निघाला ॥
मार्गे त्यांना यवनपृतना धांवते वाटलें जें ।
जैं हे योद्धे पळति पुढती तैं हुतूतूच माजे ॥ ४७ ॥

शार्दूलविक्रीडित.

मल्हारी जनकोजि यापरि अहो धावावया लागले ।
फाल्गुनांत चतुर्दशीस सगळे दिल्लीप्रती पोंचले ॥
तेथूनीहि शिकंदरा-जवळ ते कालिंदि ओलांडिती ।
त्या पूरा लुटुनी सुरम्य शिबिरे राहावया ठोकिती ॥ ४८ ॥
केलें पूजन होळिचें बहु मुदें जेवावया बैसले ।
तों आलेंच सुरजमल्लकडुनी सत्पत्र तें वाचिलें ॥
' एतें मागुनि सैन्य यावनि[1] तुह्मी वेगें निघावें बरें ' ।
ऐकूनी नृप बोलती ' उभयतां झुंझूं खळांशीं त्वरें ' ॥ ४९ ॥

---

१ मुसलमानांचें.

शिंदा त्यास वदे ' लढा अरिसवें तुम्हीच आतां अती ।
धास्ती खाउनि फौज माझि परते युद्धांतुनी संप्रती ' ॥
मल्हारी वच ऐकुनी निघुनिया तंबूमधें पातला ।
गंगोबास कथी ' तुझी अनुमती आहे कशी याजला? ॥५०॥
शिंदा दुःखि असून तो जखमिही आहे तयाच्या सवें ।
गेलें संप्रति पाहिजे मज तुम्ही झुंजा अरीच्या सवें ' ॥
आज्ञा मान्य करूनिया सचिव तो तेथें तदा राहिला ।
मल्हारी जनकोजिच्यासह पुढें अग्र्याप्रती पातला ॥ ५१ ॥
म्लेंच्छांची चमु उर्वरीत चमुशीं झुंजावया धावली ।
हीही धावुनि यावनी[1] चमुस त्या ठोकावया लागली ॥
कावा योजुनीया यदा निघति हे सोडूनिया संगर ।
मार्गीं शत्रु दबा धरून बसले ते धावले यांवर ॥ ५२ ॥

शिखरणी.

मराठ्यांची सेना मुठभरच आधी असुन ती ।
द्विधा झाली आणी परिभवहि झाला मग अती ॥
अरीच्या सेनेच्या पुढतिं तग काढील रणिं ही ।
पळे भारी वेगें किति पडति योद्धे दडतिही ॥ ५३ ॥

मंदाक्रांता.

केली आज्ञा यवनपतिनें फार हर्षें स्व-लोकां ।
जो जो कोणी अरिकडिल अहो सांपडे त्यास ठोका ॥
कापा त्याचें शिर यमगृहा धाडुनी द्या हरामा ।
त्यांचा आतां सुड उगवुनी सर्व त्यांची हरा मा ॥ ५४ ॥

शार्दूलविक्रीडित.

शेटीबा पडला दुजा महिपती युद्धामधें त्या पडे ।
झाला नाश अपार सर्व पळती हो प्राप्त हें सांकडे ॥
रस्ता ज्यास मिळे जिथूनि तिकडे धावावया लागती ।
मार्गीमाजि अरीकडील सुभटीं केलीहि त्रेधा अती ॥ ५५ ॥
शेटीबा पडला रणांगणिं तदा आसन्नमृत्यूपरी ।
त्याचा पुत्र तयास देउन उशी मांडी बसे सत्वरीं ॥
आला एक पठाण त्यास चिरण्या तेव्हां खराडे वदे ।
" माझा पुत्र तुझाच हा समजुनी या जीवदानास दे" ॥५६॥

---

1 मुसलमानांचें.

" आहे एकच पुत्र हा मजप्रती ", तत्प्रार्थना ऐकुनी ।
म्लेंच्छानें सदया तया वचन तें हर्षें अती देउनी ॥
काढूनी सुत फार शर्थ करुनी त्या पाँचवी सत्वरीं ।
तो मिथ्या सुखरूप तच्चमुमधीं केली दयाही खरी ॥ ५७ ॥
अग्रयाला किति धावती कितिक ते सिंधूमधें* घालिती ।
जाती रामगडास धावुन किति शत्रू अती कापिती ॥
धारातीर्थि कितीक मुक्ति वरिती तन्नाश झाला अती ।
वर्णायास अशक्य प्राक्तन तसे दुःखाब्धिही लोटती ॥ ५८ ॥
" झाले युद्ध अपार म्लेंच्छरिपुशीं दत्तोजि काका रणीं ।
जाती सोडुनि आपणास गिरिला त्या शंभूच्या हो क्षणीं ॥
आहीं धांवत सर्व होळकरही आम्हासवें धांवती " ।
तेव्हां ते जनकोजि पत्र विभुला ऐसें त्वरें धाडिती ॥ ५९ ॥

इंद्रवज्रा.

उद्धीर येथें लढुनी यशश्री ।
लाभूनि शोभे बहु जे मुखश्री ॥
ऐशामधें पत्र मिळे नृपास ।
खिन्नान्त झाला बघुनी तयास ॥ ६० ॥

शार्दूलविक्रीडित.

तेव्हां तो बळवंतराव वदला मेहेंदळा भाउला ।
" भाऊ! कां दिलगीर स्वस्थ बसलां? युद्धार्थ जाऊं चला ॥
म्लेंच्छांची कितिशीं बिशाद यवना जिंकूनि टाकूं त्वरें ।
फेकां अश्व जवें तया सुविषयीं जिंकूं अविंधा बरें ॥ ६१ ॥

गीति.

स्वारित लाहोराच्या, मार्गें दादास कर्ज बहु झालें ।
झाली कुर्बुर यास्तव, चमुचें स्वामित्व भाउला आलें ॥ ६२ ॥
हिंदुस्थानावरतीं, जाण्याचा बेत ठरविला त्यांनीं ।
नानाच्या तंबूला, जाउति नानास[1] सांगती नमुनी ॥ ६३ ॥

शार्दूलविक्रीडित.

" दादा फार जवें सहाय तिकडे शिंयादिका संप्रती ।
संगें साठ हजार घेउनि चमू जावोत त्या भारतीं ॥

* नदींत (यमुनेंत). १ नानासाहेब पेशव्यास.

जैशी जैशि चमू तयाप्रति पुढें लागेल तो येथुनी ।
धाडावी प्रभुजी आम्हां गमतसें कैसें प्रभूच्या मनीं " ॥६४॥
तें नाना वदले " तिघांतुन जरी कोणीहि योद्धा अतां ।
आर्यावर्तिं निघेल आय अपुला जाईल हो तत्वतां ॥
यासाठीं चमु धाडणें मदतिला राहूं इथें आपण । "
भाऊ ऐकुनि बोलले पुनरपि " जातों कराया रण " ॥६५॥

भुजंगप्रयात.

" निजामाप्रमाणें नसे तो दुराणी ।
असे शूर जो जेर शियास आणी ॥
यशासाठिं कृत्यें जगामाजिं लोकां ।
प्रभो लागताती करावी विलोकां " ॥ ६६॥

शार्दूलविक्रीडित.

" येथें राहुनि मृत्यु खास टळतो ऐसी हमी कोणिही ।
देण्याला धजणार नाहिं समरीं येतो तसा मृत्युही ॥
जें होणार असेल तें न चुकतें नाहीं नराच्या करीं ।
आज्ञा यास्तव द्या मला अरिवरी जाण्याप्रती सत्वरीं " ॥६७॥
दादाला मग आणुनी स्वशिबिरीं नाना म्हणे त्याजला ।
' दादा घेउन जा चमू अरिवरी जिंका जवें शत्रुला ॥
म्लेच्छांचा अगदीं विनाश करुनी आणा इथें लौकिका ' ।
हें ऐकूनि वदे रघुपति तदा नानास तें आयका ॥ ६८ ॥
" सेना ऐंशि हजार, कोट रुपये खर्चास द्यावे मला ।
घेतों पाहुन शत्रु दुष्ट कपटी मी जिंकितों त्याजला " ॥
" नाहीं संमत जाहलेंच अपणा वाटेल तैसें करा ।
द्रव्या-वाचुन भारतीं न निघवे युद्धा मला चाकरा " ॥ ६९ ॥
भाउ निष्ठुर बोलला म्हणुनि या दादा अटी लाविती ।
रागें भाउ निघेच युद्ध करण्या-साठीं स्वयें संप्रती ॥
नानाचा सुत संगतीं तसि चमू सर्दार लोकांप्रती ।
संगें घेउन शूर राव निघती युद्धाप्रती भारतीं ॥ ७० ॥

गीति.

गायकवाड दमाजी; पवार यशवंत आणि भापकर ।
नारोशंकर, शिंदे; इब्राहिमखानही सर्वे चतुर ॥ ७१ ॥

रावें सर्वें घेउन हे; वीर निघालेच दिल्लिला वेगें ।
नाना पुण्यास गेले; घेउन शिल्लक चमूप्रती संगें ॥ ७२ ॥
इब्राहीम म्हणाला; गनिमी कावा करूं नये अपण ।
तोफा घेउन पळणें, होणें नाहींच आपणा-कडुन ॥ ७३ ॥
भाऊ साहेब वदे, धैर्य धरुनि संगरासि ठाकाल ।
जेथें तुह्मी तिथें मी, राहूं हालूं न, यो+ पुढें काल '' ॥ ७४ ॥
होता मुहूर्त लांबाचि, यास्तव रात्रीं शिवा-लिखीतानें ।
जाण्याचा निश्चय तैं, केला तेव्हां सगर्व भाऊनें ॥ ७५ ॥

शार्दूलविक्रीडित.

म्लेंच्छांचा गज एक कल्पुन दुजा तो पेशव्यांचा करी ।
त्यांची लावुनि झुंज पाहति यशा हत्ती कुणाचा वरी ।
तेव्हां सयश लाभलेंच करिला म्लेंच्छाचिया पाहुनी ।
भाऊ जाउं नको कथी रघुपती जाई न तें ऐकुनी ॥ ७६ ॥
घोडेस्वार तशाच भव्य नलिका घेऊनि संगें त्वरें ।
भाऊ पानिपता निघे अरि बहू भीति जयाच्या दरें ॥
पाहूनी मदमस्त हत्ति शरमे ज्या भाउच्या हो मदा ।
येई मालविं आणि पत्र लिहि तो मल्हारवाला तदा ॥ ७७ ॥
' आम्ही मालविं पावलों तर पुढें ऐसें करूं कूच कां ? ।
किंवा राहुं इथेंच घेउन चमू ' मल्हारि ' येऊं नका '
ऐसें लीहि तया ' प्रधान पुरुषें सेना सहाया मला ।
धाडावी जय पुण्यनाम अपुलें देईल हो चांगला ॥ ७८ ॥
भाऊ पाहुनि पत्र बोलवि तदा मंत्र्याप्रती तें कसें ।
आहे तन्मत पाहण्याप्रति वदे मेहेंदळे तैं असें ॥
' एथें राहुनि सौख्य भोगिति बहू शिंदे सुभेदारही ।
येणें त्या रुचलें न धाक अरिचा हा दाविती व्यर्थही ' ॥७९॥

गीति.

' आहे थोर दरारा, प्रताप अपुला बहू तसा आहे ।
गिलचा निघून जाइल, येतां ऐकूनि चित्तिं घ्यावें हें ॥८०॥
यापरि बळवंतानें, स्तवितां कथितां अहं-मदें फुगला ।
भाऊ रावास वदे, शत्रूला मारण्या रणास चला ॥ ८१ ॥

---

१ सदाशिवराव. + येवो. २ सदाशिराव–भाऊ ३ बळवंतरावास.

शार्दूलविक्रीडित.

तेव्हां म्लेच्छपती नदीपलिकडे होता तळा देउनी ।
शिंदे होळकरादि सर्व शिबिरें केरोलिला स्थापुनी ॥
प्रावृट्काल कसातरी हळु हळू लोटावया लागती ।
तों भाऊ थडके कुंवारिजवळी घेऊनि सेनेप्रती ॥ ८२ ॥
धाडी पत्र तदा सदाशिव पुनः मल्हारबाच्या-कडे ।
" आम्ही ढोलपुराकडून उतरूं किंवा अचेरीकडे ॥
घाटानें उतरूं त्वरेंच कळवा " मल्हारि लीही भला ।
जें वाटेल तसें करांच अथवा राहांच ग्वाल्हेरिला ॥ ८३ ॥

गीति.

पत्रा बघूनि पुनरपि, जमवी मुत्सद्दि लोक तंबूंत ।
तेव्हां ही बळवंतें, स्तुतिनें फुगवूनि टाकिला जास्त ॥ ८४ ॥
" पत्राकडे न द्यावें, लक्ष तुम्ही शत्रुच्या-वरी धांवा ।
कावा मल्हारीचा, मज कळला वाटतो तया हेवा " ॥८५॥
" दिल्लीस चला आपण, " ऐकुन विट्ठल वदे तया प्रभुला ।
जाणें अरिवरि आतां, बरें दिसेना मुळींच हें मजला ॥८६॥
निर्भय बघूनि अपुलें, राज्य अम्ही आणिल्या सर्व जाया[1] ।
काशी-यात्रेसाठीं, यास्तव येथेंच तंबु ठोकूं या " ॥ ८७ ॥
विट्ठल मल्हारीचा; मित्र ह्मणुनि ऐकिलें कुणी वच न ।
ढोलपुराहुन नादिला, आला सैन्यानिशींच उतरून ॥ ८८ ॥
मुचकुंदतीर्थ पाहुन, स्नान तिथें करुन श्राद्धही केलें ।
भाऊ आग्र्याच्या मग, रोखानें गंभिरेवरी आले ॥ ८९ ॥
तंबू तेथें दिधले, मोदानें राहिले मजा करित ।
इत्यादि कथा पुढतीं, श्रेष्ठ जनाला करीन मी विदित ॥९०॥

पानिपत-गमननामक सहावा सर्ग समाप्त.

सप्तम सर्ग.

(बळवंतनिधन.)

शार्दूलविक्रीडित.

भाऊंचा तळ ज्या स्थळींच पडला तेथेंच ती छावणी ।
होती हो जनकोजिची जवळची शिंदा तया भेटुनी ॥

---

१ बायका.

वन्दी तैं उभयांस दुःख आति हो झालें समाधान तो-।
भाऊ त्या जनकोजिचें करुनिया, वस्त्रादिकां अर्पितो ॥ १ ॥

स्रग्धरा.

भेटे मल्हारि तेव्हां बिलकुल परवा ठेविता तो न झाला ।
भाऊची त्याजला तो खडखडुन वदे " तुम्हि कां येथ आलां॥
भोंतालींही मिळालीं वकुबाहिन मुलें मोहरा हा इरेला ।
आणोनी पाडिला हो " बहु कळकळिनें बोलता त्यास झाला॥२॥

गीति

होउनि शांत जरासे, पुनरपि वदले तयाच भाऊला ।
" ठेवाल कुठें सांगा, प्रसंग आल्यास या मुलां बाळां " ॥३॥
भाऊ तैं डळमळला, करुनि विचारा तयाप्रती वदला ।
" आला प्रसंग तरमग, ठेवुन देतों स्त्रियांस आग्र्याला" ॥४॥
किल्लेदारास दिलें, दाहा हाजार रोख रुपयांना ।
घेउनि वचन तयाचें, ' प्रसंग आल्यास साह्य मी अपणां '॥५
भाऊ मग सेनेला, घेउन दिल्लीकडे निघाले ते ।
तेथें नजीब चमु जी, होती ती धावली लढाईतें ॥ ६ ॥
झाली घोर लढाई, किल्ला आणीक हस्तिनापुरही ।
आलें ताब्यांत तदा, आनंदाला पुरी पडे न मही ॥ ७ ॥
भाऊच्या आज्ञेनें, जाटाला साह्य आपणां अणिलें ।
शिंदे होळकरांनीं, भाऊंनींही तयास गौरविलें ॥ ८ ॥

शार्दूलविक्रीडित.

दिल्लीचा नृपती फितूर गिलचा लागींच होता तया ।
गाजी ठार करी, तदा नृपपदीं बख्तास स्थापूनिया ॥
त्याला नांव दिलें शहा अलम हें त्या पेशव्यानें मुदें ।
नाणीं पाडविलीं जनास अपुल्या जो मान नेदी मदें ॥ ९ ॥

वसंततिलका.

राजे बहाद्दर दिलें पद नारबाला ।
मल्हारि आणि जनकोजि परस्पराला ॥
एकान्ति गांठ पडतां वदतीच आतां ।
होता पदोपदिं कसा अपमान ताता ॥ १० ॥
राजाहि तो वदतसे मग माळव्याचा ।
भाऊ मुळीं न धरितो भिड दुष्ट साचा ॥

तेव्हां पुढें गति मला बरवी दिसेना ।
वागूं कसा सदुपुढें मज हें कळेना ॥ ११ ॥
शिंदा तयास वदला स्वकरें प्रतिष्ठा ।
राखूनि घ्यावि मजला गमतें वरिष्ठा ॥
सल्ला तयास पुढतीं अगदीं न द्यावी ।
राहूनि संगति परी समरें करावीं ॥ १२ ॥

स्रग्धरा.

भाऊ गर्विष्ठ आधीं, जय मिळवुनि तो फार झाला मदांध ।
केलें मेहेंद्ळ्यानें फुगवुन पुरतें भाउला खास अंध ॥
त्या नारोशंकराला दिधलि सचिवता भाउनें सर्व रुष्ट ।
केलें तेव्हां हितेच्छूप्रति कृति करुनी पावला मोद दुष्ट ॥१३॥

शार्दूलविक्रीडित.

झाला जाटहि खिन्न फारच मनीं बोले प्रधानाप्रती ।
" जावें स्वाविषयीं दिसे मज बरें आमात्यजी संप्रती ॥
मल्हारी बहु रुष्ट होइल कसें आतां करूं ना कळे " ।
ऐसें बोलुन जाट गप्प बसला भाऊ न कोणा वळे ॥१४॥
बुंदेल्यास कथी सदाशिव तदा ' पन्नास लक्षा धना ।
द्या तुह्मी ' समयास जाणुन तसें तोही करी सन्मना[१] ॥
खर्चाची पडलीच ताण म्हणुनी तख्तास फोडी त्वरें ।
नाणें पाडविलें त्रिवर्ग[२] वदतां ' हें योग्य नाहीं बरें ' ॥१५॥

स्रग्धरा.

शिंदा मल्हारजी तो सुरजमल तदा फार झाले उदास ।
भाऊ सल्ल्यास घ्याया पुनरपि पुसतो तैं त्रिवर्गा तयास ॥
" गंगेला फार पाणी अरिहि पलिकडे गुंतुनी राहिला हे ।
संधी हल्ला कराया नृप कुतुबशहा जिंकण्या योग्य आहे " १६

शार्दूलविक्रीडित.

तेव्हां जाट ह्मणे ' कृपा करुनिया ऐकाल माझें जरी ।
मी तुम्हां कथितों प्रभो सचिवता गाजीस द्यावी तरी ॥
गार्दीचें छत बैसवा पुनरपी दासीं असोद्या दया ।
दाणा घास तुम्हांस मी पुरवितों राहा सुखें स्थानिं या ' ॥१७

---

१ चांगल्या मनाचा २ मल्हारराव, जनकोजी व सुराजमल.

' शिक्षा त्या कुतुबास खास करणें आहे तरी त्रास तो ।
खाशांनीं जर सेवका-वर दिला टाकूनि तैं झुंजतों ॥
मल्हारी जनकोजि वा प्रभु-रुपें मीही दुजेही जन ।
देऊं युद्ध जयाप्रतीहि मिळवू एथें रहां आपण ' ॥ १८ ॥
' दिल्ली सोडुनि आपले अरिवरी जाणें दिसेना बरें ।
दासाचें कर जोडुनी विनवणें आहे प्रभो हें खरें ॥
मल्हारीहि तदा असेंच वदला ' सर्वा चमूच्या सह ।
एथूनी हलणें अयोग्य दिसतें, आहे अरी दुःसह ' ॥ १९ ॥

शिखरिणी.

' जमावानें एका समर करण्याचा चमु-प्रती ।
सरावा हो नाहीं, अरि-चमुस आहे संवय ती ॥
अरीला द्या यावी नच रसद पोंचूं मउच हा ।
जरासा झाला, कीं रण करुन ठोकूं अरि पहा ' ॥ २० ॥

स्रग्धरा.

जाटाला खाट भाऊ हट धरुन वदे ' खिन्नता तूज द्याया ।
जाटा नाहींच आलों मदत तुजप्रती द्यावया वा कराया ॥
आहे सामर्थ्य आम्हां अरिमथनिं पुरें वाटलें योग्य तूतें ।
राहावें राहि जावें जर नच रुचलें आपुल्या तूं गृहातें ' ॥२१

शार्दूलविक्रीडित.

शिंदेहोळकरांस वाइट अती हा बोल ऐकूनिया ।
वाटे, जाट उदास फारच मनीं झाला परी भीड् या ॥
भाऊनें बळवंतराव-वचनें ' जाटा लुटूं ' दुर्मनें ।
केला बेत परंतु त्यास पळवी मल्हारबा युक्तिनें ॥ २२ ॥
घंटा तोडुन हत्तिच्या झडकरीं रात्रीं पळोनी यदा ।
गेला जाट दुज्या दिनीं नृप कथी भाऊस त्या त्रासदा ॥
' भाऊ जाट पळे चमूसह-जवें सोडूनिया संगरा ।
सेना मी धरण्यास धाडुन दिली आतांच त्या पामरा' ॥ २३ ॥

स्रग्धरा.

भाऊंनींही जराशी चपल चमु दिली धाडुनी त्या धराया ।
क्रोधें रावास बोले ' बघु पुढतिं कसें काय तें योग्य राया ॥
म्लेच्छांचा मोड झाला तर मग अरिला लावितों वंदण्याला ।
त्याचा तो पाड आहे किति मजपुढतीं' बोलुनीया निघाला २४

भाऊ चालून आले करि-नगरिवरि ठोकिती तंबु तेव्हां ।
झाला प्रारंभ युद्धा मग कुतुबशहा धांवला यावरी हा ॥
म्लेच्छांचा मोड केला अरि बहु चिरिले शत्रुनें घेतलें भें ।
शत्रूंना मारिलें तैं जय मिळुन खरा द्रव्यही फार लाभे ॥२५॥
ज्यांना जी लूट लाभे सकलहि 'दिधली भाउंनीं ज्याचि त्याला।
झाला तैं हर्ष सर्वा गजवरहि मिळे तो जव्हेरी तयाला ॥
तेव्हां शत्रू दमाजी-करिं कुतुबशहा सांपडे त्यास त्यानें ।
भाऊच्या सांनिधानीं करि-वरुन दिला धाडुनी फार मानें ॥२६

शार्दूलविक्रीडित.

त्याला पाहुनियाच भाउ वदले 'मांगास (म्लेंच्छास) द्या लोटुनी'।
आज्ञा ऐकुनि शत्रुनें उडि दिली भूमीवरी टाकुनी ॥
नेलें भाउपुढें तयास तंव तो बोले जना विप्र हा ।
'टाका तोडुनि मस्तका जलदिनें हा नीच आहे महा' ॥२७॥
तों शत्रू कर जोडुनी वदतसे 'द्या जीवदाना मला ।
सल्ला मी करवून देइन विभो म्लेच्छाधिपाशीं भला' ॥
त्याची ती विनती श्रवुनी वदले मल्हारबा चौगुले ।
'भाऊ मान्य करा विनंति मज हें आतां गमे चांगलें' ॥ २८
'दत्ताजी वधिला जरीहि यवनें त्याच्या शिरा तोडुनी ।
तो येतो परतून हें न घडणें, सोडा गरीबा झणीं ॥'
भाऊंना मद फार फार चढला ऐके न तेव्हां मुळीं ।
आकाशीं शिर फेंकिलें शव दिलें टाकूनिया भूतळीं ॥ २९॥

गीति.

कुंजपुर लुटायाला, केला प्रारंभ भाउंनीं जेव्हां ।
जामाता व्याही-ही, नजिबाचा लुटुन काढिला तेव्ह ॥३०॥
नजिबाचा खजिना या, दोघांनीं आपणास दावावा ।
यास्तव पेंढाऱ्यांना, हुकुम दिला, 'यांस चापही लावा' ३१
मिरच्यांचे राखेचे, दिधले दोघांस तोबरे दोन ।
पलिते बोटा लाविति, तेव्हां ते सांगती तया नमुन ॥ ३१ ॥
खजिना लुटूनि त्यांना, कैदेमधिं ठेविलेंहि भाऊंनीं ।
सल्ल्यानें सचिवाच्या, दुर्ग दिला मग तसाच ढासळुनी ॥३३॥
दुसरे दिनिं भाऊंशीं, गर्वे बळवंत मारि गप्पांला ।
'गिलच्यांचें भय शिंदे, दावित होते उगेंच आम्हांला ॥३४॥

शिंदे होळकरांची, दुकल भेटावया तदा आली ।
बोले भाऊस मुदें, "जय मिळवुनि कीर्ति दूर घालविली" ३५
"आतां कूच करोनी, दिल्लीला राहण्यास जावें हें ।
आम्हांस योग्य वाटे, दुराणि सामान्य शूरसा नोहे" ।। ३६ ।।
बळवंत दिम्माखानें वृद्धांतर टोंचण्या वदे "काका ।
तुमच्या आंगीं अजुनी, रिपु–भय शिरलेंच फार आहे कां" ३७
मल्हारी शूर तसा, होता हो स्पष्ट सत्य वक्ता तो ।
बळवंतास म्हणाला, "जय–योगें मूर्ख तोचि बहु फुगतो" ३८
"जोंवरि पंचास्याची, गांठ न तों चालती तुझ्या गोष्टी ।
बघतां अरि–केसरिला, करिची वरिशील तूं त्वरें धाटी" ३९
ऐसें बोलुन रागें, वृद्ध करी गमन आपल्या शिबिरीं ।
तेव्हां भाऊ वदले, "याची दिसते अरी-सवें फितुरी" ।।४०।।
आधीं बुद्धी जाते, धन जातें मागुनी असा नियम ।
दोन्ही जातां येतो, वेगें करण्यास जीवहानि यम ।। ४१ ।।
उद्गीरची लढाई, दिधल्यापासूनि भाउची सुमती ।
जाउन विवेक गेला, हृदयीं येऊनि राहिली कुमती ।। ४२ ।।
कुंजर-पुरा-कडिल हें, वृत्त अरी तो समस्त आयकुनी ।
होउनि लालचि कोपें, युद्धास्तव धावला नदी तरुनी ।।४३।।

स्त्रग्धरा.

भाऊला बातमीही कळुन चकित तैं होउनी सर्व शूर ।
योद्धे गोळा करूनी वदति मग 'कसा तो करावा विचार' ।।
मल्हारी बोलला कीं 'स्थविर बहुत मी आणि भित्राच आहें।
आतां मेहेंदळ्याला पुसुन मग करा नीट जें तें स्वभावें' ।।४४।।

शार्दूलविक्रीडीत.

'पूर्वीच्या सुचनेवरी करिपुरीं जाणें बरें हो दिसे'
तैं इब्राहिमखान भाउस वदे 'नेतों तुम्हांला तसें ।।
तोफांचा करुनीच गोलक चमू घालून मध्यें चला' ।
हें वाटून बरें चमूसह तदा दिल्लीस तो चालला ।। ४५ ।।

मंदाक्रांता.

सेना थोडी अरिवर दिली धाडुनी भाउनें त्या ।

मारा खाई परत जलदीं पावली भाउ नेत्यां ॥
सेने-भोंतीं त्वरित परिखा भाउनें खोदवीली ।
दोहों कोसांवरि तिथुन त्या शत्रुनें वस्ति केली ॥ ४६ ॥

स्रग्धरा.

भाऊचा धाक मोठा ह्मणुन न करवें चाल त्या म्लेच्छपाला ।
तेव्हां त्या शूर वीरें रसद मिळुं दिली नाहिं विप्राधिपाला ॥
त्यायोगें जाहला तो विगलितमद हो सर्व संपून पैसा ।
दैवानें भाउवीरीं काठिण समय तो आणिला आज कैसा ॥४७॥

गीति.

गोविंदपंत आणी, पाराजीपंत या उभयतांला ।
म्लेंच्छान्न-पूर्ति बंदचि, करण्याला भाउ धाडितां झाला ॥४८॥
जैता गुजरानेंही शत्रूला यातमी दिली सारी ।
गिलच्यांनीं सेनेला धाडुन दिधलें त्वरेंच शत्रुवरी ॥ ४९ ॥
गोविंदपंत सावध, नसतां हल्ला त्वरें करी चमु ती ।
बुंदेल्याचें मस्तक, कापुनि केली खरी पराभूती ॥ ५० ॥
भाऊच्या सेनेमाधें, इकडे दुष्काळ फार तैं पडला ।
वितळुनि कडितोडे तो, नाण्यांचा ढीग पाडिता झाला ॥५१॥

शार्दूलविक्रीडित.

जेव्हां खेप लमाण घेउन-चमूमध्येंच येती बहू ।
साहा+ वा रुपयांस पांच+ मिळती तैं शेर+ लोकां गहूं ॥
होतें द्रव्य जरी तरी सकळिकां मृत्यू दिसूं लागला ।
तेव्हां जाट तयास खास अठवे शुद्धान्त जो चांगला ॥ ५२ ॥
जाटें भाउप्रती असेंहि कथिलें होतें ' दयाळो प्रभो ।
सेनेला पुरवीन धान्य सगळ्या वर्षाहुनी जास्त भो ॥
पैशा शेर चणे तसेंच पिठही पैशाप्रती शेर बा ।
यासाठीं अपमान जाटपतिचा सोसी न मल्हारबा ॥ ५३ ॥
भाऊंनीं मग दिल्लिला लिहुनिया द्रव्याप्रती आणिलें ।
पाराजी-करवीं परंतु फसले पाराजि मार्गीं भले ।
कच्चे चाळिस कोस चालति जवें पाहाट झाली तदा ।
त्यांना गोट दिसे तयांत घुसले घेवोनिया संपदा ॥ ५४ ॥

---

१ नायक जो भाऊ त्याकडे २खंदक. + पांच सहा रुपयांस एकशेर गहूं.

इंद्रवज्रा.

होता सुजाचा जरि गोट तेथें । कळों न देती तरि पृच्छकांतें ॥
हा गाडदीचा वदती तयांला । शीतार्थ ते धांवति आश्रयाला ॥५५॥
गोटांत आले बघुनी अशी ही । संधी फुका घालवीती न तेही ॥
चराचरा कापुनिया शिरांतें । हिरोनि घेती मग तद्धनातें ॥५६॥
जे दूरदर्शी बहु दूर होते । हा म्लेंच्छकावा निरखूनिया, ते-।
तैं आडवाटे मग शीघ्र जाती । प्राणां धना यापरि वांचवीती ॥५७॥

शार्दूलविक्रीडीत.

ऐसे भोगुनि थोर कष्ट मग जो विघ्नांतुनी वांचला ।
घोडेस्वार हजार घेउन धना पाराजि तो पोंचला ॥
देई द्रव्य विभूस विघ्नहि कथीं मार्गांत जें जाहलें ।
ऐकोनी मग विस्मया करितची भाऊ सभे पातले ॥ ५८ ॥
केली त्या दिनिं थोर थोर सरदारांची अहो संमिती ।
काढी ब्राह्मण[1] तो कुरापति बहू ये राग जेणें अती ॥
शिंदे होळकर स्वयें त्यजुनिया धीरास कोमेजले ।
दुर्वाक्यें परिसूनिही दवडिती हास्यावरी ते भले ॥ ५९ ॥
तत्रापी जनकोजि या कटुवचें रागावला तैं अती ।
भाऊ सन्निधिही द्विजासे[2] वदला " विप्रा अरे दुर्मती-।
कोठें आजवरी तुवां विजय तो संपादिला सांगिजे ॥ ६० ॥
आहें धैर्यविहीनही तरि उद्यां मच्छौर्य तूं देखिजे " ॥६०॥
ईर्षावाद तसा करून मुजरा डेऱ्यास ते पातले ।
भाऊंनीं जरि बाहिलें न फिरती मार्गेंहि शिंदे भले ॥
सेना सिद्ध करूनि सांगति तिला मारा मरा बा रणीं ।
शत्रू जिंकुनी लौकिकास मिळवा आतां पुरे जाचणी ॥६१॥
शिंदा होळकरा वदे मदत या घेऊनि फौजेप्रती ।
भाऊ होळकराप्रती कथिनी ना द्या साह्य शिंद्याप्रती ॥
आहे पोरवयी विचार न करी आहां तुम्ही पोक्तही ।
सांगा गोष्टिस चार, होय मग त्या बावी-कुपाच्या परी ॥ ६२ ॥
मल्हारीस पडे विचार मग हा शिंदा असे मित्र तो ।
स्वाम्याज्ञा इकडे न द्या मदत त्या कैसें करूं बोलतो ॥

---

[1] बळवंतराव मेहेंदळा [2] मेहेंदळ्यास.

सारासार विचार फार करुनी वृद्धें असें योजिलें ।
सैन्या घेउनिया तटस्थच रणीं राहूं उभें हें भलें ॥ ६३ ॥
हे शिंदे जनकोजिराव लढती ऐसें कळे भाउला ।
तेव्हां तो बलवंत यास वदला साह्यार्थ जा त्याजला ॥
शिंदा चेतविला बहूत तुम्हि हा बोलूनिया मत्सरें ।
आतां जा करुनीच साह्य बरवें सांभाळणें हें बरें ॥ ६४ ॥
म्लेंच्छांला कळतांच वृत्त सगळें तोफांस सैन्याप्रती ।
घेऊनी निघती नजीब सह तो झुंजावया संप्रती ॥
रोहीले निघती पठाण-सह तैं म्लेंच्छांस साह्या तईं ।
होती सन्मुख दोन्हिही मग दळें हो लागती झुंजुही ॥ ६५ ॥

गीति.

युद्ध सुरू झाल्यावरि, होई दोहींकडोनिया मारा ।
तेव्हां शर-तोफांचा, येणेंपरि पातला प्रहर तिसरा ॥ ६६ ॥
होळकराच्या कडला, संताजी वाघ हा करी कावे–
गनिमाचे, तों उठले, पाठीवरि रोहिले दुराणि नवे ॥ ६७ ॥
येउनि आदळती ते, शिंद्याच्या सैनिकावरी वेगें ।
तैं त्यांना भाल्यांनीं, हुसकुनिया लाविलें महाभागें ॥ ६८ ॥
येणेंपरि जनकोजी, ईर्षेला पेटुनी तया जो जो ।
भेटे वीर अरीचा, यमसदनीं पाठवी जवें तो तो ॥ ६९ ॥
शिंद्यास दूर न्याया, पकडाया वा अरी बहू झटती ।
परि तें शूर न भ्याले, म्लेंच्छाचे सर्व डाव हारविती ॥ ७० ॥
त्या दिनिं बहु केलीहो, शर्थ रणामाधिं तया मराठ्यांनीं ।
निकरें कापुनि अरिंना, वाहविले पाट शत्रुरक्तांनीं ॥ ७२ ॥
वानर राक्षस जैसें, पांडव कौरव तसें तया दिवशीं ।
लढले वीर मराठे, म्लेच्छरवी जाय मावळायाशीं ॥ ७२ ॥
करिते साह्य जरी त्या, दिवशीं बळवंतराव नेटानें ।
तरि ताम्रांचा होता, पूर्ण पराजय क्षणीं झपाट्यानें ॥ ७३ ॥
करितां न साह्य पाहाति, राहुनिया दूर ते तटस्थपणें ।
हाणामार चमूची, ग्रासीलें त्यास खास हेव्यानें ॥ ७४ ॥
शिंदे होळकरांची, सेना पावेल जंव पराभव ती ।
तेव्हां आपण शौर्यें, जय मिळवूं हें वसे तया चित्तीं ॥ ७५ ॥

ईर्षेनें जनकोजी, सोडुनि रण मागुतीं न घेइ कदा ।
तो त्याच्या सेनांनीं, गिलचा गोटांत घातलाच तदा ॥ ७६ ॥
तोफा सोडविल्या जैं, तेव्हां जनकोजि तो फिरे मार्गे ।
सूर्यास्त जाहला मग, आला सेनेसहीत तो रागें ॥ ७७ ॥
झाली यवनाकडली, मृतसंख्या ती सहस्र हो एक ।
शिंद्याकडचे मेले, युद्धीं त्या पांच सातशें लोक ॥ ७८ ॥
शिंदे होळकरांच्या, वीरांनीं जिरविली तदा अरिची ।
रग तेव्हां ते पळती, 'अल्ला' 'अल्ला' म्हणून मार्गेची ७९
मग भाऊ सामोरें, जनकोजीला मुदें बहू आले ।
इतक्यांत दुष्ट विप्रेहि, शिंदे पाहुनि तयाप्रती वदले ॥८०॥
"माझा मोडचि व्हावा, आणुनि चित्तांत कां तुह्मी द्रोहा ।
स्वामीच्या केलें हो, योग्य नव्हे द्विज-जना मुळीं पाहा" ८१
समजुत त्यांची करुनी, पोंचविलें भाउंनीं तया शिबिरीं ।
बळवंत मात्र चित्तीं, विरला ढेंकूळसा खराच परी ॥ ८२ ॥

शार्दूलविक्रीडित.

या युद्धीं जनकोजिराव जय तो लाभे बहू चांगला ।
शत्रू मार बराच खाउन मनीं भारीच काचावला ॥
लागोपाठ दुजी लढाइ असती यांनीं दिली शत्रुशीं ।
ह्यांचा मोड पुराच होउनि पुनः येते न ते आजिशीं ॥ ८३ ॥
जें होणार कधीं न ते चुकतसे, बुद्धीस त्यांच्या भ्रम ।
होवोनी समरास नाहिं उठले तों शत्रुला ये दम ॥
बुंदेले-शिर आणि पत्र अरिनें भाऊप्रती धाडिलें ।
'बुंदेले वर हो ठिकाण बघण्या तुम्हांस गेले भले' ॥ ८४ ॥
भाऊ त्यास लिही जगास सगळ्या तेथेंच जाणें असे ।
आह्मां थोर नृपाल म्लेच्छप धनी कंदाहराचे तसें ॥
आह्मां शूर म्हणून मान अपुला ठेवावया संप्रती ।
बुंदेले वर जाति यास्तव चला तुम्हीहि स्वर्गाप्रती ॥ ८५ ॥
ऐसें लीहुनि मस्तकास दिधला अग्नी तयाच्या तदा ॥
ऐकोनी बुडली अकांत पृतना वृत्तास त्या दुःखदा ॥

---

१ बळवंतरावही (आले) २ लढाईला ३ अक = दुःख (दुःखांत).

जो तो दोष तयास देउन म्हणे ' मेहेंदळ्यानें जर ।
शिंद्याला असतेंच साह्य दिधलें जातेच शत्रू तर , ॥ ८६ ॥
या-योगें मन खावयास अगदीं लागे तयाला सदा ।
जाई भाउकडे कथी सकलही वंदूनि त्यांच्या पदा ॥
' शत्रूनें अपमान फार करुनी तन्मस्तका धाडिलें ।
आम्हांला रसदी न पोंचुं दिधल्या दुष्टत्व आरंभिलें ' ॥८७॥
' आज्ञा द्या मजला प्रभो समर तें द्यायास शत्रूसवें ' ।
नानू फार करून भाउ वदले ' जा न्या चमूचे थवे ' ॥
भाऊंनीं चमुच्यामधें फिरविली दौंडी तदा सत्वरीं ।
' हे जाती बळवंतजी जरि-पटा घेऊनिया संगरीं ' ॥८८॥
' तुम्ही जाच समग्र सैन्य अपुलें घेऊनिया चत्वरीं ' ।
शिंदे होळकरादि सर्व निघती घेऊनि शस्त्रें बरीं ॥
रावांनीं लिहिलेंहि पत्र अरिला ' येतों लढाया तरी ।
व्हावें सिद्ध चमू तयार करुनी युद्धाप्रती सत्वरीं ' ॥ ८९ ॥
' तेव्हां राव समस्त मस्त यवना संत्रस्त युद्धीं करूं ।
भारी लौकिक लाभुनी धन तसें येऊंच किंवा मरूं ' ॥
ऐसा निश्चय मानसीं करुनिया मेहेंदळा तो यदा ।
याया युद्ध निघे सवें इतरही योद्धे निघाले तदा ॥ ९१ ॥
रावाची बरवी असून अरिची होती तयारी बरी ।
हल्ला एक करी तदा चमुपती म्लेच्छावरी सत्वरीं ॥
शत्रूंनीं अगिचीच वृष्टि करुनी मेहेंदळ्याला दिलें ।
मागें हाकलुनी तदा उभयतीं तोफांप्रती सोडिलें ॥ ९२ ॥

स्रग्धरा.

जेजाला आणि तोफा धडडड सुटती बंदुकाही तशाच ।
मोठाले बाण सूंसूं सणणण करुनी मस्तका तोडितीच ॥
तेव्हां रेती धुरोळा धुरहि चहुंकडे अंधकारा करीती ।
झाल्या तैं धुंद काष्ठा नयनहिनपणा सर्व तेव्हां वरीती ॥ ९३ ॥
शत्रूंचा मार यांना मुळिं न सहन तो जाहला, फार त्रस्त ।
योद्धे मेहेंदळ्याचे पळतिच शिबिरा तैं दिसेना धुरांत ॥
शिंद्याच्या माळव्याच्या पतिवरिहि सुटूं लागल्या सूंसणाणा ।
गोळ्या, हो बंद वायू पळताचि परिखा गांठिती राव-सेना ॥ ९४

१ गोविंदराव बुंदेल्याचें शिर २ समरांगणांत.

शार्दूलविक्रीडित.

अग्रेगामिहि मुख्य सैन्य सगळें येथें त्वरें धांवलें ।
शिंदे होळकरांनि स्वार अपुले शत्रूवरी फेंकिलें ॥
शत्रूची फळि फोडिली अतिजवें अर्धायुता पंक्ति ती ।
अल्ला-दर्शन घ्यावयास दिधली धाडून वेगें अती ॥ ९५ ॥
भाऊला असिता-मुखा-प्रति कसें दावूं असें वाटुनी ।
रावानें सगळी चमू फिरविली मोठ्या त्वरें धांवुनी ॥
हल्ला एक अरी-वरी बहु जवें केला तदा शत्रुचे ।
सारे लोक चपापुनी थबकले सेनेचिया पाठिचे ॥ ९६ ॥

स्रग्धरा.

युद्धीं मेहेंदळ्याला समरमहिवरी लागतां एक गोळी ।
आली स्वारी धरेला मतिहिन गिळच्या पाय देई कपाळीं ।
नाकाला कापुं लागे जलदिं करुनिया खंडुजी नाइकानें ।
शर्तीनें फार मोठ्या अवन करुनिया राखिलें शीर त्यानें ॥९७

गीति.

कुलवान माणसाचा, वेळीं उपयोग चांगला होतो ।
रावाचें शव राखुनि, नाइक उपयुक्त जाहला बहु तो ॥९८॥
इतक्यांत रात्र झाली, रण-कंदन बंदही तसें झालें ।
योद्धे दोहीं-कडले, तंबूमध्यें तदा त्वरें आलें ॥ ९९ ॥
झालें रण दारुण हें, प्रेतांचे राशि संगरीं पडलें ।
रक्त-प्रवाह वाहति, ऐसें रणवृत्त त्या दिनीं घडलें ॥ १०० ॥
अरिची सेना जास्तचि पांच हजाराहुनी मरे खास ।
भारत शव ओळखुनी, अग्नी द्यायास लागले त्यांस ॥ १०१ ॥
रावाचें शव पाहुनि, भाऊंनीं शोक फारहो केला ।
'माझा मुत्सद्दी हा, सोडुनि मातें ह्मणे कसा गेला ?' ॥ १०२
तत्पत्नी हें एकुनि शोकें व्यापुनि शवाकडे गेली ।
सति जाण्या सिद्धचि हो, 'आज्ञा द्या' भाउला असे वदली ३
भाऊ बोध करी परि, साध्वीनें आपलें खरें केलें ।
साध्वीला सुतरोदन गमनोत्साहीं न ऐकुंही आलें ॥१०४॥

---

१ अघाडीचे २ पांच हजार पायदळ ३ काळ्या तोंडाला ४ पुत्राचें रडणें ५ सती जाण्याच्या आनंदांत.

दुःखानें भाऊंनीं आज्ञा, जाण्यास साध्विला दिधली ।
केली सर्व तयारी, साध्वी तेव्हां चितेजवळ आली ॥ १०५ ॥

स्रग्धरा.

वस्त्रालंकार वाटी, मळवट अलिका* ती भरी साध्वि वेगें ।
अप्पा पुत्रास भाऊजवळ निरवुनी त्याजला[1] एक मागे ॥
'सांभाळा या मुलाला' पतिजवळ वसे अग्नि-वेश्मीं त्वरेनें ।
साध्वी ठेवून कीर्ती विमल जगतिं या स्वर्गिं गेली पती ने[2] १०६

(बळवंतनिधननामक सप्तम सर्ग समाप्त.)

अष्टम सर्ग.

(समर-समाप्ति.)

गीति.

बळवंतराव गेले, कच खाल्ला तैं बहूत सेनेनें ।
नाकेबंदी केली, अगदिं जलादिनें सभोंवतीं अरिनें ॥ १ ॥
भाऊच्या सेनेचें, झालें बंदचि जलान्न[3] त्या काळीं ।
धान्यार्थ गांव लुटिलें, परि पुरलें नाहिं तें तयास मुळीं ॥ २ ॥
चालूं उपोषणें हो, झालीं सेनेंत सर्वतो[4] जेव्हां ।
येउनि विनंति करिती, भाऊला सर्व लोकही तेव्हां ॥ ३ ॥
'युद्धीं मरूं परंतू, अन्नाविण प्रभु अम्हा नका मारूं' ।
भाऊ दरबार भरी, 'काय अतां मी उपाय योग्य करूं' ॥४॥
'शत्रू बलवान असे, सैन्यहि झडतें प्रतीदिनीं अमुचें ।
कित्येकांचे हय-वर, समरीं मृत जाहलेत हो साचें' ॥ ५ ॥
'आम्ही पेंचांत पुरे, आहों मज वाटतें अतां जावें ।
दिल्लीस आणि तेथुन, सामग्रीला बहूत मिळवावें' ॥ ६ ॥
हल्ला अरिवरि करणें, योग्य तदा फार फार होईल' ।
मल्हारि मालवाधिप, बोले 'अरि आपणांस सोडील' ? ॥७॥
'जाणेंच योग्य आहे, तर खावा दम अणीक चार दिन' ।
तेव्हां भाऊ वदले, 'तोंवर चमूला नसे मुळीं अन्न' ॥ ८ ॥

---

* कपाळास १ पेटलेल्या सरणावर २ नेला ३ अन्नपाणी ४ सर्वत्र.

' यास्तव अन्नावांचुन, जनमृति होइल पटापटा जाणा ।
कांहीं अरीस मिळुनी, वांचविनिलही कसेंतरी प्राणां ' ॥ ९ ॥
' मग तो अर्थ कशाचा, सांगा जाण्यामधें नृपा आहे ।
निघणें योग्य उद्यांची, फार मला वाटतें बरें पाहे ' ॥ १० ॥

शार्दूलविक्रीडित.

तैं इब्राहिमखान गारदि तिथें बोलावुनी आणिला ।
भाऊ बेत तयास सांगुन वदे, ' आतां चला दिल्लिला ' ॥
ऐसें भाषण ऐकतां यवन तो त्या भाउला बोलला ।
' तोफा घेउन धांवणें प्रभुसवें व्हावें कसें हो मला ' ॥११॥
तेव्हां भाउ वदे ' तुम्हांस त्यजुनी जाणार नाहीं कधीं ' ।
जेथें युद्ध करावया अरिसवें लागाल तुम्ही सुधी ' ।
' तेथें आम्हि लढूं अरीस हटवूं सांगाल तैसें करूं ।
तेव्हां खान वदे तया द्विजवरा ' तुम्ही नका घाबरूं ' ॥१२॥
' हैद्राबादपती जसा लढतसे तैसा रचूं चांगला ।
मोठा व्यूह लुटारु घालुन मधीं योद्धेहि दों बाजुला ॥
तोफा चालवुं आपुल्या अरिमुखीं, येणें प्रमाणें चला ।
रोजीं जाउं जरा जरा करिपुरा जिंकीत या शत्रुला ' ॥ १३ ॥
हा इब्राहिमखान केवळ असे विश्वासमूर्ती खरा ।
पत्रें शत्रुकडून विप्र त्यजण्या आलीं बहू त्या नरा ॥
हिंदूला त्यजुनी अम्हांस मिळतां देतों तुह्मां चांगली ।
ती जाहागिर सार्ध[1] दोन[1] प्रयुतें उत्पन्न जीचें भली ॥ १४ ॥
ऐसा त्यास निरोप दिल्लिपतिनें धाडूनि अन्या स्थला ।
देण्याच्या अभिभाषितांस[2] दिधलें येवो मिळाया भला ॥
तो इब्राहिम मान्य त्यास नच हो विश्वासमूर्ति कधीं ।
शत्रूंशीं लढुनी असंख्य यवनां युद्धांत मारी सुधी ॥ १५ ॥

गीति.

हा पाडावचि झाला, परंतु नाहीं फितूर झाला हो ।
म्हणुनी लाभे याला, तेव्हां मोठाच कीर्तिचा लाहो ॥ १६ ॥
दिल्लीस जावयाचा, निश्चय होउनि चमूस चमुपति दे ।
खर्चायाला तेव्हां, डाळ अटा घेइ ती बहूत मुदें ॥ १७ ॥

---

१ २५ लक्षांची २ अभिवचन.

डाळ अटा आरंभीं, मात्र मिळे त्या चमूस भरपूर ।
गुळ खोबेरंच बाकी, घेती त्यांना मिळे न अन्नचुर ॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

रात्रीं विसावा मग घेतला जी । दिल्लीकडे चालवितीहि वाजी ॥
मोठ्या पहाटेस उठून सर्व । व्यूहा रचोनि निघती निगर्व ॥ १९ ॥

स्रग्धरा.

ऐका तो व्यूह आतां सकल चमुपुढें घेउनी तोफखाना ।
केलें त्यांना उभे त्या चमुपतिस अहो भाउनें शूर खाना ।
डावी बाजू दमाजी शिवसुत बरव्या विठ्ठलाच्या सवें तीं ।
सांभाळूनी उभा तो नृपवर उजवी माळव्याचे धरीती ॥२०॥
भाऊ विश्वास मध्यें प्रियकर वनिता भाउची मध्यभागीं ।
अन्यांच्याही स्त्रिया तैं सकल चमुमधीं राहती त्याच जागीं ॥
जानेवारींत वेगें निघति सकलही सातव्या तारखेला ।
सत्राशें एकसष्टीं पशुपति-रव[१] तो गर्जुनी म्लेच्छेंपूरा ॥ २१ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि शत्रूहि सवें निघाला । सेनेस तैसें रचताहि झाला ॥
भाऊ वदे चालुनि दीड कोस । फोडूनि जाऊं सगळे अरीस ॥ २२॥

उपजाति.

' विनाशकाले विपरीतबुद्धिः '। म्हणून भाऊस सुचेच ही धी ॥
मोडोनि व्यूहाप्रति विप्र भाऊ। फेका म्हणे अश्व अरी-वरी हूं ॥ २३

वसंततिलका.

इब्राहिमास मिळतांच हुकूम झाला ।
खिन्नान्त तो वदतसेहि प्रसंग आला ।
आज्ञेपरी जलद सोडुनि तोफखाना ।
डावीकडे मग पडे निघणेंच खाना ॥ २४ ॥

स्रग्धरा.

सेनेच्या दोन रांगा करुन जलदिनें भाउनें टाकिल्या तों ।
अब्दलीच्या कडूनी वकिल सविनयें येउनी बोलला तो ॥
' भाऊ तुम्ही धरावा धिर दिन अजचा खास सल्ला करू या ' ।
' सल्ला आतांच व्हावा जर उचित तरी ती[२]हि तो म्लेच्छ राया '

---

१ सिंहनाद २ दिल्लीला.

नाहीं झालाच सल्ला समर सुरु करी शत्रुशीं भाउ रागें ।
तोफा तेव्हां सुटाया धड धड धडही लागती फार वेगें ॥
यांच्या त्या तीनशें हो द्विशतचि अरिच्या पांचशेंही सुटाया ।
लागोनी सर्व काष्ठा भरुनि धुर निघे झांकण्यालागिं सूर्या २६

गीति.

कोणाची कोणाला खबर नसे गर्दिच्या मुळें मग ती ।
जो तो हाणा मारा, बोलुनि घुसण्यास लागला पुढतीं ॥२७॥

उपजाति.

सुतारनाले किति जंबुरे ते । तैं सोडिले शत्रुवरीच होते ॥
केलें धुरानें सगळेहि अंध । युद्धास ऐशा करिती मदांध ॥ २८ ॥

शार्दूलविक्रीडित.

झाला धूर कमी तदा निजबलें शत्रूवरीं चालले ।
घोडेस्वार असंख्य विप्रचमुचे त्यांनीं तया जिंकिले ॥
शत्रूही हयवीर जिंकुनि तदा मार्गेंच लोटी तया ।
ऐसा तैं क्रम चालला सुरतती ये पाहण्यालागिं या ॥ २९ ॥

आर्या.

विठ्ठलशिवदेवानें, धारनृपानें[1] चमूस सोडून ।
हल्ला वेगें करुनी, शत्रु बहू काढिलेहि कापून ॥ ३० ॥
परि अरिसेनेनें ते, दोघे हल्ला करून परतविले ।
ते म्लेच्छरिपू तेव्हां, दमाजिवरतीं चढूनिया आले ॥ ३१ ॥
दमाजि अरिशीं लढला, यांचे तोफांनजीक जैं मार्गें ।
तेव्हां मुख्य अरींनीं, तोफांवरि चाल केलिही वेगें ॥ ३२ ॥
विश्वासू खानानें, शर्त करुनि सोडिली तदा[2] भारी ।
सोडुनि तोफा जलदीं, चिर्ते केली आगतां[3] चमू सारी ॥३३॥
अरिशीं लढतां लढतां, आला हुजुरानजीक तो आतां ।
इब्राहिम तरीही, तोफांचा मार चालला होता ॥ ३४ ॥
शिंदे होळकरांवरि, लखनौच्या जैं अविंधराजानें ।
हल्ला केला तेव्हां, लढले दोघे बहूत ओजानें[4] ॥ ३५ ॥
मल्हारीची सेना, भालाइत[5] आणि उज्जनीपतिची ।

---

१ यशवंतराव पवारानें २ फडशा पाडला ३ आलेली ४ निकरानें ५ भाले घेतलेले.

शिंद्याची सेना ती, असियुत[1] होती बहूत नेटाची ॥ ३६ ॥
टिप्परघाई असिची, भाल्याचा सप्प सप्प निःस्वान ।
चालू होउन तेव्हां, घुमण्या लागे लढाईचें स्थान ॥ ३७ ॥
भाऊ विश्वास[3] तदा, उतरुन करिंच्या-वरून खालीं ते ।
अश्वीं बसून चमुला, द्याया धीरास चालले होते ॥ ३८ ॥
'हाणा मारा अरिंना, जय मिळवा शत्रुला दुरी पळवा ।
वळवा लौकिक इकडे, अरिला आम्ही सुवीर हें कळवा' ॥३९
ऐसा उत्साह जना, देती दोघे बहूत मोदानें ॥
अरिला दुःखचि जैसें, जनतेला केतु दे तमोदानें[4] ॥ ४० ॥
हुजुरातीचे घोडे-स्वार सवें घेउनी त्वरें धांवे ।
आरिवर विश्वास तदा, मूर्त श्री-कार्ष्णिसा[5] जना भांवे[6] ॥ ४१ ॥
चालविला खड्गाचा, वीर-वरें हात तैं रणीं साचा ।
'वाटे बहु सिंहासी, समरकरी कुपित पोत शरभाचा'॥ ४२ ॥
संपे आयुष्य तदा, नलिकेंतुन जोडगोळि येऊन ।
लागे विश्वासाला, तैं पडला भूवरी हयावरुन ॥ ४३ ॥
सन्निधचे लोक तदा, अंबारीमधिं तयास ठेवून ।
तच्छॅव[7] ऊर्णावस्त्रें, आच्छादुन करिति युद्धही फिरुन ॥ ४४ ॥
गोपीकाबाईचा, नानांचा जो असे खरा प्राण ।
त्याला यम नेइ तदा, भाउवरि वेळ पावली कठिण ॥ ४५ ॥
जइं हें भाऊस कळे, धीर गळे भाउचा तदा सगळा ।
चित्तीं म्हणे यमानें, 'निष्करुणें कापिलाच खास गळा' ॥४६॥
रागानें पण केला, 'गिलच्यांला ठार मी करीन जर ।
तर मी पुण्यास जाइन, यम नेऊं वा त्वरें मलाहि वर'॥ ४७ ॥
घोड्याखालींच उडी, टाकी समशेर घेउनी स्वकरीं ।
शिरला अरिसेनेमधिं, शिरतो डोहीं जसा मदांध करी ॥ ४८ ॥
श्रीमंताच्या अन्ना, खाउनि परिपुष्ट काय बहु केला ।
तत्सार्थक्य कराया, तत्पृष्ठीं लोकही बहू गेला ॥ ४९ ॥
नलिका, तोफा, बाणहि, झाली तैं सर्व बंद एकदम ।
खड्गें लढतीच जवें, अरिसैन्यीं टाकिती पुढें कदम ॥ ५० ॥

---

१ तरवार घेतलेले २ आवाज ३ विश्वासराव ४ अंधार देऊन ५ शोभायुक्त अभिमन्यूप्रमाणें ६ वाटे ७ त्याचें प्रेत.

त्या-वेळीं सर्वांना, रण-मद चढुनी समस्त बेशुद्ध ।
हाणिति खड्गें यवना, ऐसें चालूच जाहलें युद्ध ॥ ५१ ॥
भाऊंनीं मर्दुमकी, गाजविली फार फार त्या काळीं ।
अरिचें धैर्य गळोनी, तो दुःखें हस्तपादही गाळी ॥ ५२ ॥
कोणाचें शिर तुटलें, पोट कुणाचें फुटून बाहेर ।
आंतडिं लोंबाति भारी, रक्तप[2] वत्सासि म्हणाति बा हेर ॥ ५३ ॥
तच्छवराशी पडल्या, रक्ताचे वाहुं लागती पाट ।
हताश योद्धे धांवति, ज्या दिसली ज्या स्थलांकडे वाट ॥५४॥
हटला नजीब मार्गे, कोशद्वय तो पळेंहि अब्दालि ।
भाऊ आतां विजयी, होतो ऐसीच वेळही आली ॥ ५५ ॥
विठ्ठलशिवदेवाच्या, सैन्यामध्यें शिपाइ गिलच्यांचे ।
नोकरिवरती होते, बनले या समयिं सर्व ते चोचे ॥ ५६ ॥
लागति लुटावयाला, विठ्ठल सेनेंत सर्व एकमतें ।
घाबरलें बहु बुणगे, गिलचा लुटतोच वाटले त्यातें ॥ ५७ ॥
इतरांचीहि तसी ती, झाली समजूत काढिती पाया ।
मार्गे हळू रणांतुन, विजय निघे तें अरीकडे जाया ॥ ५८ ॥
शिल्लक सैन्य अरीनें, धाडुन दिधलेंच पेशव्यावरतीं ।
इब्राहिमावरीही, परि दोघेही तयास परतविती ॥ ५९ ॥
नजिबानें पाहुन हें, उतरुन हत्तीवरून रोषानें ।
केला हल्ला यांवरि, सिंहावरि जेविं क्रूद्ध मेषानें ॥ ६० ॥
अहमदखान तसाची, दुंदेखानहि बहूत मदमस्त ।
करि हरिवरिपरि धांवुनि, विठ्ठलवीरास करिति संत्रस्त ॥६१
विठ्ठलशिवदेवानें, केली तेव्हां अतीच शर्त परी ।
दैवच फिरलें तेव्हां यश कुठलें तो फिरेच निजशिबिरीं ॥६२॥
यापरि अन्ताजीची, दमाजिची आणि त्या पवाराची ।
गति झाली तच्छरिरीं, गर्दि तसी जाहलीच वारांची ॥ ६३ ॥
इब्राहिमावरी मग, हल्ला अरि करि परंतु वीर-वर ।
घटकेंत लोळवी तो, अरिचे कित्येक धीर-शूर-वर ॥ ६४ ॥
परि गर्दीत तयाला, साह्य मिळेना सभोंवतीं वेढा ।
अरिचा पडला पडला, मग भाचा पुत्र-वीर वर गाढा ॥ ६५ ॥

१ रक्त पिणारे २ मुलांस ३ लुटारू.

तरि तो वीर लढेची, अन्तीं त्याला धरून यवनानें ।
नेलें पुढें मरे परि, जो न मिळे शत्रुला फितूरानें ॥ ६६ ॥

स्रग्धरा.

भाऊंचें चालु होतें करधृत असिनें युद्ध पूर्वीप्रमाणें ।
तों वार्ता त्यास लागे यवन धरुनिया शूर नेला अरीनें ॥
धारातीर्थी पवारें पडुन मिळविलें उत्तमा सद्गतीला ।
वाटे भाऊस तेव्हां गगन वरि पडे कोसळुनी क्षितीला ॥६७॥
शत्रूनें डावि बाजू खपवुन सगळी फार केला त्वरेनें ।
हल्ला भाऊवरी तैं रणमद चढुनी भाउ झुंजे असीनें ॥
गेला विश्वास[1] स्वर्गी बहुत अरिवरें धाडिले वीरही हें ।
चित्तीं आणूनि भाऊ मरण बहु बरें मानुनी झुंजताहे ॥६८॥

शार्दूलविक्रीडित.

वाटे रुद्रच हा भयंकर बहू कल्पांतिंचा वा अती ।
रोषानें हल घेऊनीच लढतो त्या रेवतीचा पती ॥
गेला खंदकही भरून सगळा प्रेतादिकांनीं यदा ।
जावें आपण कोठुनी पळुनि हें लोकां कळेना तदा ॥ ६९ ॥

स्रग्धरा.

भाऊच्या सव्यभागीं कदिम अनुग तो शूर शिंदा तुकोजी ।
मल्हारी माळव्याचा पति आति करि जो शत्रुचा नाश आजी
रोषानें झुंजतांना द्विजपतिजवळीं पावले तैं तुकोजी ।
बोले भाऊस ' आतां प्रभुवर निघणें सोडुनी दुष्ट आजी ' ७०

स्रग्धरा.

भाऊ त्याला म्हणाले असित मुख कुणा दाखवावें कथा तें ।
माझा विश्वास गेला त्यजुनि वरि तसें योग्य जाणंहि मातें ॥
इब्राहीमास पूर्वी वचनदि दिधलें ' टाकुनीया तुम्हांला ।
युद्धांतूनी न जाऊं ' श्रवण करि तुका घेइ हातीं असीला ७१

शिखरिणी.

उडी टाकी खालीं असि परजुनी युद्धहि करी
तुकोजीनें तेव्हां करचपलता दाउनि खरी ॥
निघे स्वर्गा गोळी अरिकडिल जैं लागलि तया ।
तदा शत्रू आला चढ करुनिया शूरवरिं या ॥ ७२ ॥

---

१ विश्वासराव.

आर्या.

हत्तीवरून मग तो, जरि-पटका काढिलाच जलदीनें ।
अश्वावरि घेउन तो, भाउ लढे फार फार रोषानें ॥ ७३ ॥
पाहुनि इतरांनीं हें गुंडाळुनि आपल्या निशाणांला ।
जिकडे वाट मिळाली, तिकडे ते लागले पळायाला ॥ ७४ ॥
भाऊस वाटलें कीं, वाजवुनी आपली शहाजाणें ।
जय झाला दाखवुनी, फिरवुनि चमु चालवूं पुनः हि रणें॥ ७५
परि कोणीहि न फिरला, जयसूचक तद्रवें, लढेंच खळी ।
भाऊ दुःखें तेव्हां, होता जनकोजि मात्र त्याजवळी ॥ ७६॥
मल्हारराव होते उजव्या बाजूस मूर्त जो विजय[1] ।
तोही भारी लढला परि नाहीं लाभला मुळीं विजेय[2] ॥ ७७ ॥
लढण्याच्याही पूर्वी सांगितलें भाउनें असेंचि तया ।
'आली वेळा दुःखद, तर जा तुम्ही स्त्रियांस घेउनिया' ७८
अमुचें कुटुंब आणी, नानाची माय आणि तत्पत्नी ।
सुखरूप पोंचवा वा, असि-धारेनें वधा तयांस क्षणीं' ॥ ७९ ॥
निर्वाण वेळ जाणुनि रावाला सुचविलेंच भाऊनें ।
'सुचनेपरी निघावें, स्त्रीजन घेऊनि फार जलदीनें' ॥ ८० ॥
शाहूचें स्मरण करी, तो भाऊ आणि फार ईर्षेनें ।
शिरला अरिसैन्यामधिं, तो नाहीं पाहिला पुनः स्वजनें ॥८१॥
जनकोजी शिंद्याची, भाऊपरि जाहली गती जेव्हां ।
भाऊ गेले ऐशी, ओरड सेनेंत जाहली तेव्हां ॥ ८२ ॥
शिल्लक सेना धावे, गिलच्या मागेंच लागला यांच्या ।
चर चर शिरांस कापी, ऐशा दुःखा लिहूं किती साच्या॥८३॥
भाऊच्या आज्ञेपरि, स्त्रीजन बघतां तिथें दिसेना जें ।
मल्हारी युद्धाला, पुनरपि फिरला रणास येण्या तें ॥ ८४ ॥
शूरहि पळून आले, पाहुनि मग थांबलाच वीरवर ।
दिल्लीच्या रोखानें, बहु कष्टें पावलाहि रामपुर ॥ ८५ ॥

स्रग्धरा.

जातांना तो स्वदेशीं वर वर वदला जोट[3]-सामंत त्याला ।
' आतां झाला प्रभूजी उशिरच करितां जेऊनि जा घराला ॥

१ अर्जुन २ जय ३ सुराजमल्लाचा मांडलिक.

आह्मां सुश्रांत भारी ' हयवरहि धरी जेरबंदास वेगें ।
त्याचें कापट्य चित्तीं समजुनच बुळे कापि तद्बस्त खर्डे गीं ८६

शार्दूलविक्रीडित.

तेव्हां टाच हयास मारुन जवें स्वारी बहू शूर ती ।
गेली पार निघून यापरि तदा विघ्नें बहू घेरिती ॥
मार्गीं पार्वतिबाइ आणि दुसरी तन्मंडळी भेटली ।
त्यांना कोणि लुटून घे म्हणुनिया अंगीं न वस्त्रें भली ॥८७॥
वार्ता जाट नृपास लागलि यदा त्यानें कृपाळूपणें ।
वस्त्रें तें मथुरेहुनी अणवुनी त्यांना दिलीं सज्जनें ॥
खर्चायासहि रोख लाख रुपये जाटें तदा धाडिलें ।
दुःखीं वा सुखिं वागतीच सम जे सन्मित्र हो चांगले ॥८८॥
मल्हारी सुखरूप येउन तदा ग्वाल्हेरिला पोंचती ।
मागें पानिपतीं अवैध नृपती रोषें जना कापिती॥
कांहीं धांवाति मार्ग ज्यास दिसला त्यानें बहू घाबरें ।
जाटाच्या मुलखांत येउनि जवें त्या भेटती सत्वरें ॥ ८९ ॥
योद्धा शूर तसाच निर्मलमना जैसा दयाळू असे ।
तैसा जाट उदार फारहि असे दौंडी असी देतसे ॥
' राज्यीं जे अपुल्या लढाइमधुनी कोणी इथें पातले ।
त्यांना साह्य करा, ' शिवाय दुसरें सत्राप्रती घातलें ॥ ९० ॥
संग्रामांतिल कोणि या नृपतिला आलाच भेटावया ।
सन्मानोनि नृपाळ योग्य वसनें खर्चीहि देइ तया ॥
जेव्हां रावजि पारनेर-कर हा राजास या भेटला ।
तेव्हां त्यास नृपाळ हें वदतसे ' सांगा सुसेवा मला ' ॥ ९१॥
राजाराम म्हणून मातुल-जनीं युद्धामधें वारले ।
यासाठीं रण चार कोस सगळें गंगेंत टाका भले ॥
त्याचा खर्च तुम्हांस सर्व चुकवूं केली नृपें ती कृपा ।
तें चाळीस सहस्त्र खर्च दिधला त्या रावजीनें नृपा ॥ ९२ ॥

स्रग्धरा.

जाटाचें ऐन वेळीं बहुत बहुत तें साह्य यांनाच झालें ।
त्यायोगें वाचले हे सकल पळुनि जे युद्ध सोडुनि आले ॥

---

१ गोविंदराव बुळे (हे होळकराचे पदरीं मोठे सरदार होते)
२ वाटखर्ची ३ (४०) हजार रुपये.

तेव्हां मल्हारचा तो हितनगरिमधें[1] राहतां मास झाला ।
नानाला पार्वतीच्या सह सुखरुप तो पोंचवी दक्षिणेला ॥९३॥

मंदाक्रान्ता

मल्हारीनें मग जमविले लोक सेनेंत तेथें ।
येती तेव्हां बहुत नृपती ठेविती पादिं माथे ॥
ते राज्याच्या मधिल सगळे पातले कामगार ।
राजा भेटे सुखरुप तदा जाहले सर्व गार ॥ ९४ ॥

आर्या.

कांहीं सामंत तसे, हस्तक गुर्मी करावयास अती ।
लागुनि दुर्गा बांधिति, याचा ताबा दुरीच घालविती ॥९५॥

स्रग्धरा.

या वेळीं त्या नृपानें जयनगरकरें धाडिली फौज भारी ।
रेवातीरास घ्यावें म्हणुन चमुपती स्थापि सत्ताहि सारी ॥
मल्हारीनें श्रवूनी चमुपतिस तया गांठिलें आणि त्याचा ।
घेऊनी बुंदिपाला[2] मदत जलदिनें नाश केलाहि साचा ॥९६॥
सेना मल्हारबाची प्रथम कचरली फार किंतु[3] तयानें
नेटानें एक हल्ला करून जिरविली खोडकी जैं जवानें ॥
तेव्हां मल्हारवाला अरि शरणाचि ये वीर मल्हारबानें ।
घेवोनि पंचलक्षाधिक प्रयुतद्रव्या सोडिलें हो मुदानें ॥ ९७॥
कोटा-बुंदी-नृपांनीं समजुत करुनी धाडिलें तत्स्थळांला ।
आला मल्हारबाही विजय मिळवुनी आपुल्या इंदुराला ॥
ज्यांचा ज्यांचा अजूनी वसुल नच मिळे घेइ तो त्याकडून ।
जे किल्लेदार होते उरमटच तया काढि कामावरून ॥९८॥

शार्दूलविक्रीडित.

मल्हारी वधि तो कितीक नृपती सामंत, किल्ले भले ।
पाडोनी जमिनीबराबर करी तेव्हां तया वाटलें ॥
मल्हारी-भय आणि वतन पुनः नामी करायाप्रती ।
लागोनी नमिती नृपाल सगळे मल्हार-राजा अती ॥ ९९ ॥
शूरांना मग बक्षिसें बहु दिलीं वर्षंतु झाल्यावरी ।
येण्याला चमुला कथून दिधली जायास आज्ञा घरीं ॥

---

१ मित्राचें शहर जे ग्वाल्हेर त्यांत २ बुंदीच्या राजाला ३ परंतु.

घेऊनी चमु उर्वरीत सगळी संगें तुकोजी तदा ।
मेवाडास निघेच लोक करिती बंडाळिलागीं यदा ॥ १०० ॥

आर्या.

जो कोतवाल होता, मंदेसरिं नगर राखण्यालागीं ।
त्याला ठार करूनी, जन लुटण्या लागलेंच त्या जागीं ॥१०२
मल्हारराव यांना, हा कळला खानदेशिं वृत्तांत ।
धांवत आले तिसऱ्या, दिवशीं मंदेसरीं अविश्रांत ॥ १०३ ॥
नंतर मल्हारीनें, मेवाती कापण्यास आरंभ ।
केला मांसाशनिना, तन्मांसें लग्नसा समारंभ ॥ १०४ ॥
मेवाती मग आले, शरण तयांना क्षमा नृपें केली ।
घे द्रव्य अर्ध लक्षचि, स्वारी मग इंदुराकडे वळली ॥ १०५ ॥
पानिपताच्या युद्धांतुन आले जें फिरून देशांत ।
होता विठ्ठल त्यांतचि, नानाला भेटला स्वदेशांत ॥ १०६ ॥
पडतां गांठ तयांची, दोघांचे नेत्र तैं भरुन आले ।
नाना शोक करुनिया, विवेकयोगेंच शांत ते झाले ॥ २०७ ॥
श्रीमंताच्या सह तो, लागे तैं मग पुण्यास यायाला ।
युद्धाच्या गोष्टि तदा, नाना पुसतां तयाप्रती झाला ॥ १०८ ॥

आर्या.

मल्हारी-बद्दल जें, जन वदती यांत काय तथ्य असे ।
नाना पुसे तयाला, विठ्ठल वदला तयाप्रतीच असे ।

स्रग्धरा.

“ कोणी कांहींहि सांगो प्रभुवरचरणां खास मल्हारबाची !
कोण्याही हो प्रकारें कसुर नसुन तो झुंजला गोष्ट साची ॥
शत्रूला तो नसूनी फितुर नृपपदीं सत्य ठेवून भाव ।
मल्हारी झुंजला जीपरि यश न मिळे त्यास नाहीं उपाव ” १०९
भाऊसाहेब भारी पदिं पदिं करुनी मानभंगास त्याची ।
साचीही कल्पना ती श्रवण नच करी खिन्नता तन्मनाची ॥
भारी झाली परंतू समारें बहु लढे शूर शुद्धांतरानें ।
इच्छा त्या ईश्वराची जय नच” कथिलें सत्य त्यां विठ्ठलानें ११०
नानासाहेब आले स्वनगरिस तदा चैन त्यांना पडेना ।
मानी बंधू निमाला मदनसम असा पुत्र गेला गमेना ॥

---

१ नानाला २ विठ्ठलशिवानें ३ स्वाभिमानी ४ सदाशिवराव.

येवोनी पर्वतीला प्रभुवर मग तो राहिला त्याच ठायां।
शोकें भ्रांतिष्ट झाला यमसदनिं पुढें सिद्ध झालाहि जाया ११२

मालिनी.

रघुपति मग पुत्रा घेउनीया तयाच्या।
नृपति-वर-पदीं तो घालि त्या शाहुजीच्या ॥
मग नरपति तो दे माधवा पेशवाई।
वसनसहित तेव्हां राज्य दादाच पाही ॥ ११२ ॥

शार्दूलविक्रीडित.

होता माधव मूल यास्तव बघे दादा स्वराज्याप्रती।
तें मातेस असह्य वाटत असे राजाचिया संप्रती।
माझा पुत्र नृपाल यास्तव मला दादा विचारोत हे।
मी या स्त्रीस विचारणें न बरवें वाटे प्रवीरास हें ॥ २१३ ॥

स्रग्धरा.

' मी मोठा शूर आणी विजय मिळवुनी राज्यही वाढवी हें।
भाऊ माझा नृपाचा म्हणुन अधिकृती पूर्ण मातेंच आहे ॥
गोपीका राजमाता परि सति अबला यामुळें या सतीनें।
चित्ता देऊं नये हो परि नृपति वळे आइच्या सन्मतीनें ११४

आर्या.

हा द्वेष वाढला बहु, दादा गेले चमूस जमवाया।
जमवुनि सेना आले, माधवपुतण्याशिं युद्धही याया ॥११५॥
दोघांच्या सैन्यांची, चकमक झाली नृपाळ चित झाला।
दादास हात जोडुनि, चातुर्यें समय मारुनी गेला ॥ ११६ ॥

आर्या.

' काका गृहकलहानें, उन्नत स्थिति लाभली कुणास कधीं।
पांडव यादव गेले, ' म्हणुनि नमी तत्पदांप्रतीहि सुधी ॥११७
' राज्याचा भर वाहा, मनमानेसेंच चालवा गाजी।
परि युद्ध करुनि आतां, न मरो करि आणि एकही वाजी ' ११८
दादास गोड वाटे, त्यानें स्वाधीन ठेविलें त्याला।
बंदोबस्त तयाचा, परि नामी ठेविताहि तो झाला ॥ ११९ ॥
हें चालू असतांना, मेवाडांतील बंड मोडूनी।
मल्हारी जेजुरिला, येउनि वाही शिरास विभुचरणीं ॥ १२० ॥

आला पुण्या नृपाला, भेटे दुहि माजली असे जेथें।
दुःखाग्नी वैराग्नी, सांत्वन करण्यास राहिला तेथें ॥ १२१ ॥

(समरसमाप्तिनामक आठवा सर्ग समाप्त.)

सर्ग नववा.

—:०:—

(कैलासगमन.)

स्रग्धरा.

दादा आतां स्वतांच्या मतिस धरुनिया वागती सार्वकाळ ।
मुत्सद्दी दूर केले कितिक नविनही नेमि तो शत्रु-काळ[1] ॥
अब्रू रक्षावयाला मिरजकर[2] तदा ते निजामाकडेस ।
गेले हें ह्या रघूला सहन मुळिं न हो हा लुटी तत्पुरास[3] ॥ १ ॥
तेव्हां कित्येक योद्धे रघुस त्यजुनिया त्या निजामास वेगें ।
गेले सेवावयाला यवननृप तया मान देऊन वागे ॥
ठेवीही स्वाश्रयाला रघुपति विषयीं लोक नाखुष साचे ।
म्लेच्छाला वाटलें तैं बुडवुन सगळें राज्य टाकूं द्विजाचें '॥२॥

शार्दूलविक्रीडित.

जेव्हां तो चुलता तया नवनृपा-संगें लढूं लागला ।
घेई साह्य निजाम दुर्गहि तुम्हां देईन तैं बोलला ॥
त्यांपैकीं दिधलाच एक दुसरें देणें असें राहिलें ।
शत्रू हें वरि दाखवूनच रणा-प्रीत्यर्थ तैं पातलें ॥ २ ॥
संगे घे सरदार सर्व इथले, जानोजिचें सैन्यही ।
होता मुख्य दिवाण विठ्ठल सर्वे जिंकीत आला मही ॥
दादाला कळलेंच वृत्तहि करी हेटाळणी तो अती ।
त्याची ती कितिशी बिशाद म्हणुनी तोऱ्यांत हा दुर्मती ॥४॥

---

१ शत्रुचा काळ (राघोबा) २ गोपाळराव पटवर्धन ३ मिरजेला ४ राज्यांत ५ निजाम ६ नागपूरकर भोसला ७ विठ्ठल सुंदर ८ अपेक्षा ९ निजामाची १० दुष्ट बुद्धि राघोबा.

आलें सैन्य खरेंच सन्निध असें जेव्हां तयोला[1] कळे ।
मल्हारीस, दमाजिला, नवनृपा[2] घेऊन सैन्यीं वळे ॥
शत्रूच्या चमुला तदा रघुपती दावूनिया हूल[3] ती ।
जानोजी मुलुखास शत्रुमुलुखा तेव्हां लुटूं लागती ॥ ५ ॥

स्रग्धरा.

औरंगाबाद आणी यवननगर तें हैदराबाद यांना ।
द्रव्यासाठीं लुटावें म्हणुन रघुवरें[4] यत्न केलेंहि नाना ॥
सारे ते व्यर्थ गेले धन बहुत मिळे त्यास मल्कापुरांत[5] ।
राघोबा गाठण्याच्या भरिं भरुन तदा म्लेच्छें होईच *दान्त ६
तेव्हां तो म्लेच्छराजा द्विजनगर तदा जाळण्याच्या मताला ।
ईर्षेनें हो करूनी त्वरित परतुनी पुण्यगांवास आला ॥
केलाही नाश त्याचा धन मिळवुनीया जावया सिध्द झाला ।
मोठ्या मोदें निघाला रघुपतिहि निघे ऐकुनी पत्तनाला ॥ ७ ॥
मार्गीं माधव कंठ दाटुन तदा बोलेच दादाप्रती ।
'शत्रू पानिपतीं पराभव करी कीर्ती हरी तो अती ॥
नानांच्या हृदयास हाच बसुनी धक्का निमाले, नका ।
भाडूं हो अपसांत स्वर्गि बघुनी नाना सुखावेल कां ?' ॥ ८ ॥
म्लेच्छांचा उगवूंच सूड सगळे राज्याप्रती चांगली ।
काका आणु चहूतशी बळकटी बुद्धी धरावी भली ॥
दादाला मग वाटले कलह हा कीर्तीप्रती लावितो ।
काळोखी करितां धरी मति बरी त्या माधवाशींहि तो ॥ ९ ॥
गेलेले सरदार सर्व अपुले त्या माधवानें तदा ।
बोलावून तयांस कामगिरिही सांगे दिली संपदा ॥
पावोनी मुद वागती सकल ते पूर्वीप्रमाणें सुधी ।
जानोजीसहि घालवी धनचळें त्याच्याच राज्यामधीं ।
शत्रूच्यावरि एक ते झडकरी रात्रिचरांच्यापुरीं[11] ॥
हल्ला हे करिती म्हणून चमुशीं झुंजूहि लागे अरी ॥

---

१ राघोबाला २ माधवरावाला ३ हुलकावणी ४ राघोबानें ५ हें भोसल्याचें शहर (हल्लीं बुलढाणा जिल्ह्यांत आहे) ६ निजाम ७ पुणें ८ हैद्राबादेस ९ पुण्याचा नाश ऐकून १० पुण्याला ११ राक्षस भूवनांत * दमला.

सैन्याचे करि दोन भाग अपुल्या दे विठ्ठलाच्या करीं ।
एकाला मग एक घे निजकरीं हल्ला करी सत्वरीं ॥ ११ ॥
पंधाशें[1] हयवीर ठेवुन दिले त्या माधवा रक्षणा ।
मल्हारीसह रावे[2]ही निघतसे शत्रूस द्याया रणा ॥
झाला शत्रुहि तो तयार रघुशीं युद्धास द्याया तदा ।
होऊनी रण तो रघूस धरुनी नाशी तयाच्या मदा ॥ १२ ॥

शिखरिणी.

निशाणाचा हत्ती अरि वळविती तैं चमुमधीं ।
परी लाथाडी तो जन च[3]मुंत ये तो क[4]रि सुं[5]धी ॥
निशांणाला तोंडीं धरुनिच पळे तो नृपति[6]च्या ।
तदा आला तंबूजवाळें जलदीं पुण्यपुरि[6]च्या ॥ १३ ॥

शार्दूलविक्रीडित.

हा हत्ती बघतांच माधव मनीं वाटे पराभूतिला ।
झाले खासच आमुच्या मग वदे स्वाराप्रती तो भला ॥
' हो मातें अजुनी असेंच तुह्मि कां कैदेमधें ठेवितां '
तेव्हां ते वदले ' धनीच असुनी कैदी कसें बोलतां ' ॥ १४ ॥
तेव्हां राव पुनः तयास वदला ' माझ्या जिवाचे तुम्ही ।
आहां सोबति खास कां ' वदति ते ' आहों प्रभुजी अम्ही ' ॥
तेव्हां तो नर-वीर-धीर-नृपती त्यांना ह्मणाला अरे ।
' घोडयाच्या अनिनां[7] चला उचलुनी अश्वीं बसा सत्वरें ' १५
पंधाशें हयवीर तैं अरिवरी नागांवरी सिंहसे ।
धावूं लागति तो तयास दिसला मल्हारि जो येतसे ।
युद्धीं पाउनिया पराभव वदे या सान रावाप्रती ॥
माघारेंच चला पुण्यास करुं या तें राज्य हो संप्रती ॥ १६ ॥
त्वेषानें बहु जो अरीवरि निघे त्या माधवाला कसें ?
वाटावे हितबोल हे वदतसे ' मी ऐकतों कीं असेः– ॥
भाऊंना तुम्हि युद्ध-भूमिवरतीं म्लेच्छासवें झुंजतां ।
मागें पानिपतीं खरें बुडाविलें ' हें खास वाटे अतां ॥ १७ ॥

---

१ घोडेस्वार २ राघोबा ३ माधवरक्षणार्थ ठेवलेल्या सेनेंत ४ हत्ती ५ हुषार ६ पुण्याच्या राज्याच्या (माधवरावाच्या) ७ लगाम.

राजाचे वच हे सुतीक्ष्ण असिसे मल्हारजीला अती ।
जिव्हारीं बसले मनीं वदतसे ' धूऊं कलंकाप्रती ' ॥
बोले जीर्न नृपास तो मग चला ' युद्धांत पाहा असी ' ।
ऐसें बोलुनि कास घट्ट कसुनी मार्गे फिरे तामसी ॥ १८ ॥
होता माधवरावजी तरुण तो तो जीन मल्हार बा ।
दोघेही सम भासले चपलतां-योगें समस्तांस वा ॥
राजा माधवराव सयश बहू युद्धांत इच्छीतसे ।
अन्याला यश दुष्कलंक सगळा काढावयाचा असे ॥ १९ ॥

आर्या.

वृद्ध तरुण ते दोघे, वेगें शत्रूमधेंच तैं घुसले ।
जो शत्रु नित्य त्यांच्या, नेत्रीं कंटकपरींच फार सले ॥ २० ॥
ताजा दम यांचा हा, म्लेच्छाचें सैन्य फार थकलें तें ।
होतें आणि तसेंची, जय-योगें सावधानही नव्हतें ॥ २१ ॥
अर्जुन वृषकेताच्या,* हल्ल्यापरि हा बहूत नेटाचा ।
हल्ला पाहुन वचके, अरि मग घाशील कां न तो टांचा ॥ २२ ॥
त्यांचें धैर्य गळालें, शूर पळाले रणास टाकून ।
हे दोघे झुंजत तैं, गांठिति मुख्याप्रती त्वरें करुन ॥ २३ ॥
कापा अंबारीच्या, दोऱ्या त्या माधवें जना कथिलें ।
आधोरणास तेव्हां, हत्तीला बसविण्यास सांगितलें ॥ २४ ॥
तेव्हां नबाब कांपे, थर थर त्या वाटलेंच माधव हा ।
मस्तक तोडुनि करितो, भू-लिंगार्पणच काय दुर्मद-हा ॥ २५ ॥
शिरला खवास-खान्या-मध्यें अरि परि तया न धीर निघे ।
तेव्हां खुणवी याला, शरणागत मी मला स्वपदीं घे ॥ २६ ॥
माधव-सेनेंत तदा, जय-सूचक वाजतीच रणवाद्यें ।
पाहुनि पराक्रमा या, डोलविलें मस्तकास देवाद्यें ॥ २७ ॥
माधव चाल करूनी, दादांच्या मग करीकडे गेला ।
अरि-सेनेस दटाउवि, हत्ती त्यांचाहि सोडुनी अणिला ॥२८॥
विठ्ठल-सुंदर गोळी, लागुन पडतां चमूंत यवनांच्या ।
झाला गोंधळ भारी, लागति पळण्यास सर्व चमु साच्या ॥२९

---

१ वृद्ध मल्हारराव २ महाताला ३ अभिमान्यांचा नाश करणारा ४ शंकरानें * कर्णाचा मुलगा.

विजयश्रीनें माधव, वरिला नूतन नृपाल बहु मोदें ।
उपभुक्त आणि जीना-हुन नर नूतन स्त्रियेस मोदाचि दे ॥३०
शरणागत यवनाला, तह करुनी सोडिलें तदा नृ-वरें ।
जय लाभे श्री लाभे, दादावरि धाक बैसलाहि त्वरें ॥ ३१ ॥
माधव जय मिळवुनिया, आला नगरास फार आनंदें ।
तच्चुंबन घे माता, कृष्णाचें जेविं घेतलें नंदें ॥ ३२ ॥
माधव जय मिळवुनि ये, आत्मपुरीला, मुदें तदा माता ।
चुंबी तदाननाला; षडानना जेविं ती जगन्माता ॥ ३३ ॥
मल्हारि माळव्याला, प्रभ्वाज्ञेनेंच सत्वरें गेला ।
आनंदित तैं झाली, प्रजा सकल पाहुनी तदा त्याला ॥ ३४ ॥

शार्दूलविक्रीडित.

जेव्हां पानिपतीं विनाश अगदीं झाला तदा हैदर ।
कर्णाटास लुटी जनांस सगळ्या भारीच देई दर ॥
वेगें हैदरअलिच्यावर तदा स्वारी करायास्तव ।
राजा वेन करून शिष्टिहि+ करि मल्हारजीला नव ॥ ३५ ॥

स्रग्धरा.

आज्ञा त्या माधवाची बघुन जरठ तो घेउनी सैन्य आला ।
मोठ्या तो तातडीनें स्वनृपनगरिला वंदितां त्यास झाला ॥
मोठे आणीक छोटे सकल मिळति तैं ते पुण्यामाजिं वीर ।
त्यांच्या संघात-योगें गजरजुन तदा जाई तें सर्व पूर ॥ ३५ ॥
तैं मैदानांत घोडे फिरवित असतां विठ्ठलाचेच स्वार ।
पाहाती कौतुकाला जमति बहुतही शूर ते धीर-वीर ॥
त्यांमध्यें माधवाचे हय-चमु-पतिही[1] कांहीं होते तयांचा ।
स्वारांच्या विठ्ठलाच्या कलह बहुत हो[2] बोलतांनाच साचा ॥ ३६
ही वार्ता माधवाला झडकरि कळली त्यास वाटेच झाला ।
मानाचा भंग माझ्या हुकुम फिरविला गोटही लूटण्याला ॥
विंचूरच्या पतीनें सकल जमविले आपुले शूर त्यानें ।
आणी बुद्धि-प्रभावें जबर रण करूं योजिलें स्वाभिमानें ॥ ३७

शार्दूलविक्रीडित.

होता शूर तसाच मान-धन हें ज्या विठ्ठलाचें असे ।
सोसूनी अपमान कैद कसचा ? सोडील धैर्या कसें ॥

---

१ घोडेस्वारांचे नायक २ झाला + आज्ञा.

त्यानें पांच हजार स्वार चमुच्या भोंतीं दिले ठेवुनी ।
खड्गें सज्ज करून ते फिरतिही जे दक्ष होते रणीं ॥ ३८ ॥

स्त्रग्धरा.

मल्हारी विठ्ठलाचा सुहितें, समजलें वृत्त त्याला तयानें ।
जाऊनी माधवांला विनति सुविनयें केलि मल्हारजीनें ॥
'ही वेळा हैदराची खुम खुम अगदीं मोडण्याची असे जी ।
कैसाहो मांडला हा कलह चमुमधीं काय बोलू प्रभूजी '॥३९॥

शार्दूलविक्रीडित.

'आहे विठ्ठलस्वामिनिष्ठ बरवा या क्षुल्लका कारणीं ।
देऊनी मन त्यास दुःख विभुनें देऊं नये धोरणीं ॥
आहे शूर स्वयें चमूंत असती झुंजार योद्धे अती ।
यासाठीं न मिळेल विठ्ठल तुम्हां जीवंत हो सन्मती' ॥४०॥
'त्याचे पांच हजार स्वार सगळे मारावया संगरीं ।
स्वामीला अयुताहुनी अधिकही योद्धे यमाच्या घरीं ॥
धाडावें बहुधाच लागतिल हें चित्तांत ध्यावें धनी ।
कांहो व्यर्थ अनेक शूर अपुले खर्चीत आहां रणीं ' ॥४१॥
'आला त्रास तुम्हास खास तर त्या धाडून या हैदरीं ।
तो जिंकील अरी तरी झडकरीं किंवा यमाच्या घरीं ।
तो जाईल असें मला गमतसे एकाच नेमें पहा ।
कामें दोन कशीं प्रभू घडति हीं ' बोलेच मल्हारि हा ॥ ४२ ॥
'काका जें वदतां असें ऋत परी आतां घडावें कसें ? ।
आहे विठ्ठल सिद्ध युद्ध करण्या बुद्धी न ऐकेलसें ॥
वाटे हो मजला ' असें नृप वघे बोलेच मल्हारजी ।
'मी त्याची समजूत खास करितों चित्तीं नको काळजी' ३२
होता स्नेह बहूत या उभयतीं मल्हारजीच्या वचें ।
आला विठ्ठल माधवाजवळ तो सान्त्वी तया सद्वचें ॥
स्वामीठायिं असूनि भक्ति विभुजी केला तुम्हीं कोप हा ।
बोले माधवपाद वन्दि नैति ही आहेच संतापै हा ॥ ४४ ॥
झालीं स्वच्छ मनें दिलींच सुमनें पानें दिलीं सन्मनें ।
मानानें मग पोंचवी द्विजवरा गोटांत सद्धेतुनें ॥

---

१ चांगला स्नेही २ हें विभूचें वि० ३ नमस्कार ४ राग घालविणारी.

तेव्हां प.च हजार स्वार कमरा सोडूनिया स्वस्थळा ।
आज्ञा घेउन जाति सर्व शिबिरा नासूनि या गोंधळा ॥ ४५॥

आर्या.

श्रीमंताची स्वारी, कर्नाटकभागिं हैदरावरतीं ।
हल्ला करावयास्तव, संगें वीरास घेउनी निघती ॥ ४६ ॥
मल्हारि वीरविठ्ठल, पटवर्धनही चमूसवें होता ।
क्षत्रियवीर बने जो, आरंभींचा असे महा-होता ॥ ४७ ॥
होते बापूहि सवें, दादाचे मित्र हे खरे असती ।
जे बुद्धिविपुलतेनें, सकलांला सुरगुरूपरी दिसती ॥ ४८ ॥
हैदर अनावतीच्या,-संनिध विपिनांतं राहिला होता ।
विंशति हजार शिक्षित, दल घोडेस्वारही बरा होता ॥ ४९ ॥
चाळिस हजार पृतना, पदग अशी हैदराकडे असुन ।
तोफा बहूत होत्या, म्हणुन नसे तो कुणास मोजून+ ॥ ५० ॥
माधव-पृतना त्याच्या, सन्निध येवूनि पोंचली जेव्हां ।
हारीं अणावयास्तव, हैदर बहु यत्नही करी तेव्हां ॥ ५१ ॥
द्विजचमु सावध होती, झाले निष्फल समस्त यत्न यदा ।
राही युद्धास उभा, हैदर रण जाहलें सुरूच तदा ॥ ५२ ॥
तोफांची रंजकं ती, उडवुन दिधलीच शूर यवनानें ।
ती- सरसें बहु पडले, योद्धे त्या वरिति अप्सरा मानें ॥ ५३ ॥
घोडेस्वारांकरवीं, होळकरें आणि विठ्ठलानेंही ।
मोठी शर्त करूनी, अरिच्या तोफाच बंद केल्याही ॥ ५४ ॥
तरवार सुरू झाली, खण खण आवाज जाहला चालू ।
अरिचे जन मरति तया, खायाला धांवल्या बहू भालूं ॥५५॥
हैदरअली मी मी, म्हणणारा परि रणीं अला जेर ।
बोले ' तहा करा जी, अजवरि असले न पाहिले वीर ' ॥५६
नाशिकभागामध्यें, दादाचा तळ असे तया वेळीं ।
माधव कळवी त्यांना, मोदें तेव्हां नमून पदकमळीं ॥ ५७ ॥
' यावें तह करण्याला, ' ऐसें लीहूनि राहिला तेथें ।
आज्ञेपरी करी तह, माधव ये मग मुदें स्वगेहातें ॥ ५८ ॥

---

१ परशुरामभाऊ २ होमहवन करणारा ३ अरण्यांत ४ सरबत्ती. ५ कोल्ही + भिऊन.

शार्दूलविक्रीडित.

झालें युद्ध नजीबखान कपटी तो जाट[1] यांच्यांत जैं ।
म्लेच्छें जाट वधून सैन्य सगळें संत्रस्त केलेंहि तें ॥
पौत्रानें मानिं आणुनी सुड तदा घ्यायास म्लेच्छाप्रती ।
मारावें ठरवून माळवपती[2] साह्यास घे सन्मती ॥ ५९ ॥
जाटानें बहु साह्य पानिपतिंच्या युद्धीं दिलें चांगलें ।
चित्तीं आणुनि माधवास पुसुनी मल्हारजी चालले ॥
याया युद्ध नजीबखांसि चमुलो पेंढारि[3] घेई त्वरें ।
जाटाची चमु आणि आत्मपृतना एकत्र केली नरें ॥ ६० ॥

(विशेषक)

जाटाची पृतना अरींस फितली याच्यामुळें शत्रु[4]-हा ।
मल्हारी यश लाभला न करवी त्यांच्यांमधीं तें तहा ॥
यावेळीं रण आंग्ल आणि शरयू-तीरस्थ म्लेंच्छांमधीं ।
माजे साह्य नबाब[5] याचि+ तिथला मल्हारबाला सुधी ॥ ६१ ॥
ज्यानें पानिपतीं समस्त चमुला कापावया लाविलें ।
मल्हारी नृपतीस त्रस्त करिही पायीं शिरा ठेविलें ॥
बोले ' मी मुल आपुलें करुनिया माफी मला संप्रती ।
यावें साह्य विभो धनास गमनीं[6] देईन लक्षाप्रती ॥ ६२ ॥
मुक्कामास दशायुतार्ध[7] धन मी देईन हो आपणा ।
आंग्ला जिंकुनि मोकळे मज करा आता करुनी रणा ॥
म्लेच्छांच्या विनतीस मान्य करुनी आले अनूपाप्रती ।
लांभाते[8] सचिवाकडे सचिवता होती नृपाचीच ती ॥ ६३ ॥
युद्धाचें सगळेंच काम नृप दे गंगाधराच्याकडे ।
लांभाते धन देइना चमुप्रति याचें पडे सांकडें ॥
तो गंगाधर ही हकीकत तदा मल्हारबाच्या पदा ।
युक्तीनें कळवूनि भाक मिळवी ' देऊं तुम्हा संपदा ' ॥ ६४ ॥
केलें युद्ध अपार तें पलटणीं तो सात धाडी घरीं ।
भूतांच्या पतिच्या[9] अतीच जिरवी कंडू तया संगरीं ॥

---

१ सुराजमल २ मल्हारराव ३ पेंढारी लोकांचें सैन्य ४ शत्रुचा नाश करणारा ५ सुजाउद्दौवला ६ कुचाच्या वेळीं १ लक्ष रुपये देऊं ७ (५०) हजार ८ विसोबा लांभाते (होळकराचा दिवाण) ९ यमाच्या घरीं + मागे.

चौदार्शे मुखताम्र कैदि करुनी त्यांच्या शिरीं बंदुका ।
दे गंगाधर आणि आणि शिबिरा लाभेच सल्लौकिका ॥ ६५ ॥
आंग्लांनीं कपटेंच युद्ध करणें शत्रूमधें भांडणें ॥
लावोनी परि आज खाज जिरली साक्षात्करोनी रणें ॥
लांभाते चमुलागिं द्रव्य मिळण्या गंगाधरें प्रार्थिला ।
' अद्यापी परि चार त्या पलटणी आहेत ' तो बोलला ॥ ६६ ॥
तेव्हां खिन्न चमू समस्त पडली रात्रीस बेसावध ।
आंग्लीं उत्तर रात्रि येउन तिचा खड्गेंच केला वध ॥
कांहीं सैन्य पळे परंतु सगळे ते आंग्लही धावले ।
मार्गे, धांवत काल्पिलाच सगळे हिंद्वांग्लही[1] पावले ॥ ६७ ॥
कालिंदीस उतार खास नव्हता मल्हारि पूजा करी ।
भक्तीनें नदिची, स्मरे कुलगुरू लोटी स्वतांचा करी ।
होता भक्त खराच मालवपती मल्हारिला तज्जल ।
लागे फक्तच कंबरेस सगळें तैं पैल गेलें दल ॥ ६८ ॥
आंग्लांच्या चमुचा पती नदिमधें तो चाललाही सडा ।
तेव्हां तत्पृतना बहूत बुडली मागें फिरे बापडा ॥
या मार्गेच अरी नदी उतरला ऐसें तयाला कळे ।
बोले ' मालवराज धन्य असती मल्हारजी चौगुले ' ॥ ६९ ॥
' देवांश असे ' वदून चमुपें टोपी तदा आपुली ।
काढूनी मग राम राम करुनी नेलीच सेना भली ॥
मल्हारीसम ईश्वरावर असे श्रद्धा जयाची खरी ।
त्याला देव मुळींच लांब नसुनी राहे सदा तत्करीं ॥ ७० ॥

भुजंगप्रयात.

सुजा आणि जाटास साह्यास याया ।
असे गुंतला जाणुनी शूर राया ॥
दतीया अणी शेवड्याचे नृपाल ।
तदा साह्य घेतीच गोहोदपाल ॥ ७१ ॥
तदा सर्व राजे करीती विचार ।
चला घेउं ग्वाल्हेर झाशी सुपूर ॥

---

१ हिंदु आणि इंग्रज.

सहायास घेऊन आनूपगीर ।
करीपूर[1] येथील हा खासदार ॥ ७२ ॥
तयांनीं[2] लढाई करूनीच झाशी ।
तदा घेतली सर्व ताब्यांत खाशी ॥
असें वृत्त लागेच मल्हारजीला ।
तयानें दिला भव्य वेढा तियेला ॥ ७३ ॥
सलामीच[3] झालाइला[3] ती भवानी[3] ।
तदा आणवी रामपूऱ्याकडूनी[4] ।
भली दिव्यमार्तंड[3] चौथी शतघ्नी ।
असे शत्रुहन्त्री म्हणावी रिपुघ्नी ॥ ७४ ॥
तदा तीस झाशीस ताब्यांत घ्याया ।
अहो लागले यास तैं तीन राया ॥
न राहेच हातीं अनूंप विचारा ।
करूनी निघूनीच गेला बिचारा ॥ ७५ ॥

आर्या.

श्रीमंत पेशव्यांचें, निशाण झाशींत लावुनी त्यानें ।
बंदोबस्त करुनिया, दतियावरि चाल केलि वेगानें ॥ ७६ ॥
चारी तोफा पुढती, मध्यें हयवीर चालवी शूर ।
सर्वांमागें पदगा, द्विदिन लढूनीच घेतलें पूर ॥ ७७ ॥
राजास कैद केलें, श्रीमंतद्वाहिलाच शहरांत ।
फिरवी मल्हारि तदा, हस्तक नृप नेमि तोचि नगरांत ॥७८॥
पंधालक्ष धनाला, उपकृतिबद्धल दिले तदा त्यानें ।
संस्थानिक दुसरेही, घाबरले फार फार धाकानें ॥ ॥ ७९ ॥
यापरि श्रीमंतांचा, फडकायालाच लागला झेंडा ।
पूर्वीच्याचप्रमाणें, राजे सर्वत्र देति तैं खंडा ॥ ८० ॥
राघोबा विठ्ठलसह, माधवसाह्याप्रती तदा येती ।
ग्वाल्हेरींचीं वस्त्रें, माधवशिंद्यास पेशवे देती ॥ ८१ ॥

पृथ्वी.

पुण्याहुन निघे तदा रघुपतीसवें भारतीं ।
महादजि सुवीर तो प्रबल सैन्य घे संगतीं ॥

---

१ दिल्ली २ दतीया शेवडे वगैरेच्या राजांनीं ३तोफांचीं वि० नांवें
४ जाटाचें राज० नगर.

करूनि दरकूच ते त्वरित पोंचती येउनी ।
इडोति जयपूरच्या सरणिनें तदा चालुनी ॥ ८२ ॥
तयास नृप माळवाधिपहि भेटला सत्वरीं ।
पुढें सकल पावले नृपति माधवाचे पुरी ॥
तदा सकल ते अरी कपट येउनी तन्मनीं ।
बहू दडपिला असे विषय आपला दुर्जनीं ॥ ८३ ॥

शिखरिणी.

मराठ्यांच्या प्रांताप्रति सकल ताब्यांत अपुल्या ।
महायत्नें घ्याया झटुन लुटि कह्याहि* सगळ्या ॥
तदा तद्वार्ता ती समजुनिच सारी रघुपती ।
बहू कोपोनीया अरिनगर वेढी द्विजपती ॥ ८४ ॥
द्विजें गोहोदेला रिपुपुरिस वेढा झडकरीं ।
दिला मोर्चेबंदी चमुकडुन दादा मग करी ॥
रिपूपाशीं होते सलिल-धन-धान्यादिक अती ।
नये तो दादांना शरण अरि हट्टें पुरपती ॥ ८५ ॥

स्रग्धरा.

एकामेकावरी ते प्रतिदिवशिं चमू धाडिती युद्ध द्याया ।
कोणालाही न लाभे विजय म्हणुनिया खिन्न होती लढाया ॥
होईना छाति त्यांना अरि फितविच तैं त्या नवीनां नृपाळां ।
राघोबाला कळे हें मग वदतसे ' ठार माराच त्याला ' ॥ ८६ ॥
' गेला जातीवरी हा ' रघुपति वदला जें कळे तें पुण्याला ।
तेव्हां मल्हारबाला द्विजनृप कळवी ' वाचवा माधवाला ' ॥
दादांना भेटुनी तो रदबदलि करी ' प्राणदानास द्यावें ' ।
शिंद्याच्या माधवाला अजवरि बहु तें साह्य झालेंच भावें ' ८७

शार्दूलविक्रीडित.

' राणोजी पडला तुकोजिहि तसा दत्ताजि युद्धीं पडे ।
तैसा तो जनकोजिही स्वजनका-सुद्धां यमा सांपडे ॥
ऐसे थोर पुरूष साह्य अपणा देऊन स्वर्गीं त्वरें ।
गेले हें मनिं आणुनी नवनृपा सोडा तुम्ही सत्वरें ' ॥ ८८ ॥

---

१ ग्वाल्हेर २ महादजी शिंद्याला * कही = भुंइकोट किल्ला.

'बुद्धी पोक्तच व्हावया बहुतशा ठेंचा यदा लागती ।
तैसा नाश बहूत होय मनुजा येते तदा तन्मती ॥
मातेच्या उदरीं न कोणि बनतो विद्वान योद्धा तसा ।
घाला यास्तव मन्तुं[1] पोटिं रघुजी ह्या माधवाचा कसा?' ८९

आर्या.

यापरि राघोबाला, वृद्ध कथीं आग्रहें द्विजास तरी ।
गेलें सर्वहि वायां, दुःखें मल्हारि पावला शिबिरीं ॥ ९० ॥
मल्हारीचा नातू, आजाला भेटण्याप्रती आला ।
वंशांकुरिं मालीवरि, प्रेम असे फार त्या अजोबाला ॥ ९१ ॥
शिंद्यास वांचवाया, यत्न नृपाचा न चालला कांहीं ।
यास्तव दुसरी युक्ती, वृद्धानें काढिली नवीनचि ही ॥ ९२ ॥
एकोर्वरितात्परोत्रीं[2], राजा शिंद्यास आणि नातूयाला ।
संगें घेउनिया तो, द्विज-तंबू-लागिं सत्वरें आला ॥ ९३ ॥
दादा तालिम करुनी, तेथुन बाहेर मग यदा आले ।
तेव्हां तिघेजणहि हे, पट पट पट तत्पदांवरी पडले ॥ ९४ ॥
अर्धाक्षण झाला तरि, कोणि उठेना रघू धरी हस्ता ।
वृद्धाला जबरीनें, उठवुन बोले ' असें कसें करितां ' ॥९५॥
' आम्हां सर्वांस तुम्हीं, बाबासे खास खास आहां जी ।
मजवरि पुत्र-प्रेमा, करितां, हें काय मांडिलें आजी ॥ ९६ ॥
मल्हारराव बोले, ' सानाचें थोर आपुल्या पदरीं ।
झालों आम्ही आम्हां, माणुसकी बाजिनें दिलीच खरी ॥९७॥
झाली मम हस्तानें, तासि केली मीं प्रभून विभुसेवा ।
दिधलें बक्षिस आपण, मजवरला लोभ काय बोलावा ॥९८॥
आहां धनीच आपण, शिक्षा करण्यास पूर्ण मुखत्यार ।
माहादजीस किन्तू, प्रस्तुत शिक्षा असे कडक फार ॥ ९९ ॥
या शिक्षेनें अमुच्या, बट्टा शीलास लागतो आहे ।
करितां अब्रू राखुनि, भाकर द्यावी असेच विनती हे ॥१००॥
माली महादजीला, पुत्रापरि हो करा प्रभो जतन ।
घ्या सेवा त्यांकरवीं; दिधलेलें चालवा तसें वतन ॥ १०१ ॥
झालों वृद्ध अतां मी, श्रम करण्याची नसेच ताकद हो ।
चाळिस बेचाळिस हीं, वर्षे सेवा बहूत केलि किंहो ॥१०२॥

---

१ अपराध २ एके दिवशीं प्रभातीं.

बाळाजिपंत बाजी, नानासाहेब तीन रत्नें ही ।
माझ्या देखत गेलीं, आतां माझी तसी गती पाही ॥ १०३ ॥
आह्मांस अन्नवस्त्रां, बसल्या जागीं अतां तुह्मीं द्यावें ।
डोळे मिटल्यानंतर, तुह्मां वाटेल तें करां बरवें ॥ १०४ ॥
ऋणानुबंध असेलाचि, तर हे भावेंच चाकरी करुन ।
वंशा न डाग लागुन, बसतिल दत्तान्न तेंच खाऊन ॥१०५॥
नाहींतर जें यांच्या, नशिबीं तैसेंच आप्त होईल '
बोलुनि मल्हारीनें, नेत्रामाजींहि आणिलें सलिलें ॥ १०६ ॥
दादासाहेब तदा, उत्तर देण्यास नाहिं धजलें जो ।
पोषाख चोकडे करिं, शिरपेंचा आणि त्या दिले वाजी ॥ १०७
मोत्यांचे तीन तुरे, दिले तिघांना तसेच तीन करी ।
मानानें गौरविले, तेव्हां तन्मन मुदाप्रतीच वरी ॥ १०८ ॥
इंदूराच्या अधिपें, दुसऱ्या दिवशीं करून मध्यस्ती ।
गोहदनृपाकडुन तें, सल्ला करण्यात घेतली तस्ती ॥ १०९ ॥
लक्ष त्रय धन दिधलें, द्विज-सन्मुख आणिलें नृपा जीनें ।
सत्रापासष्टीं ही, मोहिम सरलीच फार कष्टानें ॥ ११० ॥
मल्हारी-कर्णाला, ठणका या-समयिं लागला होता ।
मग तो विश्रांतिस्तव, अलमपुरा जाहला तदा जातां ॥१११॥
आराम न झालें त्या, खंगे प्रकृति बहूत वृद्धाची ।
वाटे मल्हारीला, धाड असे ही यमाजिपंताची ॥ ११२ ॥
दादास तुकोजीला, शिंद्यालाही समीप बोलविलें ।
' दादा मी तर जातों, ' राघोबालागिं वृद्ध तें बोले ॥ ११३ ॥
' खंडू नाहीं जगला, ' मालीचा हात धरुनि तो वदला ।
' खंडू हाच असे जी ' सांभाळा प्रीतिनेंच या बाळा ' ॥११४॥
दादांच्या करिं घाली, त्याचा कर फार फार गहिंवरून ।
नंतर शिंद्याच्या करिं, तुकोजि-हस्तीं करास दे जीर्ण ॥११५॥
तेव्हां हस्तां, जोडुन तुकोजि वृद्वास बोलला ' काका ।
मी चाकर आपुला जी, ऐसें विपरीत आज करितां कां ? ११६
बाबासाहेबांना, वागवुनी घ्यावया मला सांगा ।
तेव्हां वृद्ध म्हणाला, ' तूं मोठा खासरे महा भागा ' ॥ ११७॥

१पाणी २वृद्ध मल्हाररावानें ३मालीरावाचें टोपण नांव ४वृद्ध मल्हारराव.

'श्रीमंतांची सेवा, या-पुढतीं तूंच खास करशील ।
रणशूर आणि गाजी, होइल सर्वां तुझें सुखद शील ॥ ११८ ॥
इतकें बोलून तदा, डोले मिटि तो बहूत मोदानें ।
एकादशिच्या दिवशीं, भाद्रपदीं जातसे विमान[1] नें ॥ ११९ ॥
दुःखीं सर्व बुडाले, दादा आप्तेष्ट आणि आश्रित ते ।
दादा रडुनी वदले, ' मम विश्रांतीस हे खरे होते, ॥ १२० ॥
' आतां वडील आणी, पाठीराखा नसे मला कोणी ।
आधार सर्व तुटला, ' गाळी नेत्रांतुनी बहु पाणी ॥ १२१ ॥
साध्वि अहल्याबाई, मिठि मारुनि मालिराव पुत्राला ।
हंबरडा फोडुनि ती, रडली तैं सर्व गांव गहिंवरला ॥ १२२ ॥
नवरा मृत झाल्यावरि, बापापरि प्रेम ठेवुनी श्वशुरीं ।
सेवा करीत होती, साध्वी वरि बेतलीच वेळ खरी ॥ १२३ ॥

गीति.

आधार या सतीचा, तुटुनी उघडीच जाहली बाई ।
ईशेच्छा वदुनि तिनें, स्तब्धपणें सोसिलींच दुःखें हीं ॥१२४॥
मालीरावाकरवीं, उत्तरविधि सर्व सांग करवून ।
छत्री करून सतीनें, तीस दिले तीस (३०) गांव नेमून १२५

नववा सर्ग समाप्त.

उपसंहार.

—:०:—

शार्दूलविक्रीडित.

खेडें होळ कुठें तसें जनु कुठें तें मेषपाच्या घरीं ।
बालत्वींच मरे पिता सुजननी आणी तया सत्वरीं ॥
भावाच्या सुगृहीं तिथें भुजगमें लोकांस भाग्योदय ।
याचा होइल दाविलें मग दिला त्या भोजजीनें हय ॥ १ ॥
कंठाजी कदमेंहि शूर पुरुषा जाणूनिया आणिलें ।
सर्वाग्रीं मग वाजिनें हटकिलें दे राज्य तो चांगलें ॥
भारी लौकिक लाभला जय सदा चाळीस वर्षांत ये ।
लांभाते चुकिच्यामुळें अजय तो एका प्रसंगास ये ॥ २ ॥

---

१ विशेष मानानें (पक्षीं विमानांतून).

होता निष्कपटी म्हणून विभुनें देऊनि निष्कां पटां ।
युद्धीं सद्विजयास आणि सुयशा भारी दिलें सद्भटा ॥
श्रीमंतास असे बहू वचकही अन्यां नृपालांप्रती ।
जो भासे यमसा तया नरवरा तो ईश दे सद्गती ॥ ३ ॥
सत्राशांस यदाच सात कमती वर्षे तदा जन्मला ।
बाहात्तर होउनीच पुरतीं वर्षे तदा वारला ॥
छाती रुंद कपाळ आणि भुजही दिव्याकृती चांगले ।
होतें नासिक चांगलें सरळ तें तेजस्वि डोळे भले ॥ ४ ॥
होता द्दड अती अती चपलही बालत्वि होता तदा ।
धोडे धावत सोडणें बहु रुचे एके हयें एकदां ।
दाताच्या वरि लाथ मारुन दिले तैं दोन पाडूनिया ।
गेले सर्वहि आयु म्लेच्छसमरीं लाभेच कीर्ती जया ॥ ५ ॥
होती प्रकृति रोगहीन दृढही भारीच धैर्यावृता ।
ते श्रीमंत म्हणून यांस वदती हा भीम हो तत्वता ॥
ह्याचे सद्गुण फार फार असती रत्नापरी चांगले ।
कोणी कांहिं म्हणो खरे सुगुण हे सर्वा बरे वाटले ॥ ६ ॥
मोठी मोहिम जिंकुनी परत ते येतां खुशियाप्रती ।
जी सल्ला दिधली तियेवरुनही वाटेच लोकांप्रती ॥
एखादा अरि चांगलाच असणें याला बरें वाटलें ।
स्वामीचा अभिमानि यास म्हणणें कांहीं नव्हे चांगलें ॥ ७ ॥
विप्रांनीं सगळी मही करुनिया आक्रांन्त सर्वा बलें ।
केले दास तदा तया गगनही गिर्डु दिसों लागलें ॥
होवोनी मदमस्त मुख्य धनिही कैदेमधी टाकिती ।
ऐसा घोर अनर्थ विप्र करिती राज्यें अती जिंकिती ॥ ८ ॥
शिंदे होळकरास वागविति ते दासापरी सर्वदा ।
युद्धीं टाकुनि तो सदाशिव वदे मल्हारिलागीं सदा ।
जैशालाच तसें मिळे फिटतसे तो संशयो मानसीं ।
या तत्वास धरून वागत असे गेलीच निष्ठा कसी ॥ ९ ॥

होता शांत दयाळु धाडासे तसें औदार्य त्यांच्यांत तें ।
होते भारी सदा क्षमाशिल असे नम्रान्त होतेहि ते ॥
युद्धीं मर्दुमकी प्रवीर जगता दावी तयाची भरी ।
द्रव्यें ढाल, असा गुणज्ञ नृपती भीती तयाला अरी ॥ १० ॥

शार्दूलविक्रीडित.

' लोकांना धन अल्प द्या ' सचिव ते यांना कदा बोलले ।
येई राग तयास फारचि तदा कर्णांपरी भासले ॥
पर्वा यास नसे मुळींच कसली द्रव्यादिकांची कधीं ।
वागे सज्जनसा प्रजेस सुखवी सद्वर्तनानें सुधी ॥ ११ ॥
भाग्याचा पुतळा जनास गमला साधू गुणीही तसा ।
युद्धीं तो जयनारिला गमतसे कंठांत ताईतसा ॥
भारी लौकिक लाभला मद नसे साधेंच वागे सदा ।
होतें पौरुष आणि धैर्य बरवें लोकांप्रती दे मुदा ॥ १२ ॥
होता अग्रगणीं नृपालततिच्या मध्यें तसा धोरणी ।
वाणी स्पष्ट असे धन्याविण कुणा अन्या न तो तैं गणी ॥
राघोबादिक सर्वहि वचकती होता दरारा असा ।
सामंतास सदाच मान सुख दे आनंदवी मानसा ॥ १३ ॥
पत्नी एकच यांस तीं उभयतां प्रेमें बहू वागती ।
तेव्हां राम अणी सिता सकलिका हे वाटले दंपती ॥
चैनी ना बनला धनादि असतां दुर्गुण याला नसे ।
तेव्हां सद्गुणराशि यास ह्मणणें होईल खोटें कसें ? ॥ १४ ॥

गीति.

जयपूर आणि बुंदी, राज्यांच्या क्रांति सत्वरें केल्या ।
शिंद्याच्या सेनेच्या, जयपुरिं कपटेंच कत्तली झाल्या ॥ १५ ॥
औरंगाबादेला, गाजीउद्दीन पावला मरण ।
मातेच्या विषयोगें, शव दिल्लीलाहि पोंचवी अपण ॥ १६ ॥
कुंभेरीच्या वेढ्या-माजीं शिंदा करी कसें कपट ।
त्याचे त्याला भोवे, हा होता सार्वकाल निष्कपट ॥ १७ ॥
स्वारीखर्चासाठीं, भाऊचा रोष फुकट झाला जी ।
कालीकेचा मेळा, लुटुनी केली नृपें तदा आजी ॥ १८ ॥

भाऊ अपमान करी, पानिपतीं या खऱ्या गड्याचाही ।
तत्फल तो द्विज पावे, पुत्रापरि प्रेम हा करी तरिही ॥ १९ ॥
इत्यादि गोष्टिंवरुनी, निस्पृहता आणि दूरदर्शित्व ।
स्वामीवरि भाव असे, औदार्यादिक समस्त गुणवत्त्व ॥ २०॥
मल्हारीला स्नेही, विठ्ठल राणोजि चांगले होते ।
कांहीं रजपुत राजे, ठेविति याच्या पदांवरी माथे ॥ २१
मृतिसमयीं धन जवळीं, सोळा कोटी असेच शिलकेला ।
लक्षाधिक पाउण त्या, कोटीचा प्रांतही असे याला ॥ २२ ॥
याच्यानंतर माली, राज्याला नृपति राघवें केला ।
दुःखित सर्वहि मेळा, कष्टें स्वस्थानिं आपुल्या गेला ॥ २३ ॥

समाप्त.

